क्रमांक : ७६

महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ / चैत्र २८, १९४४ (शके)

लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

७६. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले. उक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या एकूण **१९४** स्वीकृत लक्षवेधी सुचनांच्या जोडपत्रामधील **३८** लक्षवेधी सूचनांची निवेदने त्याचदिवशी मा.सदस्यांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाव्दारे वितरीत करण्यात आली असून उर्वरित एकूण **१५६** निवेदने विभागाकडून प्राप्त होणे प्रलंबित होती.

आता प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी **एकूण ६६ निवेदने** विभागाकडून प्राप्त झाली असून यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १८ एप्रिल, २०२२.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२

डॉ. अशोक उईके, श्री. राजेश पाडवी, डॉ. देवराव होळी, सर्वश्री दिलीप बोरसे, कृष्णा गजबे, काशिराम पावरा, भिमराव केराम, डॉ. संदीप धुर्वे, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

"राज्यातील मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात शासनाची अत्यंत उदासीन व विरोधी भूमिका असणे, मागील चार-पाच वर्षापासून विविध संवर्गातील विविध विभागांतर्गत एक लाखापेक्षा अधिक अनुसूचित जाती-जमातीचे भटके-विमुक्त, विशेष मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी हे पदोन्नतीपासून वंचित असणे, मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी मागासवर्गीय पदोन्नती संदर्भात दिलेल्या निकालानंतर तत्कालीन सरकारने दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या ३३ टक्के जागा रिक्त ठेवलेल्या असणे, तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पदोन्नती आरक्षण सरसकट रद्द करणे व मागासवर्गियांसाठी रिक्त ठेवण्यात आलेल्या जागा देखील सेवाज्येष्ठतेनुसार सरसकट भरणे, मागासवर्गीयांच्या पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात जर्नलसिंग वि. लक्ष्मीनारायण गुप्ता याप्रकरणी दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये खालील प्रमुख बाबी नोंदविलेल्या असणे. १.आरक्षित प्रवर्गातील उमेदवार हे अनारक्षित प्रवर्गातून निवडीसाठी सुद्धा पात्र ठरत असणे (परिच्छेद १७) २. आरक्षित प्रवर्गातील प्रतिनिधित्वाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. खुल्या प्रवर्गातून गुणवतेनुसार पदोन्नती मिळाल्याच्या कारणाखाली त्यामध्ये बदल होऊ शकत नसणे, (परिच्छेद १७) ३. एम. नागराज यांच्या निर्णयाची अंमलबजावणी ही पूर्वलक्षी प्रभावाने नाही तर पुढील प्रभावाने (Prospective) असणे. (परिच्छेद ४२) ४. संख्यात्मक आकडेवारी (Quantifiable (Data) निश्चित करण्यासाठी संपूर्ण सेवा कालावधी लक्षात घेऊ नये तसेच संवर्ग व गट हे समानार्थी शब्द नसणे, (परिच्छेद ४५) ५. संविधानाने राज्यांना अपर्याप्त संख्येनुसार पदे किंवा पदांच्या वर्गाला पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याचे अधिकार प्रदान केले असणे, (परिच्छेद ४६) ६. राज्यांनी संवर्गला (Cadre) अनुसरून पदोन्नतीमध्ये आरक्षण सिद्ध केले पाहिजे कारण बिंदुनामावली ही संवर्ग नुसार निर्धारित केली जात असणे. (परिच्छेद ४७)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालानुसार महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक ७ मे २०१९ रोजीचा निर्गमित केलेल्या शासन निर्णय खालील कारणाने अवैध ठरत असणे.. या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने मागास प्रवर्गाच्या ते ३० टक्के आरक्षित जागा खुल्या प्रवर्गात समाविष्ट केल्या असणे, तथापि मागास प्रवर्गाचे आरक्षण खुल्या प्रवर्गात न मोजता आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने वरील निर्णयाद्वारे दिलेले असणे. २. एम. नागराज विरुद्ध भारत सरकार या निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने न करता ती पुढील प्रभावाने (१९/१०/२००६ पासून पुढे) करण्याचे आदेश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिलेले असणे, परंतु शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाने दिनांक २५ मे २००४ पासून म्हणजेच पूर्वलक्षी प्रभावाने त्यांची अंमलबजावणी करण्यात आलेली असणे. सदरील एम. नागराज यांच्या निकालानुसार स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या असणे की मागास प्रवर्गाच्या रोस्टर पॉईंटच्या आरक्षित जागेवर जनरल कॅटेगरी यांना पदोन्नती देण्यात येऊ नये, तरी देखील दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या चुकीच्या शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत मागासवर्गीयांसाठी रिक्त ठेवणे अपेक्षित असलेल्या जागेवर पद्धतीची प्रक्रिया वेगाने सुरूच ठेवणे, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालानुसार राज्य सरकार यांनी कॅडरवाईज डाटा तयार करण्याबाबत कोणतीच कार्यवाही अद्याप न करणे, मागासवर्गीय अधिकारी आणि कर्मचान्यांच्या पदोन्नती आरक्षण संदर्भात गठित करण्यात आलेल्या मंत्रिगटाच्या समितीची कुठलीही बैठक या निकालानंतर न घेणे, सदर मंत्री गटातील समितीच्या कुठल्याही मंत्र्यांनी मागासवर्गीयांच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यासंदर्भात मागणी न करणे, एकंदरीतच राज्यभरात एकूणच कार्यरत असलेल्या सुमारे दहा लाखांपेक्षा अधिक मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी या सर्वांच्या मनामध्ये सरकारच्या मागासवर्गीय विरोधी भूमिकेमुळे उदासीनता निर्माण होणे. एक लाखापेक्षा अधिक मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवणे हे अतिशय अन्यायकारक व एकंदरीतच शासनाच्या कामकाजावर विपरीत परिणाम करणारे असणे शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना..."

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

मा.उच्च न्यायालय, मुंबई रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी, पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद करणारा दिनांक २५ मे २००४ चा शासन निर्णय रद्द केला. असे करताना मा. उच्च न्यायालयाने आरक्षण अधिनियम, २००१ च्या घटनात्मक

वैधतेचा प्रश्न खुला ठेवत तो योग्य प्रकरणात तपासण्यात येईल असे नमूद केले. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ रोजीच्या आदेशाविरुध्द राज्य शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३.१०.२०१७ रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नव्हते. त्यामुळे राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली होती. मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली होती.तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत, अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते, दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, जेणे करून मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशाचा भंग होणार नाही, ही कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायलयाच्या अंतिम आदेशाच्या कार्यवाहीच्या अधिन राहून करण्यात यावी, अशा स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना दि.२९/१२.२०१७ च्या शासन पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार खुल्या प्रवर्गात पदोन्नत्या देताना जेष्ठतेनुसार पात्र असणाऱ्या खुल्या प्रवर्गातील अधिकारी /कर्मचारी तसेच ज्यांना दिनांक २५.५.२००४ नंतर आरक्षणातंर्गत पदोन्नती मिळालेली नाही, अशा मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी देखील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आले होते.

त्यानंतर मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीगटाच्या दि.१६.१२.२०२० च्या बैठकीतील शिफारशींनुसार दि.२९.१२.२०१७ चे शासन पत्र रद्द करून दि.१८.०२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या याचिका क्र.२७९७/२०१५ वरील दि.४/८/२०१७ निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या

अधिन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त असलेली सर्व १००% पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात यावीत व जे अधिकारी/ कर्मचारी दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयापूर्वी अथवा त्यानंतर पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या अथवा त्यानंतरच्या ज्येष्ठता यादीनुसार त्यांचा सेवाकनिष्ठ अधिकारी अथवा कर्मचारी पदोन्नतीला ज्यावेळी पात्र होईल, त्यावेळी दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेतलेला अधिकारी किंवा कर्मचारी यांचा पदोन्नती करिता विचार करण्यात यावा, असे आदेश निर्गमित करण्यात आले.

दि.१८.०२.२०२१ च्या शासन निर्णयामुळे मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्यात असंतोष निर्माण झाल्यामुळे दि.१८.०२.२०२१ चा शासन निर्णय रद्द करून दि.२०.०४.२०२१ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीच्या कोट्यातील आरक्षित पदे रिक्त ठेऊन खुल्या प्रवर्गातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले. तथापि, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करणाऱ्या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.४.८.२०१७ च्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसल्यामुळे राज्यात पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही, असे कायदेशिर अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यामुळे दि.२०.०४.२०२१ चा शासन निर्णय रद्द करून दि.७ मे, २०२१ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. दि.७ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.०५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत.

(२) जे मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी /कर्मचारी-

(अ) दि.२५.०५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.०५.२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दि.२५.०५.२००४ नंतर शासन सेवेत रूजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

(३) उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील. अशी कार्यवाही करतांना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना पदावनत करण्यात येऊ नये.

सद्य:स्थितीत दि.७.५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नती कोट्यातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या अनुषंगाने मागासवर्गीयांचा परिमाणवाचक डेटा संकलित करण्यासाठी दि.२२.०३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये तत्कालिन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दि.२९.९.२०२१ रोजी शपथपत्र दाखल केले. त्यानंतर मंत्रिमंडळाच्या दि.१३.१०.२०२१ च्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र आरक्षण अधिनियम, २००१ प्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व विशेष मागास प्रवर्ग यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. ते कायम ठेवण्यात यावे, असे सुधारित शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात दि.१८.१०.२०२१ रोजी करण्यात आले. तसेच, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.परमजितसिंग पटवालीया, ॲड.कपिल सिब्बल, ॲड. अभिषेक मनू सिंघवी व ॲड. राकेश राठोड यांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.४.८.२०१७ च्या निर्णयाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ व केंद्र शासन व इतर ११ राज्यांच्या संलग्न याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.१.२०२२ रोजी पारित केलेल्या निर्णयात वर नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात स्पष्टिकरण देण्यात आले आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.०१.२०२२ च्या निर्णयान्वये खालील बाबीही स्पष्ट केल्या आहेत-

१) परिमाणवाचक डेटा मिळविण्यासाठी कोणतेही मापदंड ठेवले जाऊ शकत नाही.

२) परिमाणयोग्य डेटा गोळा करण्यासाठी संवर्ग हे एकक असावे.

३) परिमाणवाचक डेटा गटाच्या आधारे गोळा करणे वैध नाही

४) प्रमाणशिर प्रतिनिधित्व पर्याप्ततेची चाचणी म्हणून समजण्यात कोणतेही मत व्यक्त करता येणार नाही .

५) पुनर्विलोकनासाठी कालावधी वाजवी असावा आणि तो शासनाचे निश्चित करावा

६) एम. नागराज प्रकरणाचा निकाल संभाव्य परिणामाने लागू असल्याचे निकालातच घोषित केले आहे.

दि.२२.३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या मुख्य सचिवांच्या समितीने संकलित केलेला गटनिहाय डेटा मा.सर्वोच्च न्यायालयाने नामंजूर केला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८.१.२०२२ च्या निर्णयानुसार सर्व प्रशासकीय विभागांकडून संवर्गनिहाय माहिती संकलित करण्यात येत आहे. संवर्गनिहाय माहिती संकलित झाल्यानंतर त्याचे विश्लेषण करून शपथपत्राद्वारे मा.सर्वोच्च न्यायालयास सादर करण्यात येईल.

सदर प्रकरणी दि.३०.३.२०२२ पासून राज्यनिहाय सुनावणी सुरु होणार आहे.पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे आदेश पारित करण्यात येतील त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

****

४

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. अभिमन्यु पवार, राणाजगजीतसिंह पाटील, राहूल कुल, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार ,राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना .

" मराठवाडा खादी ग्रामउद्योग समिती नांदेड ही संस्था सन १९६७ मध्ये स्थापन झालेली असणे, सदरील संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील कांही भागाचा समावेश असणे, सदरील संस्थेमार्फत खादीचे उत्पादन व विक्री केली जाऊन कायमस्वरूपी रोजगार दिला जात असणे, सदर संस्थेच्या मालमत्ता जमीन जवळपास २६ शहरांमध्ये २९ विविध ठिकाणी असणे, सदरील संस्थेतील अंतर्गत वाद व बेकायदेशीर व्यवस्थापनामुळे संस्था डबघाईस येणे , सदरील संस्थेअंतर्गत उत्पादने बंद रोजगार बंद झाला असणे , कुशल कामगारावर बेकारीची वेळ येणे, सदरील संस्थेच्या मालमत्ता विक्री करताना सह धर्मादाय आयुक्त औरंगाबाद यांची परवानगी न घेता परस्पर विक्री केली असणे , सदरील न्यासाची सर्व मालमत्तेची नोंद अनुसुची १ ला न घेणे, विश्वस्तांनी न्यासाची जागा भाडेतत्वावर देताना मा. धर्मादाय सह आयुक्त यांची परवानगी नियमानुसार घेतली नसणे , न्यासाच्या नियमावलीप्रमाणे व्यवस्थापन न करणे, व्यवस्थापन मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांकडून गैरव्यवहार बाबतीत मा. धर्मादाय आयुक्त मुंबई यांचेकडे तसेच शासनाच्या गवर्नर डिटेल्सवर १५/०३/२०१७ रोजी दाखल करणे, सदरील तक्रारीची चौकशी व दोष सिद्ध झाला असतांनाही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे , सदरील निरक्षण व चौकशी अहवाल क्र.६३/१७, २७/१७ नुसार सहायक धर्मादाय आयुक्त १ नांदेड विभाग नांदेड यांनी विश्वस्तविरुद्ध कारवाई करण्याची परवानगी मागण्यासाठी प्रस्ताव मा. धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात येत असल्याचे निरीक्षण अहवालात नमूद करणे , सदर संस्थेचे संचालक मंडळ बेकायदेशीर निवडली असल्याने सदरील संचालक मंडळ निवडीचा अहवाल व संचालक मंडळ निवडीतील बदलाचा अहवाल मा. धर्मादाय आयुक्तांनी वेळोवेळी नामंजूर केला असल्याने सद्यस्थितीतील संचालक मंडळ बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास येणे, सदरील संचालक मंडळानी वसमत, केज सह इतर मालमत्ता नियमबाह्य विक्री केलेली असणे , नांदेड येथील संस्थेची मालमत्ता विकासकाला परस्पर नियमबाह्य पद्धतीने दिलेली असणे , अशा पद्धतीने महाराष्ट्रातील स्वातंत्र्यसैनिकांनी स्थापन केलेले अत्यंत उल्लेखनीय कार्य असलेल्या या संस्थेच्या अनागोंदी व भ्रष्ट कारभाराची व

अनियमिततेची चौकशी करणेबाबत व सदरील संस्थेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

****

निवेदन

मा. मुख्यमंत्री — विधि व न्याय विभाग

मराठवाडा खादी ग्रामोदयोग समिती नांदेड नों .क्र. एफ-१२७(नांदेड) सदरहू संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय नांदेड येथे दि. २०/०९/१९६७ रोजी नोंदणीकृत झाली असून, सदर संस्थेचे कार्यक्षेत्र मराठवाडा आहे. सदर संस्थेचा उद्देश खादी वस्त्र निर्मिती प्रचार, प्रसार व विक्री तसेच या मधून रोजगार निर्मिती करणे इतर पूरक उद्योगास चालना देणे असे आहेत.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड येथील परिशिष्ट १ ज्यावर संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेबाबत नोंद केली जाते त्यावर न्यासाच्या काही मालमत्तेची नोंद आहे . परंतु परिशिष्ट -१ जिर्ण झाले असून न्यासाचे नवीन स्थावर मालमत्तेसंबंधी बदल अर्ज मंजूर झालेले आहेत त्याची नोंद परि-१ वर घेणे बाकी आहे. न्यासाच्या मालमत्ता विक्री बाबत धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांच्या न्यायालयात चौकशी क्र. ५/२१ व ६/२१ अन्वये प्रकरण दाखल असून ते न्यायप्रविष्ट आहे. न्यासाचे नियमावली प्रमाणे व्यवस्थापन न करणे व व्यवस्था मंडळाचे पदाधिकारी व सदस्याकडून गैरव्यवहार याबाबत तसेच दि.१५ मार्च २०१७ रोजीच्या तक्रारीनुसार निरीक्षक चौकशी क्रमांक (जुने २७/२०१७, ६३/२०१७, ११६/२०१७) ०६/२१ अन्वये चौकशी होऊन चौकशी अहवाल प्रभारी सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड १ यांचे आदेशासाठी प्रलंबित आहे. तसेच धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांच्या न्यायालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ ड नुसार चौकशी क्रमांक ११५/२०१७ अन्वये प्रकरण प्रलंबित असून न्यायप्रविष्ट आहे.

सदर न्यासाचे व्यवस्था मंडळ बेकायदेशीर निवडलेले अहवाल व संचालक मंडळ बदलाचा निवडीचा अहवाल याबाबतीत प्रभारी सहायक धर्मादाय आयुक्त नांदेड यांच्या न्यायालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ नुसार चौकशी क्रमांक १४७०/२०१२ (पुनर्चौकशीसाठी), ४५०९/१७, १०९५/१७, ९०२०/१८, ८९७/२०, ५०३/२१ व ५०४/२१ असे एकूण ७ बदल अर्ज प्रलंबित असून न्यायप्रविष्ट आहेत. सदर न्यासाचे शेवटचे कार्यकारिणीबाबतचा बदल अर्ज क्र. ३६५/०२ हा दि.१७/१२/२००४ रोजीच्या आदेशानुसार मंजूर झालेला आहे. त्यानंतरचा या न्यासाच्या कार्यकारी मंडळाबाबतचा एकही बदल मंजूर झालेला नसून सदर न्यासाचे कार्यकारी मंडळ De-facto आहेत.

न्यासाची केज ,तालुका केज, जिल्हा बीड येथे असलेली स्थावर मालमत्तेबाबत धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांच्या न्यायालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६(१)(a)(b) अन्वये प्रकरण दाखल असून ते न्यायप्रविष्ट आहे. वसमत , तालुका वसमत, जिल्हा हिंगोली येथे असलेल्या न्यासाच्या स्थावर मालमत्तेबाबत सहायक धर्मादाय आयुक्त १ नांदेड यांनी बदल अर्ज क्रमांक १२८३/११ मध्ये सदरची स्थावर मालमत्ता ही न्यासाची असल्याबाबत सिद्ध होत नसल्यामुळे सदर बदल अर्ज दि .१८/११/२०१४ रोजी नामंजूर केला आहे. इतर मालमत्तेबाबत निरीक्षक चौकशी क्रमांक २७/२०१७, ६३/२०१७, ११६/२०१७ व ०६/२१ अन्वये सखोल चौकशी होऊन प्रभारी सहायक धर्मादाय आयुक्त १ नांदेड यांच्या आदेशास्तव चौकशी अहवाल प्रलंबीत आहे. न्यासाच्या नांदेड येथील स्थावर मालमत्तेपैकी बहुतांशी मालमत्ता न्यासाच्या ताब्यात असून , काही स्थावर मालमत्तेबाबत वादातीत प्रकरण दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दिवाणी दावा प्रलंबित आहे.

सदर न्यासाचे बहुतांश संस्थापक विश्वस्त हे स्वातंत्र्यसैनिक आहेत. अनागोंदी व भ्रष्ट कारभाराविषयी चौकशी झाली असून ती आदेशासाठी प्रलंबित आहे. तसेच धर्मादाय सह आयुक्त औरंगाबाद यांचेसमोर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१ डी नुसार चौकशी क्रमांक ११५/१७ अन्वये प्रकरण प्रलंबित असून न्यायप्रविष्ट आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, संदिप क्षिरसागर, नामदेव ससाने, राजेंद्र पाटणी, समिर मेघे, मोहन मते, डॉ.पंकज भोयर, श्री.राणाजगजीतसिंह पाटील, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. संभाजी पाटील-निलंगेकर, योगेश सागर, डॉ.देवराव होळी, सर्वश्री, मंगेश चव्हाण, गणपत गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५(३) अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९२९

" चाळीसगाव, जि.जळगांव येथे ऑगस्ट २०२१ महिन्याच्या शेवटी व पुन्हा सप्टेंबर २०२१ महिन्याच्या पहिल्या आठवडयात ढगफुटीसदृश्य अतिवृष्टी होणे, त्यामुळे पाटणादेवी अभयारण्य क्षेत्र व गिरणा-मन्याड धरण क्षेत्रात जवळपास एका रात्रीत १४० मिलिमीटर पाऊस झाल्याने व नद्यांना आलेल्या महापुरात बरेच रस्ते पाण्याखाली गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटणे, पुलांचे भराव वाहून गेले असून काही पुलांचा मुख्य भाग क्षतिग्रस्त झालेला असणे, तसेच काही ठिकाणी नवीन पुलांची निर्मिती करण्याची निर्माण झालेली अत्यावश्यक गरज, या सर्व परिस्थितीमुळे चाळीसगाव तालुक्यातील दळणवळण प्रभावित झाले असून नागरिकांना या रस्ते व पुलावरुन ये-जा करणे जीवघेणे ठरत असणे, यासंदर्भात चाळीसगाव तालुक्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग ह्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे ५० कोटी रुपयांची आवश्यकता असून त्यास प्राधान्याने मंजुरी द्यावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी माहे २०२१ ला निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करणे, परंतु सदरील निवेदनावर आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन

ता.चाळीसगांव जिल्हा जळगांव येथे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर-२०२१ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे पाण्याची पातळी वाढल्याने काही पूल व रस्ते क्षतिग्रस्त होऊन वाहतुक काही कालावधी करीता खंडीत झाली होती. पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर रस्ते व पुलांची दुरुस्ती करून रस्ते वाहतुकीकरीता तातडीने खुले करण्यात आले. ता.चाळीसगाव जि. जळगाव येथे रस्ते व पुलाचे अतितातडीच्या दुरुस्तीकरीता रु. ४८०.०० लक्ष रकमेची कामे मंजूर करण्यात आली. या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे सद्यस्थितीत प्रगतीत आहेत. रस्ते व पुलांच्या तात्पुरत्या दुरुस्तीकरीता पुरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रक्कम रु. २३१.०० लक्ष किंमतीच्या कामांना मान्यता प्रदान करण्यात आली. या कामांकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.वार्षिक दुरुस्ती अंतर्गत रक्कम रु. २६२.५० लक्ष ची कामे मंजूर असून सद्यस्थितीत प्रगतीत आहेत. मार्च २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये रु.१७६१.४० लक्ष इतक्या रकमेच्या कामांना मान्यता प्रदान करण्यात आली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

वरीलप्रमाणे एकूण रु.२७३४.९० लक्ष इतक्या किंमतीच्या रस्ते व पूल दुरुस्ती व नवीन कामे चाळीसगाव तालुक्याकरीता मंजूर करण्यात आली आहेत. ही सर्व कामे निधी उपलब्धततेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत चाळीसगाव तालुक्यातील रस्ते दुरुस्त करून वाहतुकीकरीता सुस्थितीत आहेत.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक

मा.श्री.बबनराव शिंदे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित लक्षवेधी सूचना क्रमांक:-

"महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल- रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यातून लाखो भाविक पंढरपूर ला जात असणे. सोलापूर-पंढरपूर मार्गावरील पंढरपूर-देगांव-चिंचोली-टाकळी-सिकंदर-कुरूल ते रामा-२०२ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६६ रस्ता हा सध्यास्थितीत अत्यंत खराब असून हा पंढरपूर व सोलापूर मुख्यालयास जोडणारा जवळचा मार्ग असणे. परंतू रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असल्याने हा रस्ता म्हणजे मृत्युचा सापळा बनलेला असणे. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे सातत्याने अपघात घडत असल्याने परिसरातील नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे. यामुळे रस्त्याची दुरूस्ती करणे आवश्यक असणे. या रस्त्याच्या सुधारणेमुळे या भागातील शेतीमाल पंढरपूर व सोलापूर येथे नेण्यास मदत होणार असून सदर रस्ता बागायती क्षेत्रातून जात असल्याने हा रस्ता ऊस वाहतुकीसाठी उपयुक्त असणे. या रस्त्याच्या सुधारणेमुळे या भागातील शैक्षणिक संकुले,तिर्थक्षेत्र,बाजारपेठा,साखर कारखाने व दवाखाने जोडले जाणार असल्यामुळे पंढरपूर-देगांव-चिंचोली-टाकळी-सिकंदर-कुरूल ते रामा-२०२ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६६ कि.मी. ०/०० ते ३५/७०० या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून सदरच्या रस्त्याचा आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत फेज-२ मध्ये समावेश करून निधीची तरतूद करणे गरजेचे असणे, सदर रस्त्यास आशियाई विकास बँक अर्थसहाय्यांतर्गत प्रस्तावित केलेल्या कामांना मंजुरी देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची, भाविकांची वारंवार मागणी होत असुनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले असणे, परिणामी या मार्गावरून प्रवास करताना जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने या मार्गाचा आशियाई विकास बँक आवश्यक फेज-२ मध्ये समावेश करून कामाला गती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठठल रूक्मिणीच्या दर्शनासाठी महाराष्ट्र व इतर राज्यातून लाखो भाविक पंढरपूरला येत असतात. सदर पंढरपूर शहरापासून देगाव- चिंचोली –टाकळी सिकंदर – अंकोली –कुरुल हा रस्ता आशियाई विकास बँक अर्थसहाय्य योजनेच्या टप्पा -२ अंतर्गत समाविष्ट करुन सदर रस्त्याची सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सन्माननीय विधान सभा सदस्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे.

सदर रस्ता हा पंढरपुर पासुन सोलापूर या जिल्हा मुख्यालयास जोडणारा सर्वात जवळचा मार्ग आहे . सदर रस्त्याच्या परिसरात असलेल्या साखर कारखान्यांमुळे मोठ्या प्रमाणात ऊस वाहतुक व इतर अवजड वाहतूक होत असल्याने तसेच मागील ३ वर्ष सातत्याने झालेली अतिवृष्टी यामुळे रस्त्याचे नुकसान झाले

आहे. तथापि,सदर क्षतीग्रस्त झालेल्या लांबीमध्ये व्दैवार्षिक देखभाल दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत रस्ता दुरूस्त करून वाहतूकीस योग्य ठेवण्यात आला आहे. तसेच अत्यंत खराब झालेल्या ३.०० किमी लांबीमध्ये पूरहानी दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत रू १५०.०० लक्ष इतक्या रक्कमेस मंजूरी दिलेली असून सदयस्थितीत काम प्रगतीत आहे .

वरील प्रमाणे प्रस्तुत रस्त्याची दुरुस्ती करुन सदर रस्ता वाहतुक योग्य ठेवणेबाबत विभागाच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात आली आहे.तथापि प्रस्तुत रस्ता हा आशियाई विकास बँक अर्थसहाय्य योजनेच्या टप्पा -२ अंतर्गत समाविष्ट करुन सदर रस्त्याची सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सन्माननीय विधान सभा सदस्यांनी मागणी केली आहे.

याअनुषंगाने नमुद करण्यात येते की, आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने "महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प" हाती घेण्यात आला असून या प्रकल्पाच्या टप्पा-२ अंतर्गत आशियाई विकास बँकेकडून अर्थसहाय्य उपलब्ध होण्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनाने सादर केला आहे.

आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने टप्पा-२ मध्ये कामे हाती घेण्यासाठी राज्यातील काही रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येत आहेत. या अंतर्गत प्रस्तुत पंढरपूर-देगाव-चिंचोली-टाकळी-सिकंदर-कुरुल ते रामा- २०२, या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ सोलापूर यांचे मार्फत हाती घेण्यात आला आहे.तथापि, सदर योजनेंतर्गत कोणते रस्ते हाती घेण्यात यावेत याबाबतचे निकष निश्चित करण्यात आले असून त्यानुसार संबंधीत रस्त्यावर किमान ४००० पी.सी.यू.पेक्षा अधिक वाहतूक वर्दळ असावी,सदर रस्ता पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागातून जाणारा नसावा ,तसेच त्या भागाचा गरिबी निर्देशांक, मनुष्यविकास निर्देशांक इत्यादी निकष विचारात घेतले जातात.सदर निकषांची पुर्तता व निधीची उपलब्धता आणि कामांचा प्राथम्य क्रम विचारात घेऊन सदर रस्त्याचे काम आशियाई विकास बँक अर्थसहाय्य योजनेच्या टप्पा-२ मध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन उचित निर्णय घेईल.

श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल एस.नार्वेकर मा.विधानसभा सदस्य यांनी खालीलप्रमाणे लक्षवेधी सुचना क्र.१४ उपस्थितीत केली आहे.

"दि.२६/११/२०२१ रोजी उच्चस्तरीय सचिव समितीने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या आस्थापनेवरील उच्चस्तरीय सचिव समितीने १३९१ पदांना मंजूरी दिलेली असणे, विभागातील एकूण ४९९ पदे निरसित करण्यात येणे, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राचा विचार करता, सततची वाढणारी लोकसंख्या, मुंबईवर कोसळणारी नैसर्गिक आपत्ती, तसेच कर्मचारी/अधिकारी यांचेवर कामाचा मोठा ताण पडणार असून कर्मचारी शासनाच्या महत्त्वाकांशी योजना जनतेला परवू न शकणे, विभागातील पदे कमी झाल्यास शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यास मोठया अडचणी निर्माण होण्याची शक्यता, अन्नधान्य, केरोसीन, बायोडिझेल व वेळोवेळी नियंत्रित करण्यात येणाऱ्या शिधाजीन्यांचा काळाबाजार रोखणे शक्य होणार नाही, हा काळाबाजार रोखण्यास कर्मचारी कमी पडल्यास जनता त्यांच्या हक्कापासून वंचित राहणे, हा विभाग लोकाभिमुख व गोरगरीब जनतेला अन्नधान्य पुरविणारा असल्याने या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे कमी करु नये यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

मा. श्री.छगन भुजबळ

मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे निवेदन

दि. २६ जून, २००३ च्या आकृतीबंधानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचे एकूण १८९० पदे मंजूर केली होती. वित्त विभागाच्या दि.२९ जून, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये माहिती तंत्रज्ञानावर आधारित विविध माध्यमातून गतिमानता आणण्यासाठी प्रयत्न करुन एकूण मानव संसाधनाची मागणी ३० टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट विहित केले होते. त्यानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीसमोर दि.३०.०७.२०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी विभागाने १४८१ पदे प्रस्तावित केली. परंतु उपसमितीने १३१४ इतक्या पदांना मान्यता दिली होती. त्यानंतर विभागाने उच्चस्तर सचिव समितीसमोर दि.११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीत सुधारित आकृतीबंध सादर केला. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई या कार्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने १३१४ पदांना मंजूरी दिली होती.

त्यानंतर मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७.१२.२०२० रोजीच्या झालेल्या बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाचा आकृतीबंध फेरसादर करण्यात यावा अशी सूचना मा. मंत्री अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी दिली होती. त्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा विभागाने १६३४ पदांचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीसमोर दि. ३०.०९.२०२१ रोजी सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयामध्ये बदल करण्याची बाब असल्यामुळे सदर सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याची सूचना उपसमितीने केली.

त्यानुषंगाने मा.सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या समवेत दि.२५.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा १३९१ एवढया पदांचा (उच्चस्तरीय सचिव समितीने दि. ११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये पदांना दिलेल्या मंजूरीपेक्षा ७७ वाढीव पदांचा) सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर दि. २६.११.२०२१ रोजीच्या बैठकीत दुसऱ्यांदा ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी १३९१ पदांना मंजूरी दिली आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी उच्चस्तरीय सचिव समितीने दि.११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये पदांना दिलेल्या मंजूरीपेक्षा दि. २६.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एकूण ७७ वाढीव पदांना मंजूरी दिली आहे.

सदर पदांचे विवरण पुढीलप्रमाणे:-

अ.क्र	पदाचे नाव	दि.२६.६.२००३ च्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे	उच्चस्तरीय सचिव समितीने दि.११.०९.२०१९ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली पदे	उच्चस्तरीय सचिव समितीने दि.२६. ११. २०२१ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली पदे	पद संख्येत वाढ
१	शिधावाटप अधिकारी/ मुख्य निरीक्षण अधिकारी	६०	५९	६४	+५
२	सहा. शिधावाटप अधिकारी / कनिष्ठ लेखापाल	१६०	१५२	१६०	+८
३	शिधावाटप निरिक्षक/ वरिष्ठ लिपिक	६८३	४१६	४४८	+३२
४	लिपीक-टंकलेखक	५९४	३९७	४२९	+ ३२
	नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई				
	एकूण	१८९०	१३१४	१३९१	+७७

मुन ००५१-१३

सार्वजनिक वितरण व्यवस्थेची संगणीकरण करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये लाभार्थ्यांना PoS (Point of Sale) यंत्राद्वारे अन्नधान्याचे वितरण करण्यात येत असल्याने पात्र लाभार्थ्यांची सुनिश्चिती होते. PoS यंत्राद्वारे होणाऱ्या व्यवहारामुळे वापरात नसलेल्या शिधापत्रिकांची माहिती उपलब्ध होते. रेशनिंग कार्ड व्यवस्थापन प्रणाली मुळे शिधापत्रिका संबंधित विविध सेवांच्या ऑनलाईन प्रक्रिया करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारे कमी मनुष्यबळाचा वापर करुन अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. विभागाची शिवभोजन थाळी योजनेमध्ये सीसीटिव्ही कॅमेरा, जीओ फेन्सिंग व आयब्लिंक फोटो अशा तंत्रज्ञानाच्या मदतीने पर्यवेक्षण करण्यात येते. अन्नधान्य वाहतुक करणाऱ्या वाहनांना GPS प्रणाली बसविल्याने कमी कर्मचाऱ्यांसह अन्नधान्य वाहतुकीवर देखरेख व नियंत्रण अधिक चांगल्याप्रकारे करणे शक्य झाले आहे. कोरोना महामारी मध्ये लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियामांतर्गत व पंतप्रधान गरीब कल्याण योजने अंतर्गत यशस्वीरित्या अन्नधान्यांचे वाटप करण्यात आले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियिमांतर्गत मुंबई/ठाणे क्षेत्रासाठी माहे जानेवारी, २०२२ एकूण उचलीच्या १००% व माहे फेब्रुवारी, २०२२ एकूण उचलीच्या ९५.६३% वाटप करण्यात आले आहे. पंतप्रधान गरीब कल्याण योजनेअंतर्गत मुंबई/ठाणे क्षेत्रासाठी माहे जानेवारी, २०२२ एकूण उचलीच्या १००% व माहे फेब्रुवारी, २०२२ एकूण उचलीच्या ९५% वाटप करण्यात आले आहे. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे अखत्यारितीतील मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसिनची मागणी नाही. मुंबई व ठाणे क्षेत्रात (गहू+तांदुळ) या जीवनावश्यक वस्तुंचा अपहार करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ नुसार दि.२४.०९.२०२१ ते दि.२८.०२.२०२२ या कालावधीत ७ ठिकाणी गुन्हा नोंदविला असून एकूण रु.५,२२,३७,०७६/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच अवैध पेट्रोलियम पदार्थ विक्री करणाऱ्या १० ठिकाणी गुन्हा नोंदविला असून यामध्ये एकूण रु.४,८८,००,३९१/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

यावरुन सद्य:स्थितीत उपलब्ध असलेले अधिकारी/कर्मचा-यांच्या मदतीने मुंबई व ठाणे क्षेत्रातील अन्नधान्य काळाबाजार करणाऱ्यांवर प्रतिबंध करण्यात येतो व अन्नधान्याची उचल व वाटप सुरळीत होत आहे.

****

गृह विभाग

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. धर्मरावबाबा अत्राम, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

"शासनाच्या बीपीएल आणि एपीएल, अंत्योदय या योजनेअंर्तगत स्वस्त धान्य दुकानावर(रेशनिंग) वाटप केला जाणारा गहू, तांदूळ गोरगरीब जनतेला वितरीत होण्याऐवजी रेशनिंगमाफियांमार्फत रवा, मैदा तयार करणा-या अवैधरित्या मीलवर पाठविल्या जात असल्याच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त होत असणे, त्यानुसार मुंबईच्या चित्ताकॅम्प रोड, मानखुर्द येथील खासगी गोदामातून रेशनिंगचा गहू, तांदूळ इ. भिंवडी येथील जय आनंद फुड पडघा मिल येथे पाठविला जात असताना पोलीसांनी नवी मुंबईतील वाशी, (अभ्युदय बँकेसमोर) येथे १२०० गोण्या घेऊन निघालेला टेम्पो मुद्देमालासह दि.२२ जानेवारी, २०२२ रोजी पकडण्यात आल्याचे निदर्शनास येणे, अशाप्रकारे यापूर्वीही रेशनिंगचा काळा बाजार करणाऱ्या मिल मालकांवर पोलिसांनी गुन्हे नोंदविण्यात येणे, परंतु त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई झाली याबाबतची अनभिज्ञता असणे, त्यामुळे गोरगरीब जनतेसाठी शासनामार्फत अन्नधान्य पुरवठा होत असतांना रेशनिंग माफियांकडून होत असलेली लूट व काळाबाजार, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब, रेशनिंगमाफियांवर कायदयांची जरब म्हणून प्रस्तुत प्रकरणांसह अन्य अशाच प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

मा.गृह मंत्री महोदयांचे निवेदन

दिनांक २१.०१.२०२२ रोजी शिधावाटप कार्यालय क्र.४१/फ वाशी या कार्यालयाच्या क्षेत्रात अवैधरित्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत शिधा पत्रिकेवर वितरीत करण्यात येणारे धान्य वाहतूक करणाऱ्या टेम्पो बाबत पुरवठा विभागास प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे पाळत ठेवून सदर टेम्पोची वाशी कोपरखैरने रोडवर अडवून चौकशी केली. आरोपी वाहन चालकाकडे टेम्पोतील धान्याबाबत आवश्यक कागदपत्रे मागितली असता कुठलीही कागदपत्रे मिळाली नाहीत. याबाबत वाहनचालकाकडे चौकशी केली असता टेम्पोतील धान्य हे मानखुर्द येथील खासगी गोदामातील शासकीय गोण्यामधून इतर गोण्यामध्ये अगोदरच भरुन ठेवले असल्याचे सांगितले. सदर धान्य हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत शिधा पत्रिकेवर वितरीत करण्यात येणारा शासन अनुदानीत दराचा तांदुळ व गहु असून काळया बाजारात विक्री करण्याकरीता घेऊन जात असताना मिळून आला. याबाबत पोलीस स्टेशन, वाशी येथे गु.र.नं.२१/२०२२ जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३,७,१० अन्वये दिनांक २२/०१/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी ३ आरोपीपैकी २ आरोपीस जामिन मिळाला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

तसेच दि. ३१/०१/२०२२ रोजी जुने पुणे-मुंबई रोडवरील पळस्पे फाटा पनवेल ता. पनवेल याठिकाणी सुमारे ६,००,०००/- रुपये किमतीचा अंदाजे ३० टन वजनाचा सरकारी रेशनिंगचा तांदुळ विक्री करण्याकरीता विजापुर कडुन अहमदाबाद येथे ट्रक मधून कोणत्याही कागदपत्राशिवाय घेऊन जात असताना मिळून आल्याने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.७६/२०२२ जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३,७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील एकूण ५आरोपीपैकी ३ आरोपींनी मा. सत्र न्यायालय, पनवेल येथे अटकपुर्व जामिन अर्ज केला असून अर्जावर सुनावणी प्रलंबित आहे. उर्वरीत २ आरोपींना सीआरपीसी कलम ४१ (१) (अ) प्रमाणे नोटीस देवून प्राथमिक तपास करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचेकडील सूचनेनुसार मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात शिधावस्तूंच्या अपहाराच्या घटना घडू नये म्हणून परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या अधिनिस्त अधिकृत शिधावाटप दुकानांच्या नियमित/आकस्मिक तक्रारीवरुन तपासण्या घेवून त्यांचेविरुध्द वेळीच कारवाई करण्यात येते.

शिधावाटप यंत्रणेतील अधिकृत शिधावाटप दुकानांविरुध्द सन २०२१-२०२२ या कालावधीत एकूण ८९८७ तपासण्या घेण्यात आल्या असून त्यापैकी १७७८ दुकानात तपासणीत दोष आढळून आले असून सदर दुकानांची खातेनिहाय चौकशी करून प्रकरणातील गुणवत्तेनुसार ४८ दुकानांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले आहे. तसेच १५ दुकानांचे प्राधिकारपत्र निलंबित करण्यात आले आहे. तसेच गंभीर दोष आढळून आलेल्या एकूण १७ दुकानांच्या प्राधिकारपत्रधारकाविरुध्द फौजदारी कारवाई करुन गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच शिधा वस्तूंची अवैध साठवणूक व अवैध वाहतूक करणाऱ्याविरुध्द १० गुन्हे दाखल करुन मुद्देमाल व एकूण ९ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

शिधाजिन्नसांचा अपहार होवू नये म्हणून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत असून दोषी अधिकृत शिधावाटप दुकानदारांविरुध्द वेळीच कारवाई करण्यात येत असून शिधावाटप प्रशासनाकडून दक्षता पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

****

गृह विभाग

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. विकास ठाकरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

"वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) मध्ये प्रवेशाकरीता माहे मे २०१९ मध्ये नीटचे परिक्षा घेण्यात येणे, माहे जुन २०१९ मध्ये वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) निकाल लागणे, याच कालावधीमध्ये स्कायटेक प्रा.लि., भोसले टेरेस बिल्डींग, घोले रोड, शिवाजी नगर, पुणे यांची इंटरनेटवर प्रवेश मार्गदर्शना करीता जाहिरात येणे, कुमारी मंरीश खत्री, कुमार अक्षय रूपेश दुबे, कुमार आदित्य रविंद्र चौधरी व कुमारी ऋतुजा अनिल रोकडे यांच्या प्रवेशासाठी संस्थेचे संचालक श्री. कुमार यांचेशी संपर्क करणे, श्री. कुमार व त्यांचे भागीदार श्री. रंजन यांनी खाजगी वैद्यकिय महाविद्यालयामध्ये प्रवेशाबाबत आश्वस्त करणे, एम.बी.बी.एस. करीता प्रत्येकी रु. ५.०० लक्ष व बी.ए.एम.एस करीता रु. ३.०० लक्ष इतक्या अग्रीम रकमेची मागणी करण्यात येणे, विद्यार्थ्यांचे पाल्यांनी आर.टी.जी.एस. चे माध्यमातुन वरील रक्कम देण्यात येणे, त्याऐवजी प्रवेश न मिळाल्यास संस्थेचे संचालकांनी स्कायटेक संस्थेचा आगामी तारखेचा चेक देण्यात येणे, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जागा शिल्लक नसल्याचे कारणास्तव बाहेर राज्यातील महाविद्यालयामध्ये प्रवेशाकरीता अधिकच्या रक्कमेची मागणी करणे तथा विविध राज्यामध्ये प्रवेशाकरीता बोलाविण्यात येणे, वारंवार रक्कमेच मागणी करणे, प्रवेश मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांचे पालकांनी दिलेल्या रक्कम परत करण्याची मागणी करणे, स्कायटेक प्रा.लि., च्या संचालकांनी रक्कम परत करण्यास नकार देणे तथा धमकी देणे, याबाबत पालकांनी पोलीस आयुक्त, पुणे यांना दि २४ ऑगष्ट २०२१ रोजी तक्रार देणे, विद्यार्थ्यांचे एक वर्षाचे झालेले नुकसान तथा रक्कम परत मिळण्याने विद्यार्थ्यांचे पाल्यांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

मा.गृह मंत्री महोदयांचे निवेदन

वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) मध्ये प्रवेशाकरीता जुन २०१९ पासून स्कायटेक प्रा.लि.घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे या कंपनीचे प्रतिनिधी व त्यांचे भागीदार यांनी संगनमत करुन फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे पाल्यांना मेडीकल कॉलेजला ॲडमीशन व सीट बुकींगसाठी प्रत्येकी रुपये ५ लाख व बीएएमएस साठी रूपये ३ लाख ॲडव्हान्स रकमेची मागणी केली. त्याप्रमाणे फिर्यादी व इतर साक्षीदार यांनी १८ लाख रु. आरटीजीएस व्दारे भरुनही पाल्यांचे ॲडमीशन केले नाही. तद्नंतर राज्याबाहेर इंदोर येथील मेडीकल कॉलेजला ॲडमीशन मिळवून देतो असे आश्वासन देवून त्यांना ४७ लाख ७० हजार रुपये भरण्यास सांगून एकूण ६५ लाख ७० हजार रु.ची आर्थिक फसवणूक केली आहे.

स्कायटेक प्रा.लि.घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे या कंपनीच्या प्रतिनिधी कडून वैद्यकीय अभ्यासक्रम (एम.बी.बी.एस.) मध्ये प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान तथा रक्कम परत न मिळण्याबाबत फिर्यादी यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना दिनांक २४.०८.२०२१ रोजी तक्रार अर्ज दिला. सदरच्या तक्रारीवरुन डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ३०/२०२२ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ अन्वये दि.०७/०३/२०२२ रोजी गुन्हा नोंदविला असून सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

****

लक्षवेधी सूचना-१९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. अमित साटम, श्री. सुभाष देशमुख, वि. स. स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना-

"पॉर्नोग्राफिक व्हिडीओचे चित्रीकरण करून ते वेबसाईटवर अपलोड करण्याचे रॅकेट मुंबईत उघडकीस आले असणे, सदर प्रकरणात आतापर्यंत अभिनेत्री गहना वशिष्ठसह ९ जणांना अटक झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती बरीच मोठी असणे, चित्रपट, मालिका तसेच वेब सीरीजमध्ये संधी मिळवून देण्याच्या नावाखाली तरूण-तरूणींचे अश्लील व्हिडीओ पॉर्न साईटवर अपलोड करीत लाखोंची कमाई करणा-या रॅकेटचा मुंबई पोलिसांच्या मालमत्ता कक्षाने पर्दाफाश केला असणे, गहनाचे स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस असणे, गहना वेब सीरीज, शार्ट फिल्मच्या नावाखाली पॉर्नोग्राफिक व्हिडिओ तयार करून ते वेबसाईटवर अपलोड करायची असा तिच्यावर आरोप असणे, सदर आरोपाखाली पोलिसांनी गहनाला अटक केली असणे, अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे पती राज कुंद्रा यांच्या विआन इंडस्ट्रीजमध्ये व्यवस्थापकीय संचालक असलेला उमेश कामत याला ही अटक करण्यात आली असणे, मालवणी पोलिस ठाण्यात झारखंडच्या १९ वर्षीय तरूणीने तक्रार दाखल केली असून रोवा खान ऊर्फ यास्मीन खान विरुध्द स्वतंत्र गुन्हा नोंद करण्यात आला असणे, यामध्ये प्रोड्युसर, डायरेक्टर, मॉडेल रीवा खान ऊर्फ यास्मीनचा पती शान बॅनर्जी ऊर्फ दीपंकर खसनवीस यालाही अटक करण्यात आली असणे, पॉर्नव्हिडिओ तयार करण्याच्या कारवाया खुलेआम होत असतांना त्यासोबत अन्य गंभीर गुन्हेही त्याला चिकटत असणे, बॉलिवूडमध्ये नशीब आजमावण्यासाठी आलेल्या तरूण-तरुणींना हेरून वेबसिरीज, चित्रपट, मालिकामध्ये काम देण्याच्या बहाण्याने तथाकथित प्रॉडक्शन हाऊस त्यांचे शोषण करीत असणे, गेल्या पाच महिन्यात लॉकडाऊनच्या कालावधीत भारतात चाइल्ड पॉर्नोग्राफीशी संबंधित २५ हजार मटेरियल अपलोड करण्यात आले असणे, त्यात प्रथम दिल्ली नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागत असणे, सदर अश्लीलतेचा हा मोठा उद्योग बिन बोभाट सुरू असणे, यावर प्रभावीपणे पायबंद घालण्यासाठी प्रयत्न आणि नियोजन करणे तसेच कलेच्या नावाखाली चाललेला हा काळा धंदा नेस्तनाबूत करण्यासाठी सायबर ॲक्टमध्ये सुधारणा करण्याची तीव्र गरज निर्माण झाली असणे, तसेच पॉर्नोग्राफी फिल्म बनवणा-या प्रॉडक्शन हाऊस व संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई तसेच उपाययोजना व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

मंत्री (गृह) यांचे निवेदन

'मढ गांव, मालाड-मालवणी (पश्चिम), मुंबई येथील भाड्याने घेतलेल्या बंगल्यामध्ये काही लोक तरूण स्त्री-पुरुष कलाकारांचे अर्धनग्न, विवस्त्र व अश्लिल बिभत्स चित्रीकरण करणार आहेत आणि सदर चित्रीकरण विविध वेबसाईटवर, ॲप्लीकेशनवर प्रसारित करणार आहेत,' या गुप्त माहितीच्या आधारे मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने दिनांक ०४.०२.२०२१ रोजी त्या ठिकाणी छापा घातला.

त्यावेळेस अश्लिल फिल्मचे चित्रिकरण करताना एकुण ५ आरोपी आढळून आले. पोलीसांनी सदरील ५ आरोपींना अटक केली आणि १ पिडीतेची सुटका केली. याप्रकरणी मालमत्ता कक्षाच्या वतीने मालवणी पोलीस स्टेशन येथे दिनांक ०५.०२.२०२१ रोजी गु. र. क्र. १०३/२०२१, कलम ३५४ (क), २९२, २९३, ४२०, २०१, ३४ भादंवि सह कलम ६६ (इ), ६७, ६७ (अ), माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारणा) २००८, सह कलम ३, ४, ६, ७ स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६ अन्वये गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्यात अटक केलेल्या ५ आरोपींच्या चौकशीतून निष्पन्न झालेल्या अन्य ६ आरोपींना देखील अटक करण्यात आली. सदरील गुन्हा मालमत्ता कक्ष, गुन्हे अन्वेषण शाखा यांचेकडे वर्ग करण्यात आला असून गु. र. क्र. २६/२०२१ अन्वये नोंदविण्यात आला असून सदर गुन्हा तपासाधीन आहे. यानुषंगाने, मालवणी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. र. क्र. १२३/२०२१, गु. र. क्र. १०९७/२०२१, गु. र. क्र. ११२/२०२१ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले असून सदरील गुन्हे तपासाधीन आहेत.

पिडीत महिलेस काम देण्याचे प्रलोभन दाखवून दमदाटी करून अश्लील, बिभत्स फिल्म चे चित्रिकरण करून सदर चित्रिकरण प्रसारित केल्याप्रकरणी अर्नाळा सागरी पोलीस ठाणे, जि. पालघर यांचेकडे दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने गु. र. क्र. ००/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करून, सदर गुन्हा लोणावळा पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे. लोणावळा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ३८/२०२१ कलम ३७६, ३७७, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि सह कलम ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारणा) २००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपी हे मालवणी पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल गु. र. क्र. १०३/२०२१ मध्ये देखील आरोपी आहेत.

इंटरनेटचा गैरवापर करून युट्युबवर अश्लिल व्हिडिओ प्रसारित करणा-या ९ युट्युब चॅनेल विरूध्द पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु. र. क्र. १६/२०२१ आणि इंन्स्टाग्राम या समाज माध्यमाच्या २२ टिपलाईन या खातेधारकांनी बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०४/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. व्हाट्सअप या समाज माध्यमाचा वापर करून बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पश्चिम सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०१/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

फेसबुक या समाज माध्यमाद्वारे बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पूर्व प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे

वि. स्था. गु. र. क्र. ०१/२०२१ आणि mx Takatak App द्वारे बालकांच्या लैंगिक शोषणाबाबतचे अश्लिल व लैंगिक भावना चालविणारे व्हिडिओ/ फोटो प्रसारित करणा-या विरूध्द पूर्व प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, मुंबई येथे वि. स्था. गु. र. क्र. ०२/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नॅशनल क्राईम रेकार्डस ब्युरो (एनसीआरबी), नवी दिल्ली यांच्याकडून जुलै २०१९ ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये ऑनलाईन बाल लैंगिक अत्याचाराबाबतच्या २० सीडी महाराष्ट्र सायबर यांच्या कार्यालयास प्राप्त प्राप्त झालेल्या आहेत. सदर २० सीडीमध्ये एकूण ११५४७ चाईल्ड पोर्नोग्राफी संदर्भातील टीपलाईन्स ध्वनिचित्रफिती (व्हिडिओ) याबाबतची माहिती पुढील कार्यवाहीस्तव संबंधित पोलीस आयुक्तालये आणि जिल्हा पोलीस घटकांना पाठविण्यात आली आहे. याबाबत ऑपरेशन ब्लॅक फेस हे अभियान राबविण्यात आले असून या अंतर्गत भारतीय दंड विधान संहिता, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ आणि माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. यासंदर्भात राज्यामध्ये २२९ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये १०६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

महिला व बालकांना सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्याकरिता मुंबई येथे न्यायसहाय्यक प्रयोगशाळा व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. याकरिता रु. ४.५८ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण केंद्राद्वारे पोलीस अधिकारी व कर्मचारी, सरकारी अभियोक्ता व न्यायविषयक अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सायबर गुन्हे रोखण्याकरिता शासन सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, शिक्षक, नागरिक यांच्याकरिता सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृतीचे कार्यक्रम/उपक्रम राबविण्यात येत आहेत. सदर जनजागृती कार्यक्रम/उपक्रमांमध्ये ६४,२३४ नागरिकांनी सहभाग घेतला आहे. सायबर सेफ वुमन, ॲन्टी फिशिंग पोर्टल, ब्लॅक फेस आपरेशन, इ. उपक्रम राबविण्यात येत आहेत. सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत भारतीय दंड विधान संहिता, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ आणि माहिती व तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात शहरात गेल्या कित्येक वर्षांपासून अवैध धंदे सर्रासपणे सुरु असल्याची बाब जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास येणे सोलापूर अधीक्षक यांच्या पथकाने वारंवार यावर कारवाई करणे परंतु कारवाई झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सदरहू धंदे पुन्हा सुरु असणे तसेच सोलापूर पोलीस अधीक्षक पथक कारवाई करत असताना स्थानिक अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस त्यांना सहकार्य मदत करण्याची गरज असतानाही न करणे, परिणामी विभागातील रहिवाशांना शासन प्रति पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

♦♦♦

गृह विभाग

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
विधानसभा सन २०२२ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन

सर्वश्री. दिपक चव्हाण, श्री. अनिल पाटील, श्री. राजु कारेमोरे, श्री. मनोहर चंद्रिकापुरे, श्री. धर्मरावबाबा अत्राम, श्री. इंद्रनिल नाईक, श्री. चंद्रकांत नवघरे, श्री. नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, श्री सुनिल भुसारा, श्री.दौलत दरोडा, श्री अतुल बेनके, श्री दिलीप मोहिते-पाटील, श्री अशोक पवार, श्री. सुनिल शेळके, श्री अण्णा बनसोडे, श्री सुनिल टिंगरे, श्री चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, श्री. आशुतोष काळे, श्री निलेश लंके, श्री संग्राम जगताप, श्री रोहित पवार, श्री प्रकाश सोळंके, श्री संदिप क्षीरसागर, श्री बाळासाहेब आजबे, श्री बाबासाहेब पाटील, श्री बबनराव शिंदे, श्री यशवंत माने, श्री मकरंद जधव-पाटील, श्री शेखर निकम, श्री मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील व श्री सुनिल प्रभू, मा. वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

"दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास पुणे येथील येरवडा येथे पुणे-नगर-रस्त्यावर शास्त्रीनगर चौकाच्या अलिकडे फारुक फ्रामजी वाडिया यांच्या जागेत ब्ल्यू ग्रास बिझनेस पार्क या बांधकाम साईटवर नियोजित व्यावसायिक संकुलाच्या इमारतीच्या पाया बसविण्यासाठी लोखंडी जाळी तयार करण्यात आलेली असणे, सदर जाळी अचानकपणे कोसळून झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत पाच मजुरांचा जागीच मृत्यु होऊन अन्य चौघेजण गंभीर जखमी होणे, त्याप्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीत मजुरांच्या मृत्युला संबंधित बांधकाम कंपनी, ठेकेदार जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणे, दरम्यानच्या काळात मृतंच्या कुटुंबियांना शासनाने प्रत्येकी ५ लाख इतकी आर्थिक मदत जाहीर करण्यात येणे, तसेच सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येणे, सदर नेमलेल्या चौकशी समितीचे कामकाज पुर्ण होऊन समितीने आपला अहवाल सादर केला असल्यास, सदर अहवालात नमूद करण्यात आल्याने बाबींचे अनुषंगाने शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही, तसेच शासनाने जाहीर केलेल्या आर्थिक मदत वाटप प्रकरणी केलेली वा करण्यात आलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

.....

मा.गृह मंत्री यांचे निवेदन

दि.०३/०२/२०२२ रोजी येरवडा येथील प्लॉट नं. ३ टॉवर बी कल्याणीनगर येथे फारुख वाडीया यांच्या जागेत चालु असलेल्या ब्ल्यू ग्रास बिझनेस पार्क, पुणे नगर रोड, शास्त्रीनगर चौक,येरवडा पुणे येथील बांधकाम साईटवर लोखंडी सळईच्या जाळीखाली काम करीत असताना सदरची लोखंडी सळईची जाळी अचानक कोसळून झालेल्या दुर्दैवी दुर्घटनेत पाच मजुरांचा जागीच मृत्यु होऊन अन्य चार जण गंभीर जखमी झाले आहेत. सदर दुर्घटनेबाबत येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ४४/२०२२ भा. दं. वि. कलम ३०४, ३३६, ३३७, ३३८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर दुर्घटनेस जबाबदार असणारे सुरक्षा इंजिनियर, लेबर सुपरवायझर, साईट इंजिनियर, साईट मॅनेजर या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) नियम, २००७ चा नियम क्र.२६३ (१) अन्वये सदरील आस्थापनेचे काम बंद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेमार्फत विशेष बाब म्हणून प्रत्येक मयत कामगारांच्या कायदेशीर वारसास रुपये ५ लाख व जखमी कामगारास २ लाख एवढे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. कंत्राटदार मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्टस इंडिया लि. यांनी मयत पाच कामगारांच्या कुटुंबियास रोख रुपये २.५ लाख आणि रुपये ५० हजार मृत कामगारांच्या अंत्यविधीकरीता दिले आहे. तसेच सदर घटनेत जखमी झालेल्या चार कामगारांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती कंत्राटदार मे. अहलुवालिया कॉन्ट्रॅक्टस इंडिया लि. यांचेव्दारे करण्यात आली आहे. सदर जखमी कामगारांना कंत्राटदारातर्फे माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंतचे

वेतन अदा करण्यात आले आहे. तसेच आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३, पुणे यांचेकडून ५ मृतांच्या कायदेशीर वारसांना रुपये ७५,९१,६५०/- इतक्या रक्कमेची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली १० तज्ञ अधिकारी यांची तांत्रिक तथ्यशोध समिती गठीत केली आहे. सदर समिती मार्फत आवश्यकतेनुसार तज्ञाची नेमणूक करुन व सुनावणी घेऊन अंतिम अहवाल सादर करण्यात येणार आहे.

****

सन २०२२ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, मा. वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४६ पुढीलप्रमाणे आहे :-

"जैश-ए-मोहम्मद च्या दहशतवाद्याने काही महिन्यांपूर्वी महाल येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आणि रेशीमबाग येथील स्मृती मंदिराची रेकी केल्याची माहिती मिळालेली असणे, घटनेचे गांभीर्य पाहता उपराजधानीतील सर्व महत्वपूर्ण स्थळांची सुरक्षाव्यवस्था वाढविली असणे, नागपूर हे दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असणे व यापूर्वी येथील संघ मुख्यालयावर दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न झालेला असणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिसराची जैश-ए-मोहम्मद या आतंकवादी संघटनेकडून रेकी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याच्या वृत्ताला नागपूर पोलीसांनी देखील दुजोरा दिलेला असणे, रेकी करणाऱ्या व्यक्तीने गेल्या वर्षी जून किंवा जुलै महिन्यात दोन दिवस नागपुरात वास्तव्य केलेले असणे, त्यांनी काही छायाचित्रे गोळा केल्याचे सांगण्यात येत असणे, रेकी करणाऱ्यावर पाकव्याप्त काश्मिरमधून हॅन्डलरचे नियंत्रण असल्याचे व तो हॅन्डलर मोबाईलवर वेळोवेळी त्याला चित्रीकरणासंबंधी निर्देश देत असल्याचे उघडकीस येणे, जम्मू-काश्मीरमधील बांदीपुरा जिल्ह्यातील पोलस स्टेशन अंतर्गत ग्रेनेड बाळगल्याप्रकरणी एका तरुणाची चौकशी केल्यानंतर ही बाब समोर आलेली असणे, नागपूर पोलीसानी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविलेला असणे, संघ मुख्यालय व हेडगेवार स्मृती मंदिराची रेकी करणारा संशयित आतंकवादी रईसला नागपूरमध्ये आणून त्याची चौकशी करण्यात येणार असणे, या प्रकरणी राष्ट्रीय पातळीवर विविध तपास यंत्रणांशी समन्वय ठेऊन दहशतवादाचा एकजुटीने मुकाबला करण्याची आवश्यकता, नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाची व राज्यातील इतर महत्वाच्या स्थळांची सुरक्षा वाढविण्याबाबत व संबंधित दहशतवाद्याना शोधून त्यांचेवर कारवाई होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

मा. गृहमंत्री यांचे निवेदन

जम्मू-काश्मीर पोलीसांनी एका प्रकरणात एका दहशतवादी संघटनेशी संबंधित आरोपीस अटक केलेली आहे. सदर आरोपी हा दि. १३ ते १५ जुलै, २०२१ दरम्यान विमानाने नागपूर येथे आला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाची पाहणी करुन व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी करण्याच्या पाकिस्तानी हॅन्डलरच्या मिळालेल्या निर्देशानुसार आरोपी नागपूर येथे आला होता पण पोलीस बंदोबस्त चोख असल्यामुळे सदर आरोपीला सदर ठिकाणाची रेकी करण्यात यश मिळालेले नाही.

अशी माहिती मिळाल्यावर लगेच नागपूर पोलीसांकडून शहरातील सर्व महत्वाच्या स्थळांच्या सुरक्षिततेचा आढावा घेऊन सुरक्षेत वाढ करण्यात आली. पोलीस उप आयुक्त दर्जाचे अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एक टीम श्रीनगर येथे पाठविण्यात आली. आरोपीची सविस्तर चौकशी करुन मिळालेल्या माहिती वरुन नागपूर येथे पोलीस स्टेशन कोतवाली, नागपूर शहर येथे अप. क्र. ०३/२०२२ बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ कलम १८, २०, ३८, ३९ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तद्नंतर लगेचच सदर प्रकरणाचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे हस्तांतरित करण्यात आला असून दहशतवाद विरोधी पथक, पोलीस स्टेशन मुंबई, अप क्र. ०४/२२ कलम १८, २०, ३८, ३९ बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध)

अधिनियम, १९६७ अन्वये नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे. सदर आरोपीला महाराष्ट्रात आणून पुढील तपास करण्याची तजवीज ठेवली आहे.

नागपूरमध्ये अतिरेकी हल्ल्याला तोंड देण्यासाठी नागपूर शहर पोलीसांचे कायम सुरक्षा पथक व जलद प्रतिसाद पथक (क्यू.आर.टी.) आणि राज्याचे फोर्स वनचे पथक सुसज्ज स्थितीत असून वेळोवेळी भेट देतात. सदर परिसरात पोलीस बंदोबस्त अत्यंत सतर्क व चोख ठेवण्यात आला असून सुरक्षा व्यवस्था आणखी सतर्क करण्याच्या उद्देशाने तसेच कोणत्याही अतिरेकी हल्ल्यास तोंड देण्यासाठी सुसज्ज राहण्याच्या दृष्टीकोनातून योग्य कार्यवाही करण्यात आली आहे.

--- *** ---

महाराष्ट्र विधानसभा

श्री.रणधीर सावरकर वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४६६.

"अकोला शहरामधुन वाहणार्या मोर्णा तसेच अकोला शहरा लगतच खडकी, चांदूर इत्यादी गावालगत वाहणार्या विद्रुपा (मोर्णा नदीची उपनदी) या दोन्ही नदयांच्या पुरबाधीत क्षेत्रात अवैध लेऑऊट/जमीनी अकृषक करण्यास जलसंपदा विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र देणे, उक्त दोन्ही नद्यांच्या ब्लु झोन तसेच रेड झोनची आखणी नसताना सदर क्षेत्रातील जमिनी अकृषक करण्याचे प्रस्तावास महसुल विभाग, नगरविकास विभाग यांच्याकडून जलसंपदा विभागास नाहरकत प्रमाणपत्राची मागणी होणे उक्त प्रयोजनासाठी जलसंपदा विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, पुरबाधीत क्षेत्रात नागरी बांधकामे झाल्याने नदी प्रवाहाला बाधा पोहचविणार्या कृतींना अटकाव करुन कायदेशीर कार्यवाही करण्याचे सबंधीत मुख्य अभियंता यांना शासनाचे आदेश असणे, अकोला शहरात मोर्णा व विद्दपा नदीच्या पुरबाधीत निषिद्ध व नियंत्रित क्षेत्रात अवैध अकृषक मंजुरातील व लेआऊट मध्ये २१/२२ जुलै २०२१ रोजी महापुरामुळे नागरी वस्तीचे प्रचंड नुकसान होणे, जलसंपदा विभागाकडून लालपुर रेषा व निळयापुर रेषा बाबत नियमांचे पालन न करणे, सदर पुररेषांची आखणी न करणे, यामुळे नागरी वस्तींची झालेली वित्त हानी तसेच भविष्यातील जिवित व वित्त हानी लक्षात घेऊन शासनाची भुमिका वा करावयाची कार्यवाही."

मा.मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

मोर्णा नदीवर सन-१९७० मध्ये मोर्णा मध्यम प्रकल्प मौजा काकडदरी ता.पातूर जि.अकोला येथे जलसंपदा विभागामार्फत बांधण्यात आलेला आहे. मोर्णा नदी अकोला शहरातुन वाहत जाऊन पुढे पूर्णा नदीला नया अंदूरा या ठिकाणी मिळते. मोर्णा नदी प्रकल्प स्थळापासुन ते पूर्णा नदीला ज्या ठिकाणी मिळते त्याचे एकुण अंतर ७०.०० कि.मी. ऐवढे आहे. अकोला शहरातुन वाहणा-या मोर्णा नदीची अकोला महानगर पालीकेच्या हद्दीपर्यंतची एकुण लांबी ७.९० एवढी आहे. (मौजा कौलखेड गावठाण ते नायगांव गावठाण) मोर्णा नदीला वारंवार येणा-या पूरामुळे अकोला शहराच्या संरक्षणासाठी अकोला पूर संरक्षण योजनेअंतर्गत जलसंपदा विभागाकडुन सन-१९९८-९९ मध्ये अकोला पूर संरक्षण भिंत बांधण्यात आली. सदर पूर संरक्षण योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या भिंतीची एकुण लांबी (दोन भागात) भाग-१ = ५५०.०० मी. व भाग-२ = २५२० मी. एकुण लांबी = ३०७० मी. इतकी आहे. मोर्णा नदी निळी व लाल पूररेषा आखणी, अकोला महानगर पालीका हद्दीपर्यंतच सन-१९९४ मध्ये करण्यात आली आहे.

विद्रुपा नदीवर सन-२००६ मध्ये दगडपारवा लघु प्रकल्प मौजा दगडपारवा ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथे जलसंपदा विभागामार्फत बांधण्यात आलेला आहे. प्रकल्पाचा जिवंत पाणी साठा २१.६० द.ल.घ.मी. असून मोर्णा व विद्रुपा नदीच्या एकत्रित पुराच्या तिव्रतेमुळे अकोला शहरास पुराचा अधीक धोका होवु नये म्हणुन दगडपारवा धरणात ११.४१ द.ल.घ.मी. पुर साठवण क्षमता (Flood absorption capacity) ठेवण्यात आली आहे.

विद्रुपा नदी दगडपारवा प्रकल्पापासुन वाहत येऊन मौजा बार्शिटाकळी, आळंदा, कान्हेरी सरप, खडकी या गावातुन वाहत जाऊन मौजा सोमठाणा या ठिकाणी मोर्णा नदीला मिळते.

विद्रुपा नदी प्रकल्प स्थळापासुन ते मोर्णा नदीला ज्या ठिकाणी मिळते त्याचे एकुण अंतर २२.०० कि.मी. ऐवढे आहे.

दगडपारवा लघु प्रकल्प ज्यावर्षी बांधण्यात आला (सन-२००६ मध्ये) त्यावर्षी दगडपारवा प्रकल्पाचा आपत्कालीन कृती आराखडा जलसंपदा विभागाकडुन तयार करण्यात आला. या आपत्कालीन कृती आराखडयानुसार मौजा बार्शिटाकळी, आळंदा, कान्हेरी सरप, खडकी गावाचा समावेश आहे. प्रकल्पाच्या आपत्कालीन कृती आराखडयाच्या नकाशावर निळी व लाल पूररेषा दर्शविण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे जलसंपदा विभागाकडे मोर्णा व विद्रुपा नदीचे उपलब्ध असलेले नकाशे मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे मा.आयुक्त, अकोला महानगर पालीका, अकोला तसेच नगर रचनाकार, अकोला यांना यापूर्वीच पूरविण्यात आलेले आहे. उपलब्ध असलेल्या नकाशाप्रमाणे ऐखादे क्षेत्र / भुखंड / सदनिका मोर्णा व विद्रुपा नदीच्या निळी व लाल पूर रेषेच्या आत येते किंवा कसे याबाबतचा केवळ अहवाल मागणी नुसार देण्यात आलेला आहे.

दि. २१ व २२ जुलै २०२१ रोजी दगडपारवा धरणा खालील अकोला व लगतच्या पाणलोट क्षेत्रात अतीवृष्टी झाली होती. दि.२१ व २२ जुलै २०२१ रोजी अकोला व लगतच्या परिसरात झालेल्या अतिवृष्टी पूर्वी कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने किंवा अकोला महानगर पालीका यांनी मोर्णा व विद्रुपा नदीची निळी व लाल पूर रेषा आखणी करुन मिळणेबाबत मागणी केलेली नाही.

दि.२१ व २२ जुलै २०२१ रोजी अकोला व लगतच्या परिसरात झालेल्या अतिवृष्टी मुळे अकोला व लगतच्या परिसरातील स्थानिक मालमत्तेचे, वसाहतीचे व शेत पिकांचे नुकसान झाल्याबाबत मा.जिल्हाधिकारी, अकोला तसेच मा.पालकमंत्री, अकोला यांनी दि.२३ जुलै रोजी स्थळ पाहणीचे अनुषंगाने घेतलेल्या आढावा बैठकीत मोर्णा व विद्रुपा नदीच्या पूररेषा (Blue line / Red line) निश्चिती करुन देणेबाबत जलसंपदा विभागास निर्देश देण्यात आले.

मोर्णा व विद्रुपा नदीच्या निळी व लाल पूररेषा आखणीच्या प्रस्तावास संबंधीत क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि.२८.१२.२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

त्यानंतर मोर्णा नदीच्या रु.४३,६४,१७०/- या रकमेच्या कामास व विद्रुपा नदीच्या रु.११,५०,५९६/- या रकमेच्या कामास संबंधीत क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी अनुक्रमे दि.२१.०१.२०२२ व दि.२४.०१.२०२२ रोजीच्या कार्यालयीन पत्रान्वये तांत्रीक मान्यता प्रदान केली आहे.

वरील दोन्ही कामांच्या निविदा काढण्यास कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी परवानगी दिली असून त्याबाबतची निविदा प्रकिया क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. संजय शिरसाट, विधान सभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.:-

"नाशिक, कोपरगाव येथील पाटबंधारे विभागात उपविभागीय पदावर असताना सागर शिंदे यांनी अभियंता श्री. मिसाळ यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन कॅनलच्या कामात प्रत्यक्षात काम न करता कोटयावधी रुपयांचा शासकीय निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदरहू अधिकारी यांनी त्र्यंबकेश्वर येथील घाट व गोदावरी नदीचा घाटाच्या बांधकामात स्टीलचे बार कमी वापरुन गैरप्रकार करुन भ्रष्टाचार करणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली असता सदरहू अधिकारी यांचेवर कारवाई न करता केवळ वेतनवाढ बंद करणे, अदयाप याबाबत चौकशीची कार्यवाही पूर्ण न होणे, जलसंधारण विभागात पदोन्नतीने कार्यकारी अभियंता पदावर रुजू झाल्यापासून सागर शिंदे या अधिकाऱ्याने मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात येऊन गिरणारे येथे ६ एकर जमीन विकत घेऊन व त्यावर आंब्याची लागवड करुन काही जागेत कोटयावधी रुपये किंमतीचा बंगला बांधण्यात येणे, पर्यटनाची कामे अधिकची जास्तीची टक्केवारी दिली नसल्यामुळे २/३ वर्षे तसेच पडून राहणे, तसेच शिंदे यांनी नाशिक पाटबंधारे विभागात दरवर्षी कॅनलचा गाळ काढणे, गवत काढण्याकरिता मिळणारा १०-१५ कोटी रुपये निधी प्रत्यक्षात कोणतेच काम न करता, काम केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात येऊनही हया कालव्यांमध्ये मोठया प्रमाणावर झाडे व गवत वाढलेले दिसत असणे, सदरहू कामात कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात येऊन शासकीय निधीचा मोठया प्रमाणात झालेला अपव्यय, कॅनलची दुरुस्ती व देखभाली अभावी या परिसरातील शेती सिंचनावर त्याचा झालेला अनिष्ट परिणाम, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या सर्व बाबींची व सागर शिंदे यांनी यापूर्वी केलेल्या सर्व कामांची गुणनियंत्रक व दक्षता पथकामार्फत चौकशी करुन श्री. सागर शिंदे व अभियंता श्री. मिसाळ यांना तातडीने निलंबित करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

श्री. जयंत पाटील, मा. मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

श्री. सागर शिंदे व श्री. सुभाष मिसाळ हे गोदावरी उजवा तट कालवा, उपविभाग राहता, जि.अहमदनगर येथे अनुक्रमे उपअभियंता व शाखा अभियंता पदावर सन २००८ ते २०१८ या कालावधीत कार्यरत होते.

सन २०१०-११ या कालावधीत गोदावरी उजवा तट कालवा उपविभाग, राहताचे उपअभियंता व शाखा अभियंता यांनी देखभाल दुरुस्तीची कामे करताना केलेल्या भ्रष्टाचाराबाबत श्री. उस्मानभाई के. शेख, उपाध्यक्ष, राष्ट्रीय काँग्रेस कमिटी, ता. येवला, जि. नाशिक यांनी दि. ३०/०५/२०११ च्या अर्जाद्वारे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांच्याकडून प्राथमिक अन्वेषण अहवाल मागविण्यात आला असता दक्षता पथकाने दि.१७/०४/२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सागर शिंदे, तत्का. सहा. अभियंता श्रे.१ व इतर ४ यांच्याविरुध्द म.ना.से.

[मु.मा.पृ.

सोटा H/1208 (700-3-22)

(शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ व १२ अन्वये एकत्रित कार्यवाही करण्यासाठी दि.२७.०२.२०१८ च्या शासन आदेशान्वये दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी ५ अधिका-यांनी व्यक्तीश: बाजू मांडून शासनास बचावाची निवेदने सादर केली. सबब दोषारोपांचे स्वरुप, अपचाऱ्यांची निवेदने विचारात घेऊन सर्व संबंधित अपचाऱ्यांविरुध्द दि.०४.०९.२०१८ च्याआदेशान्वये खालीलप्रमाणे शासनस्तरावरुन कारवाई करण्यात आलेली आहे :-

(१) श्री. सागर ज्ञानदेव शिंदे, तत्का.सहा. अभियंता श्रेणी-१ यांना पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षाकरिता रोखण्यात आली आहे.

(२) श्री.सुभाष कारभारी मिसाळ, तत्का. शाखा अभियंता यांना पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षाकरिता रोखण्यात आली आहे.

(३)श्री.सोमनाथ शालीग्राम गोंदकर, तत्कालीन सहायक अभियंता श्रेणी-२ यांना त्यांच्या निवृत्तीवेतनावर परिणाम न करता त्यांचे वेतन २ टप्प्याने ६ महिने कालावधीसाठी खाली आणण्यात आले आहे.

(४) श्री. सोपान त्र्यंबक घुले, (सेवानिवृत्त) सहायक अभियंता श्रेणी-२ यांच्याविरूद्धचे दोषारोप दि.०४.०९,२०१८ च्या आदेशान्वये मागे घेण्यात आले.

(५) श्री. भास्कर विश्वनाथ सुरळे, (सेवानिवृत्त) तत्का. सहा. अभियंता श्रेणी-२ यांना त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून दि.०१.०८.२०१९ च्या आदेशान्वये दरमहा २ % इतकी रक्कम एक वर्षाकरिता कपात करण्याची शिक्षा देण्यात आली.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीवर सन २०१५ मध्ये सिंहस्थ दरम्यान घाटाची कामे करण्यात आली. सदर कामे गुणनियंत्रण विभागाच्या देखरेखीखाली पार पाडलेली आहेत.

श्री. सागर शिंदे, कार्यकारी अभियंता यांच्या वैयक्तिक मालमत्तेबाबत त्यांनी शासनास वेळोवेळी मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केलेली आहेत.

पर्यटनाचे कोणतेही काम श्री. शिंदे यांचे कार्यकाळात मंजूर झालेले नाही. याउलट डिसेंबर २०२० मध्ये पर्यटन विभागासोबत करारनामा करून गंगापूर धरणावरील बोटक्लब कार्यान्वित करण्यात आलेला आहे. नाशिक पाटबंधारे विभागांतर्गत मोठे ५, मध्यम ६, लघु ३४ व १० कोप बंधारे असे एकूण ५५ प्रकल्प त्यांचेवरील सुमारे ४३० किमी लांबीचे मुख्य कालवे, ११५० किमी लांबीच्या वितरिका व त्यावरील एकूण १,००,७९५ हे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र येते. देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रकल्पांवरील यांत्रिकी भागांची दुरुस्ती तसेच प्रकल्प व कालव्याची नियमित व आकस्मिक देखभाल दुरुस्ती करण्यात येते. उपलब्ध निधीतून दरवर्षी कालव्याच्या काही ठराविक लांबीतील देखभाल दुरुस्ती करणे शक्य होते.

सदर प्रकल्प व कालव्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात आलेला निधी, निर्मित सिंचन क्षमता व वसूल करण्यात आलेली पाणीपट्टी खालील प्रमाणे आहे :-

वर्ष	निधी (लक्ष)	प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र (हे.)	पाणी पट्टी वसुली
२०१९-२०	१३०६.००	११७२४१	५७९७ लक्ष
२०२०-२१	१४४६.७९	१४६६२८	४७९९.७१ लक्ष

वरील सर्व धरणातील पाण्याची आवर्तने सुरळीतपणे पार पाडलेली आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.नरेंद्र भोंडेकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना पुढीप्रमाणे आहे:-**

"विदर्भातील महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या गोसेखुर्द प्रकल्पाची पूर्णत्वाकडे वाटचाल होत असताना त्यात अंतर्भूत असलेल्या बाबींकडे मात्र शासनाचे दुर्लक्ष होत असणे, मागील महिन्यापासून गोसे धरणात जलसाठा वाढविला जात असून २४५.५०० मिटर जलसाठा करण्याचे नियोजन केलेले असणे, परंतु जलसाठ्यात वाढ होत असल्याने धरणातील बॅक वॉटर ने भंडारा जिल्हयातील शहरासह एकूण २६ गावांच्या नदीकाठावरील जनतेच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत जाणे, नदीकाठावरील गावांना जोडणारे रस्ते, शेतात जाणारे पांदण रस्ते पाण्याखाली आलेले असणे, तसेच हजारो हेक्टर शेती पाण्याखाली आल्याने शेती पिकांची ही मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, कित्येक गावांच्या सभोवताल पाण्याचा वेडा असल्याने धरणातील जलचर प्राणी जसे साप विंचू व अन्य विषारी कीटक गावात घुसण्याचे प्रकार वाढणे, शहरातील व अनेक गावालगतच्या स्मशानभूमी पाण्याखाली आल्याने मृतदेहावर अंत्यसंस्कार कुठे करावे असा प्रश्न निर्माण होणे, शेतात जाणा-या रस्त्यावरुन पाणी साचल्याने शेतात जावे कसे हाही प्रश्न निर्माण झालेला असणे, तसेच अनेक गावातील पाणी पुरवठा करणारी नळ योजना धरणातील बॅक वॉटर च्या पाण्यात सापडली असल्याने जिल्हयातील नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आलेल्या असणे, या सर्व बाबींवर शासन प्रशासनाने डोळेझाक केलेली असणे, यावर आजता गायत कोणतीही उपायोजना केलेली नसणे, त्यामुळे भंडारा जिल्हयातील शहरासह एकूण २६ गावातील नागरिक तीव्र आंदोजन करण्याच्या भूमिकेत असणे, याबद्दल अनेक संघटनांनी शासनाला निवेदनही देण्यात येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन:-

भंडारा जिल्हयातील ३४ बाधित गावठाणापैकी मौजा-सावरगाव हे गाव स्वेच्छा पुनर्वसनातंर्गत पुर्णत: स्थलांतरीत झालेले आहे. उर्वरीत ३३ गावठाणाचे २७ पर्यायी गावठाणात पुनर्वसन करण्यात आले आहे. २७ पर्यायी गावठाणापैकी २२ पर्यायी गावठाणात १८ नागरी सुविधांची कामे पुर्ण झालेली असुन दि.०४.०१.२०१३ रोजी जिल्हा परिषद यांना हस्तांतरीत करण्यात आली आहेत. उर्वरीत ५ गावठणापैकी ३ पर्यायी गावठाण १) बाधित गावठाण मौजा-करचखेडा करीता पर्यायी गावठण मौजा-गिरोला व भिलेवाडा,२) बाधित गावठाण मौजा-सालेबर्डी व पांधी करीता पर्यायी गावठण मौजा-शहापुर ३) बाधित गावठाण मौजा-पिंडकेपार करीता पर्यायी गावठाण मौजा-बेला, या गावात १८ नागरी सुविधांची कामे पुर्ण करण्यात आलेली असुन सदर गावाचे जिल्हा परिषद यांना हस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत दोन मौजा-नेरला व खापरी (रे) गावांचे पुनर्वसन/भुसंपादन प्रक्रिया सुरु आहे.

बाधित कुटूंबाची सद्यस्थिती-

गोसीखुर्द प्रकल्पामुळे भंडारा जिल्हयातील एकुण बाधित होणा-या ६६३६ कुटुंबापैकी ४७२१ कुटुंबे स्थलांतरीत झालेले असुन उर्वरीत १९१५ कुटुंबांची स्थलांतरणाची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत

स्थलांतरीत करावयाची कुटुंबे ही गोसीखुर्द प्रकल्पाचे पुर्ण संचय पातळी २४५.५० मी. तलांकाचे वरील आहेत. नागरी सुविधांचे कामे न झालेल्या गावाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) मौजा-नेरला, ता. पवनी जि. भंडारा, गावठाणाचा स्वेच्छा पुनर्वसन प्रस्ताव पुनर्वसन प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आलेला होता परंतू पुनर्वसन प्राधीकरणाने स्वेच्छा पुनर्वसन प्रस्ताव अमान्य केल्याने कायद्यानुसार नियमीत पुनर्वसनाची प्रक्रीया सुरु करण्यात येत आहे. कुटूंब संख्या- ८४०

२) मौजा-खापरी (रेह.)-ता. पवनी जि.भंडारा या गावाचे पुनर्वसन मौजा-कच्चेखणी येथे करण्यात येत असुन सदर प्रकरणात पर्यायी गावठाणाकरिता २१.७३ हे. जमीनीची संयुक्त मोजणीची कार्यवाही सरु आहे. संयुक्त मोजणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सदर प्रकरणी सरळ खरेदीचा भुसंपादन प्रस्ताव सादर करण्यात येईल. कुटूंब संख्या- २६१

मौजा-नेरला व खापरी (रे). ही गावठाणे गोसीखुर्द प्रकल्पाच्या पुर्ण संचय पातळीच्या वर असुन बुडीत क्षेत्रामुळे गावठाण बाधीत होत नाही.

गोसीखुर्द प्रकल्पात दि.०९.०१.२०२२ रोजी पुर्ण संचय पातळी २४५.५०० मी. पर्यंत प्रथमत: पाणीसाठा करण्यात आलेला आहे. प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा करण्यामुळे काही जमिनी नव्याने बाधित झालेल्या असल्याचे आढळून येत आहे. महाराष्ट्र सुदुर संवेदन उपयोजन केंद्र, नागपुर सोबत सामजस्य करार करण्यात आलेला आहे. नव्याने बाधित जमिनीची DGPS व Drone द्वारे सर्व्हेक्षणाची कार्यवाही सुरु आहे. कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष पाहणी करुन सर्व्हेक्षण तसेच नव्याने बाधित क्षेत्रावरील पिकांचा पंचनामा (तहसिल/कृषी विभागामार्फत) प्रगतीत आहे. प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यामुळे गावांना जोडणारे रस्ते शेतात जाणारे पांधन रस्ते, स्मशान भुमीकडे जाणारे रस्ते बाधित होत असल्यास अशा बाधित रस्त्याचे उंचीकरणाचे कामे सर्व्हेक्षणाअंती हाती घेण्यात येईल. त्यामुळे नव्याने बाधित क्षेत्राचे भुसंपादन कार्यवाही करण्यात येईल. तसेच प्रकल्पाच्या पार्श्वजलामुळे पाणी पुरवठा दुषित होवुन नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला अशी बिकट परिस्थिती उद्भवली नाही. परंतु निदर्शनास आलेल्या पाणी पुरवठयाचे स्त्रोत बाबत उचित कार्यवाही संबधित यंत्रणेद्वारे प्रगतीत आहे.

DGPS व Drone द्वारे सर्व्हेक्षणाची कार्यवाही अंतीम झाल्यानंतर नव्याने उद्भवलेले भुंसपादन, विविध रस्ते, स्मशानभुमी, पाणीपुरवठा स्त्रोत, पिक नुकसान मोबदला इत्यादी कार्यवाही करण्यात येत असल्याने या बाबत काणेतही दुर्लक्ष करण्यात आलेले नसुन योग्य ती उपाय योजना करण्यात येत आहे.

----------oooooooo----------

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. समाधान अवताडे, विजयकुमार देशमुख विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

माहे फेब्रुवारी व त्या सुमारास सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळी २४ गावांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येणे, सदर २४ गावांमध्ये मंगळवेढा तालुक्यातील शिरसी, लेंडवेचिंचाळे, आंधळगाव, लक्ष्मी दहीवाडी, पाटखळ, भाळवणी, हाजापुर, शैलेवाडी, खुपसंगी, रेवेवाडी, खडकी, मेटकरवाडी, रड्डे, निंबोणी, खवे, तळसंगी, जालीहाळ, हिवरगाव, नंदेश्वर, जुनोनी, भोसे, सिध्दनकेरी, जिती, येड्राव या गावांचा समावेश असणे, सदर गावांवर असलेला कायमस्वरूपी दुष्काळ निवारणासाठी मंगळवेढा उपसा सिंचन योजना राबविण्याचा निर्णय तत्कालीन शासनाकडून घेण्यात येणे, सदर निर्णयामुळे या गावातील तब्बल १११२० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याची माहिती प्राप्त होणे, सदर निर्णयाच्या अनुषंगाने दर सूची सन २०१३-१४ नुसार शासन निर्णय ६ सप्टेंबर २०१४ अन्वये रूपये ५३०.०४ कोटीची प्रशासकीय मान्यता देणे, परंतु प्रशासकीय मान्यता मिळून देखील काम वेळेवर चालू न झाल्यामुळे तेथील नागरीकांकडून उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येणे, सदर याचिकेवर सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालयाने शासनास सदर प्रकल्प त्वरित मार्गी लावण्याचे आदेश देऊन देणे, सदर आदेशानंतर देखील योजना कागदावरच असल्याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नसल्याचे उघडकीस येणे, जास्तीची माहिती घेतली असता सदर योजना ही उजनी उजवा कालवा की मी ९१ मधून कालव्याव्दारे गुंजेगाव बॅरेज मध्ये पाणी सोडून गावात दोन टप्प्यात १११२० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचे असणे, सदर योजनेस शासन पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये अटी शर्तीनुसार तत्वत: मान्यता दिलेली असणे, सदर अटी शर्तीनुसार या प्रकल्पास भीमा उजनी प्रकल्प अंतर्गत पाणी उपलब्ध असून शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ नुसार पाणी उपलब्ध होणे, नव्याने प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची तांत्रिक तपासणी पूर्ण करून रूपये ५७८.१५ कोटी रक्कमेचा प्रस्ताव महामंडळाकडून दिनांक १२ जूलै २०२१ नुसार सादर करण्यात येणे, तसेच अटीप्रमाणे मा. मुख्यमंत्री यांचेकडे सदरचे प्रकरण क्रमांक १०१/२०१९ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रलंबित असणे, तसेच महामंडळाकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव देखील शासन दरबारी प्रलंबित असणे, एकूण पाहता अदयाप कागदोपत्री सोपस्कार शासनदरबारी प्रलंबित असल्याने सदर योजनेचे काम अदयाप चालू न झाल्यामुळे येथील जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला असून त्याचा उद्रेक होण्याची शक्यता असणे, या करता शासनाने त्यांच्याकडील मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचे संबंधित सर्व मान्यतेच्या प्रस्तावास त्वरीत मान्यता देऊन योजना कार्यान्वित करण्यासंबंधी करावयाची उपाययोजना व कारवाई."

मा. मंत्री, जलसंपदा महोदयांचे निवेदन

मंगळवेढा तालुक्यातील सिंचनापासून वंचित असलेल्या ३५ गावांना सिंचनाच्या सुविधा उजनी प्रकल्पामधून उपलब्ध होण्यासाठी या भागातील शेतकऱ्यांची आग्रही मागणी होती. परंतु उजनी प्रकल्पाचे पाण्याचे नियोजन यापूर्वी झालेले असल्यामुळे या गावासाठी पाणी उपलब्ध होत नव्हते. मंगळवेढा तालुक्यातील उजनी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या २५९१२ हेक्टर क्षेत्रापैकी १४५०० हेक्टर क्षेत्र हे खोल काळया मातीतील आहे. या क्षेत्रास कशाप्रकारे पाणी दिल्यास जमीन क्षारपड होणार नाही यासाठी जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद या संस्थेने क्षेत्रीय अभ्यास करून २.०४ अघफू पाणी उपलब्ध होत असल्याबाबतच्या महामंडळाकडून शिफारशीसह प्राप्त झालेल्या अभ्यास अहवालास शासन पत्र क्र. सीडीए-१०१२/ (३४१/१२)/ लाक्षेवि (कामे), दि. ९.१०.२०१२ अन्वये तत्वत: मान्यता दिली.

तदनंतर, मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांच्या ३७ व्या बैठकीत काही अटीच्या अधीन राहून मान्यता दिली. तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम ११ (च) अंतर्गत इंग्रजी पत्र क्र. मजनिप्रा /२०१४ / प्रमा /मकृखोविम/८५/५५९, दि. १३.८.२०१४ अन्वये मंगळवेढा उसिंयोचे काम हाती घेण्यापूर्वी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या वैधानिक मान्यता (उदा. पर्यावरण विषयक मान्यता, आवश्यकतेनुसार वनजमीन हस्तांतरणास तत्वत: / अंतिम मान्यता, वन्यजीन (संरक्षण) अधिनियमानुसार अपेक्षित असलेली मान्यता इत्यादी) प्राप्त करण्यात याव्यात, या अटीच्या अधीन राहून मान्यता दिली. त्यानुसार, शासन निर्णय दि. ६.९.२०१४ अन्वये मंगळवेढा उपसा सिंचन योजना ता. मंगळवेढा जि. सोलापूर- योजनेस प्रशासकीय मान्यता दोन टप्प्यामध्ये देण्यात आली.

टप्पा-१ : मंगळवेढा उसिंयोचे काम हाती घेण्यापूर्वी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या वैधानिक मान्यता (उदा. पर्यावरण विषयक मान्यता, आवश्यकतेनुसार वनजमीन हस्तांतरणास तत्वत: अंतिम मान्यता, वन्यजीव (संरक्षण) अधिनियमानुसार अपेक्षित असलेली मान्यता इत्यादी) प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

टप्पा-२ : प्रकल्पास आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक मान्यता प्राप्त होण्याच्या अटींच्या अधीन राहून मंगळवेढा उसिंयोच्या सन २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित एकूण रू. ५३०.०४ कोटी इतक्या किंमतीच्या प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

दरम्यान दि. ६.१.२०१६ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मंगळवेढा उपसा सिंचन योजना सत्वर कार्यान्वित होणेसाठी जनहित याचिका क्र. ६३/२०१७ दाखल झाली. सदर याचिकेच्या अनुषंगाने शासनाने प्रतिज्ञापत्र मा. उच्च न्यायालयात सादर केले आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

तथापि, मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी त्यांचे दि. ५.३.२०१८ चे पत्रान्वये सदर योजनेस वाल्मीच्या अहवालानुसार पुन:श्च पडताळणी केल्याप्रमाणे २८.६६ दलघमी (१.०४ अघफू) इतकेच पाणी उपलब्ध होऊ शकेल असे अभिप्राय दिले. त्यामुळे शासन पत्र दि. ११.४.२०१८ अन्वये विषयांकीत प्रकल्पाची पाणी उपलब्धता ही मंजूर प्रशासकीय मान्यता प्रस्तावातील २.०४ अघफू ऐवजी १.०१ अघफू झाल्यामुळे सुधारित पाणी उपलब्धतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणीसह ४ महिन्यात सादर करणेबाबत निर्देश देणेत आले.

विषयांकीत प्रकल्पाची पाणी उपलब्धता मंजूर प्रशासकीय मान्यता प्रस्तावातील २.०४ अघफू ऐवजी १.०१ अघफू झाल्यामुळे पाणी वापर, सिंचन क्षेत्र, बॅरेज क्षमता, पंप क्षमता, उर्ध्वगामी नलिका इत्यादी सर्व बाबींमध्ये बदल झाला असल्याने तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन जवळपास ५ वर्षात काहीही खर्च झाला नसल्याने विषयांकीत योजनेस नव्याने प्रशासकीय मान्यता देण्याचे अनुषंगाने महामंडळाने त्यांचे दि. ८.७.२०१९ चे पत्रान्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालासह प्रस्ताव शासनास सादर केला. त्यानुसार, शासन पत्र दि. १६.८.२०१९ अन्वये "विषयांकीत प्रकल्पास नव्याने प्रशासकीय मान्यता प्रस्तावित असल्याने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांनी उपस्थित केलेल्या सर्व अभिप्रायांची पूर्तता करावी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम मधील कलम ११ (च) नुसार मान्यता प्राप्त करावी व उपसा सिंचन योजनेस दि. २३.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा. मुख्यमंत्री यांची मान्यता प्राप्त करून घ्यावी" असे निर्देश देणेत आले. तसेच तदनंतर, शासन पत्र दि. १४.३.२०२० अन्वये मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस "प्रथम सदर योजनेस मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांच्याकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, तदनंतर, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची तांत्रिक तपासणी व उपस्थित केलेले शेरेपूर्तता करावी. तदनंतर, दि. २३.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार मा. मुख्यमंत्री यांची तत्वत: मान्यता घेण्यात यावी. त्यासाठी आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करावा. तदनंतर, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्याकडून मान्यता प्राप्त करून घ्यावी" या अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच उपरोक्त अटींची पूर्तता करून प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले.

नव्याने प्रस्तावित मंगळवेढा उपसा सिंचन योजना खालीलप्रमाणे आहे:

मंगळवेढा तालुक्यातील ३५ गावांपैकी ११ गावांचा समावेश म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात झालेला असून उर्वरित २४ गावांसाठी मंगळवेढा उपसा सिंचन योजना प्रस्तावित केली आहे. या २४ गावातील ११८२० हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी ५७.७७ दलघमी (२.०४ अघफू) पाणी आवश्यक आहे. शासन निर्णय दि. ६.१०.२०२१ नुसार उजनी प्रकल्पाच्या पाण्याचे फेरनियोजन करणेत आले असून सदर उपसा सिंचन योजनेसाठी ५७.७६ दलघमी पाणी उपलब्ध होत आहे.

लाभार्थी गावे खालीलप्रमाणे आहेत-

१) येडगाव २) जित्ती ३) खवे ४) भाळवणी ५) निंबोणी ६) रड्डे ७) जालीहाळ ८) हाजापूर ९) सिध्दनकेरी १०) पाटख ११) गणेशवाडी १२) भोसे १३) हिवरगाव १४) लक्ष्मी दहिवडी १५) आंधळगाव १६) खुपसंगी १७) जुनोनी १८) शिरसी १९) नंदेश्वर २०) लेंडवे चिंचाळे २१) गोणेवाडी २२) खडकी २३) शेलेवाडी २४) मेटकरीवाडी

मंगळवेढा उपसा सिंचन योजना दोन टप्प्यांमध्ये प्रस्तावित असून टप्पा-१ (उपसा उंची ७१.५५ मी.) अंतर्गत ५ गावातील २७३० हे. क्षेत्र व टप्पा-२ (उपसा उंची १९.७१ मी.) अंतर्गत १९ गावातील ९०९० हे. क्षेत्र सिंचनाखाली आणणे प्रस्तावित आहे.

जलसंपदा विभागाच्या सन २०१८-१९, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१९-२० च्या दरसूचीवर आधारित सविस्तर अंदाजपत्रक व प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले असून त्यानुसार प्रकल्पाची किंमत रु. ५७८.१५ कोटी आहे. अस्तित्वातील गुंजेगाव को.प. बंधाऱ्यात पावसाळयात पाणी साठवता येत नाही. त्यामुळे योजनेकरीता शाश्वत पाणीसाठा उपलब्ध होण्यासाठी बॅरेजची आवश्यकता आहे. बॅरेजच्या किंमतीसह प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर ३.६९ इतके येते. दुष्काळी मंगळवेढा तालुक्यातील लाभ मिळणारी प्रस्तावित गावे ही कायम दुष्काळी पट्टयातील आहेत.

नवीन शासकीय उपसा सिंचन योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करतांना वापरावयाची कार्यपध्दती बाबत शासन निर्णय दि. २३.११.२०१६ मधील मार्गदर्शक सूचनांमध्ये "शासकीय खर्चाने मोठ्या उपसा सिंचन योजना (२००० हे. वरील) अपवाद म्हणून विहित केलेल्यापैकी किमान एक अट पूर्ण होत असेल तरच घेण्यात यावी" असे नमूद आहे."तथापि शासकीय खर्चाने अशा प्रकारच्या कोणत्या योजना घ्याव्यात याबाबत निर्णय घेणेचे अधिकार मा. मुख्यमंत्री यांना असतील. मोठ्या उपसा सिंचन योजनेबाबत सविस्तर प्रस्ताव मा. मुख्यमंत्री यांना सादर करुन त्यांचे निर्णयानुसारच पुढील कार्यवाही करणेत यावी" असे ही सदर शासन निर्णयात नमूद आहे. मंगळवेढा उपसा सिंचन योजना कृष्णा खोऱ्यातील सोलापूर जिल्ह्याच्या

मंगळवेढा तालुक्यातील कायम दुष्काळी पट्ट्यातील योजना आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयातील विहित अटीपैकी एक अट पूर्ण करीत आहे. त्यानुसार सदर योजना घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांची मंजूरी आवश्यक आहे.

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस राज्य तांत्रिक सल्लागार समितीने दि. २३.२.२०२१ रोजी झालेल्या ५० व्या बैठकीत काही अटींच्या अनुपालनाच्या अधीन राहून रू. ५७८.१५ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शिफारस केली आहे. तसेच महामंडळाने त्याचे दि. ५.७.२०२१ चे पत्रान्वये विषयांकीत उपसा सिंचन योजनेस दि. २३.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांचे मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तथापि, सदर योजनेस शासन निर्णय दि. ०६/१०/२०२१ अन्वये भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाणी वापराचे फेरनियोजन करण्यात आलेनुसार ५७.७६३ दलघमी पाणी फेर नियोजित करून दिलेनंतर, सदर योजनेचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. सदरचा प्रस्ताव नव्याने प्रशासकीय मान्यता देण्याचे अनुषंगाने सादर झाला असल्याने मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मा.मुख्यमंत्री यांचेकडे सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रकरण प्रलंबित असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मा. मुख्यमंत्री यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर महामंडळ/ क्षेत्रीय स्तरावरून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून मान्यता घेणेबाबतची कार्यवाही क्षेत्रीय / महामंडळ स्तरावरून होत असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मंगळवेढा उपसा सिंचन योजना हाती घेण्याबाबत, यापूर्वी, मा. राज्यपाल यांचे दि. ६.८.२०१४ चे पत्रान्वये विशेष बाब म्हणून मान्यता प्रदान केली असल्याने पुन:श्च मान्यता घेणे आवश्यक नाही. तदनंतर, सदर योजनेस नियोजन विभाग, वित्त विभाग व मा. मंत्रीमंडळ यांच्या मान्यतेनंतर राज्याच्या आर्थोपायाच्या स्थितीनुसार नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य आहे. मंगळवेढा उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यापूर्वी सदर योजनेचे लागवडीलायक क्षेत्र ११८२० हे. असल्यामुळे केंद्र शासनाच्या दि. २५.६.२०१४ च्या अधिसूचनेनुसार सिंचन क्षेत्र २००० हे. पेक्षा जास्त असल्यामुळे पर्यावरण मान्यता घेणे व सदर प्रकल्प हा आंतरराज्यीय नदीखोऱ्यात असून मोठया प्रकल्पात मोडत असल्याने त्यास केंद्रीय जलआयोगाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. संजय जगताप, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. पुढीलप्रमाणे:-

"वेल्हे (जि. पुणे) तालुक्यातील गुंजवणी येथे जल प्रकल्प उभा करण्यात येत असून या प्रकल्पातून पुरंदर तालुक्याला पाणी मिळणार असणे, पुरंदर तालुक्यामध्ये बंद पाइप लाइनच्या हा प्रकल्प करण्यात येणे, परंतु पूर्वीच्या ठरलेल्या मार्गाने प्रकल्प न राबविता तो थेट नीरा नदीच्या काठाने पुढे नेण्याचा घाट घालण्यात आलेला असणे, यामध्ये गावाच्या संपूर्ण शिवाराचा विचार न करता अधिकारी त्यांच्या मर्जीनुसार सर्वेक्षण करून पूर्वीचा आराखडा बदलण्यात येणे, याविरोधात ग्रामसभा घेऊन काम बघून बंद पडणे घालायचे माहिती जानेवारी २०२२ च्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून जुना आराखड्यानुसार बंद पाईपलाईनचा प्रकल्प पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री. जयंत पाटील, मा. मंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

गुंजवणी प्रकल्पांतर्गत मौजे धानेप, ता. वेल्हा, जि. पुणे येथे कानंदी नदीवर ३.६९ अ.घ.फू. क्षमतेचे धरणाचे बांधकाम मार्च २०१७ अखेर पूर्ण झाले आहे. गुंजवणी प्रकल्पास दि.१६/१०/१९९३ रोजी सन १९९०-९१ च्या दरसूचीवर आधारित रु.८६.७७ कोटी इतक्या किंमतीची मूळ प्रशासकीय मान्यता दिली आहे. तद्नंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने प्रकल्पास दि.०३/१०/२००२ रोजी सन २०००-०१ च्या दरसूचीवर आधारित रु.३१६.६० कोटी इतक्या किंमतीची प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीमध्ये सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित रु.१३१३.७३ कोटी इतक्या किंमतीची द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.०३/०८/२०१८ अन्वये प्रदान केली आहे.

गुंजवणी प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालानुसार, पारंपारिक खुल्या कालव्याव्दारे प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र १६५०० हे. इतके होते. प्रकल्पास खुले पारंपारिक कालवे नियोजित होते. या कालव्याव्दारे वेल्हे तालुक्यातील ६८५ हे., भोर तालुक्यातील ७२८५ हे. व पुरंदर तालुक्यातील ८५३० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित होते. प्रकल्पाच्या द्वितीय

सुधारित प्रकल्प अहवालामध्ये मंजुर प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार तालुकानिहाय पाणीवापरामध्ये बदल न करता सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. "सिंचन प्रकल्पात नलिकेव्दारे पाण्याचे वितरण" तसेच "सुक्ष्म सिंचन प्रणाली" या दोन नवीन शासन धोरणांचा अवलंब करुन बंद नलिका कालवा प्रणालीचे संकल्पन करण्यात आले आहे. द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार सिंचन क्षेत्र (ICA) व (CCA) २१३९२ हे. असून धरणाचा उपयुक्त पाणीसाठा १०४.४८ द.ल.घ.मी. आहे.

पारंपारिक उघड्या कालव्याऐवजी बंद नलिका कालव्याद्वारे वेल्हे तालुक्यातील ८५० हे., भोर तालुक्यातील ९४३५ हे. व पुरंदर तालुक्यातील १११०७ हे. असे एकूण २१३९२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. त्यास प्रदेश कार्यालयाने तांत्रिक मान्यता प्रदान केली असून सदर कामाची EPC निविदा कार्यवाही पूर्ण झाली आहे.

सदर कामाची EPC या प्रकारांतर्गत निविदा कार्यवाही राबवून कामाचे कार्यारंभ आदेश मे.लार्सन ॲण्ड टुब्रो कन्स्ट्रक्शन लिमिटेड, चेन्नई या कंत्राटदारास दि.३१/१०/२०१९ रोजी दिली आहे. गुंजवणी प्रकल्पांतर्गत नारायणपुर उपसा सिंचन योजनेसह कालवे व वितरण प्रणालीचे काम बंदिस्त नलिकेद्वारे करणे व पाच वर्षासाठी देखभाल, दुरुस्ती व परिचालन करणे तसेच सदर वितरण व्यवस्था पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करणे या कामाची निविदा किंमत रु.१०१६.६८ कोटी असून कामाची किंमत रु.१००६,५१,५०,०००/- इतकी आहे. EPC निविदेवर जानेवारी, २०२२ अखेर खर्च रु.३४८.२८ कोटी खर्च झाला आहे. सदर निविदा हि EPC (Engineering Procurement Construction) स्वरुपाची असून संबंधित कंत्राटदार यांना निविदा अटी व शर्तीच्या अधीन राहून संकल्पन तयार करून त्यावर सक्षम स्तरावरून मान्यता घेणे व त्यानुसार काम करणे नियोजित आहे.

गुंजवणी प्रकल्पाच्या संपूर्ण मंजूर लाभक्षेत्राचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. (CCA- २१३९२ हे.) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये धरणापासून चकच्या आउटलेटपर्यंत बंद नलिकेद्वारे २ kg/cm२ दाबाने आणि ०.३१ lps प्रमाणे पाणी देण्यात यावे अशी EPC निविदेमध्ये अट आहे. त्यानुसार निविदा अटी व शर्तीचा भंग न करता कंत्राटदारास संकल्पन व संरेखा निवडीबाबत स्वातंत्र्य असून त्यानुसार संकल्पन व संरेखेत बदल करणे शक्य आहे. कंत्राटदार यांनी गुंजवणी प्रकल्पाच्या द्वितीय सुप्रमा अहवालामध्ये सादर करण्यात आलेल्या संरेखेऐवजी नव्याने संकल्पन सादर केले असून निविदा अटी व शर्तीचा भंग न करता संरेखेत बदल केला आहे. सदर संरेखा व संकल्पनास आय.आय.टी. हैद्राबाद व मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक (CDO) यांनी मुल्यार्पित केले असून त्यास सक्षम स्तरावरून अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे.

EPC निविदा कामाची सद्यस्थिती: सद्यस्थितीत कार्यक्षेत्रावर MS पाईप व DI पाईप १००% उपलब्ध झाल्या असून लाभक्षेत्रामध्ये काही ठिकाणी नलिका अंथरणेचे काम सुरु झाले आहे. काही

ठिकाणी स्थानिक शेतकऱ्यांचा सदर कामास विरोध होत आहे. द्वितीय सुप्रमा मध्ये विचारात घेतलेली alignment हि लाभक्षेत्रातून उंचावरील बाजूने जात असून त्याऐवजी EPC निविदेनंतर नव्याने मंजूर alignment ही खालच्या बाजूने जात आहे. तथापि खालील बाजूने alignment न घेता सदर alignment हि निविदेपूर्वीच्या alignment नुसार घ्यावी, अशी मागणी स्थानिक लाभधारक शेतकरी करत आहेत.

मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली "गुंजवणी धरण प्रकल्पाच्या कामासंदर्भात आढावा" या विषयाबाबत दि.२२/०९/२०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. आमदार श्री. संजय जगताप यांनी कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांच्यासमवेत सिंचन भवन येथे प्राथमिक बैठक घेवून सदर विषयावर चर्चा करण्याचे निर्देश दिले. पुणे येथील दौऱ्यादरम्यान अंतिम चर्चा करून निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मा. मंत्री (जलसंपदा) यांनी मा.उपमुख्यमंत्री व मा. मंत्री (पुनर्वसन) यांच्यासमवेत "गुंजवणी धरण पुनर्वसन व प्रकल्प कामासंदर्भात आढावा" या विषयाबाबत दि.१३/१०/२०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत सदर प्रकरणी पुरंदर तालुक्यातील ज्या गावांमध्ये गायरण जमिनी आहेत त्यापैकी गावाच्या भविष्यात होणाऱ्या वाढीकरीता ५% जागा राखीव ठेवून उर्वरित जमीन पुनर्वसनाकरिता देणेबाबत अतिरिक्त जिल्हाधिकारी व सचिव, महसूल यांना निर्देश दिले आहेत. तसेच प्रथमतः १००% बाधित व नंतर अंशतः बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले आहेत. गुंजवणी बंद पाणी पाईपलाईन कालवासंदर्भात मंजूरी देत असताना पूर्वी मंजूर केलेल्या ओपन कालव्यावरील शिल्लक राहिलेले शिक्के काढण्यासंदर्भात जलसंपदा विभागाची ना हरकत घेणेत यावी व शिक्के काढण्याची कार्यवाही करणेबाबत आदेश दिले आहेत.

सदर प्रकरणी मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांची गुंजवणी प्रकल्पांतर्गत पुरंदर तालुक्यातील लाभधारक शेतकरी प्रतिनिधी यांचेसोबत दि.३१/०१/२०२२ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमधील प्राप्त निर्देशानुसार सद्य:स्थितीतील पाईपलाईन ही कंत्राटदाराने निविदा अटी व शर्तीनुसार टाकण्यात आलेल्या संरेखेप्रमाणे खालील बाजूस न घेता द्वितीय सुप्रमा मधील मंजूर संरखेनुसार सर्वेक्षण करून तुलनात्मक अहवाल सादर करावा. तसेच सदर प्रस्तावित बंदिस्त नलिका संरेखा ही निविदेपूर्वीच्या द्वितीय सुप्रमा नुसार मंजूर संरेखा तलांकानुसार घेतल्यास संकल्पन व इतर अनुषंगिक बाबींमध्ये काय बदल होईल यावर सविस्तर अहवाल विभागीय कार्यालयाकडून सादर करण्यात यावा, अशी सूचना केली असून त्यावर विभागीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

****

लक्षवेधी सुचना क्रमांक १३९७

महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना

मा.श्री.मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३९७ पुढीलप्रमाणे आहे :-

"भिवंडी तालुक्यातील मुंबई वडोदरा महामार्गाकरिता जमीन संपादनात तत्कालिन उपविभागीय अधिकारी श्री मोहन नळदकर यांनी सन २०२० २०२१ मध्ये गैरव्यवहार केलेला असणे, सौ. रंजना रमेश घरात पूर्वाश्रमिची कुंदा परशरम पाटील, रा. अकलोली, (शिरवली, ता.भिवंडी, जि.ठाणे) वारसाहक्काने सदर ठिकाणी वडिलोपार्जित स्थावर मिळकत असणे, सर्व्हे नं. १५४/२ब या जागेतून मुंबई वडोदरा महामार्ग जात असून भारत सरकारने दिलेल्या जाहिरातीत सदर ७/१२ उताऱ्यावर सौ. रंजना घरत यांच्या नावावर आहे. सौ. घरत यांचे दोन्ही भाऊ सर्वश्री प्रभाकर व सुधाकर पाटील यांनी महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून सन १९९५ साली केलेल्या बोगस कुल मुख्यातर पत्राचा गैरवापर करुन तातडीने बोगस खरेदी खत बनवून फसवणूक करणे, सदरची तक्रार तलाठी सजा अकलोली व मंडळ अधिकारी, अनगांव यांना हरकत अर्ज सादर करुन खरेदी खतास होणाऱ्या नोंदणीस मज्जाव केला असतांनाही आजपर्यंत संबंधित उताऱ्यावर नोंद नसणे, तरी सौ. रंजना घरत यांचे नाव उताऱ्यावर असतांना तत्कालिन उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी कुठल्या कायदयाच्या अधिकाराचा वापर करुन संपूर्ण रक्कम त्यांच्या भावाच्या नावावर वर्ग करणे, तसेच भिवंडी उपविभागीय कार्यालयात बुलेट ट्रेनकरिता जागा हस्तांतरण करण्यासाठी शेतकरी जागा देण्यास तयार असतांना कोणतेतरी कारण दाखवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला गेला, किंबहुना मोबदला देताना या कामासाठी नेमलेल्या दलालांमार्फत कामे केली गेली, अशा इतरही तक्रारी झाल्या होत्या, तरी या सर्व प्रकरणी शासनाने संबंधितांवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन

मौजे अकलोली, ता. भिवंडी येथील स.नं. १५४/२ क्षेत्र १०४१७ चौ.मी. मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी संपादन झाले असून त्याचा निवाडा क्रमांक बीडी/भूसं/मुंबई वडोदरा/एसआर-१२/२०१८ दिनांक २३/०४/२०१८ अन्वये १) दिपाली दत्तात्रेय पाटोळे, २) रंजना रमेश घरत, ३) प्रभाकर परशुराम पाटील, ४) सुधाकर परशराम पाटील, ५) हर्षला हरिश्चंद्र पाटील, ६) सारीका हरिश्चंद्र पाटील, ७) विशाल हरिश्चंद्र पाटील, ८) कोमल हरिश्चंद्र पाटील, ९) काशिनाथ महादु पाटील, १०) अमृत महादु पाटील, ११) सदानंद महादु पाटील, १२) मधुकर महादु पाटील, १३) सिंधु महादु पाटील, १४) नंदु महादु पाटील, १५) पार्वती महादु पाटील, १६) गोपाळ पद्मण पाटील, १७) मनोहर पद्मण पाटील यांचे नांवे रक्कम रूपये ४,३२,८५,५१३/- रूपयाचा घोषीत झालेला आहे. तथापी सदर सव्हे नंबर मध्ये २५ चौ.मी. रस्ता असल्याने सदर क्षेत्र वगळून क्षेत्र १०३९२ चौ.मी. क्षेत्राची मोबदल्याची रक्कम ४,३१,८१,६३२/- अदा केलेली आहे.

या प्रकरणी स.नं. १५४/२ब चा गा.न.नं. ७/१२ प्रमाणे १) दिपाली दत्तात्रेय पाटोळे, २) रंजना रमेश घरत, ३) सुधाकर परशुराम पाटील, ४) हर्षला हरिश्चंद्र पाटील, ५) सारीका हरिश्चंद्र पाटील, ६) विशाल हरिश्चंद्र पाटील, ७) कोमल हरिश्चंद्र पाटील यांची नांवे दिसून येत आहेत.

१) हरिश्चंद्र परशराम पाटील, २) सुधाकर परशराम पाटील, ३) शेवंतीबाई परशराम पाटील, ४) रंजना रमेश घरत, ५) दिपाली दत्तात्रय पाटोळे यांनी १) श्री. प्रभाकर परशराम पाटील यांचे लाभात नोटरी यांचे समक्ष नोंदविलेले क्र.५५८४ दिनांक ०७/०९/१९९५ नुसार कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे. सदर कुलमुखत्यारपत्राचे आधारे रंजना रमेश घरत यांचे वतीने (यांचे कु.मु. म्हणून) श्री. प्रभाकर परशराम पाटील यांनी श्री. सुधाकर परशराम पाटील यांना स.नं. १५४/२ब व क्षेत्र १-२९-० हे. आर. या जमिन मिळकती बाबत दुय्यम निबंधक भिवंडी क्र.३ यांचे समक्ष नोंदविलेले नोंदणीकृत दस्त क्रमांक ५४६७/२१९ दिनांक १९/११/२०१९ अन्वये खरेदीखत केलेले आहे.

तसेच वरील खातेदारांपैकी १) दिपाली दत्तात्रेय पाटोळे, २) सारीका हरिश्चंद्र पाटील ३) हरिश्चंद्र पाटील, ४) कोमल हरिश्चंद्र पाटील यांनी सह दुय्यम निबंधक भिवंडी क्र.३ यांचेकडे नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र क्रमांक ५५६६/२०१९ दिनांक २२/११/२०१९ अन्वये १) प्रभाकर परशराम पाटील, २) सुधाकर परशराम पाटील, ३) हर्षला हरिश्चंद्र पाटील यांचे लाभांत हक्कसोडपत्र दिलेले आहे,

स.नं. १५४/२ चे ३ सातबारा उतारा उपलब्ध असून १५४/२अ. १५४/२ब, १५४/२क मधील खातेदारांनी समान क्षेत्राचा मोबदला मिळावा याकामी कार्यकारी दंडाधिकारी भिवंडी यांचे समक्ष नोंदविलेले सत्यप्रतिज्ञापत्र क्रमांक २७३६ दिनांक १८/०१/२०२० सादर केलेले आहे. त्यानुसार प्रत्येकी क्षेत्र ३४६४ चौ.मी. चा मोबदला रक्कम रूपये १,४३,९३,८७७/- असा एकूण ४,३१,८१,६३२/- अदा करण्यात आलेला आहे. तसेच मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल या प्रकल्पासाठी संपादनाचे काम चालू आहे. याकामी मोबदला अदा करताना कोणत्याही प्रकारे दलालांमार्फत कामे केलेली नाहीत. त्यामुळे शासनाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

****

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.बाळासाहेब आजबे मा.विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानसभा

नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना

"बीड जिल्ह्यातील विठोबा देव देवस्थान.खर्डा.ता.जामखेड, ची जमीन - मुर्शदपूर ता.आष्टी, विठोबा देवस्थान. पांढरी. ता आष्टी, श्रीरामचंद्र देवस्थान. आष्टी. (कोयाळ), श्रीरामचंद्र देवस्थान. कोयाळ. ता.आष्टी, खंडोबा देवस्थान. आष्टी, विठोबा देवस्थान खडकत. ता.आष्टी, श्रीरामचंद्र देवस्थान. चिंचपूर. ता.आष्टी, पिंपळेश्वर महादेव देवस्थान आष्टी. या ८ हिंदू समाजाचे इनाम देवस्थानाचे ८ बनावट खालसा आदेशान्वये इनाम जमीन खाजगी व्यक्तींच्या नावे करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले असणे, मा.महसूल मंत्री यांच्याकडे सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत दि.१७.०८.२०२१ रोजी लेखी तक्रार देण्यात आली असणे, परंतु अद्याप पर्यत कोणतीच कारवाई झाली नसणे, यावर तेथील नागरिकांची होत असललेली चिडेची भावना, व मोठया प्रमाणावर होत असलेला असंतोष, इनाम जमिनी बेकायदेशीरित्या खालसा करुन भूखंड माफियांमार्फत प्लॉटिंग करुन कोट्यवधी रुपयांची कमाई करण्यात आली असणे, तसेच कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असणे, शासकीय अधिकाऱ्यांमार्फत सुध्दा मोठया प्रमाणात अनेक प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार झाले असणे, संबंधितांमार्फत शासनाची फसवणूक करण्यात आली असणे, सदर बाब अतिशय गंभीर असणे, सदर बनावट खालसा आदेशान्वये ज्या खाजगी व्यक्तींच्या नावावर जमिनी करण्यात आलेल्या आहेत आणि शासनाच्या फसवणूक करणारे संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांची अश्या दोषींवर कसून चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही झाली नसणे, अद्याप पर्यत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नसणे, सदर प्रकरणाच्या कारवाईत जाणीवपूर्वक दिरंगाई होत असणे, यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

विठोबा देवस्थान मौजे मुर्शदपूर, ता.आष्टी, विठोबा देवस्थान मौजे पांढरी, विठोबा देवस्थान मौजे खडकत ता.आष्टी, श्रीरामचंद्र देवस्थान मौजे चिंचपुर, ता.आष्टी, पिंपळेश्वर महादेव देवस्थान मौजे आष्टी या पाच देवस्थानच्या, देवस्थान इनाम जमिनीबाबत उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी विविध आदेशान्वये प्रतिबंधीत मालकी घोषित केल्याने सदरच्या जमिनी खाजगी व्यक्तींच्या नावे करण्यात आल्या. याबाबत, जिल्हा प्रशासनाकडे आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर सदर व अन्य अशा एकूण चाळीस आदेशांची वैधता पडताळणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.०४.०२.२०२२ रोजी पूनरिक्षणाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर केला आहे.

खंडोबा देवस्थान, मौजे बेलगांव, ता.आष्टी आणि श्रीरामचंद्र देवस्थान मौजे हिंगणी/ कोयाळ, ता.आष्टी, जि.बीड या दोन देवस्थान इनाम जमिनीबाबत उपजिल्हाधिकारी, बीड यांनी दि.२७.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये

प्रतिबंधीत मालकी घोषित केली आहे. तथापि, सदरचे दोन्ही आदेश अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्यासमोरील अपिलामध्ये अनुक्रमे दि.१५.११.२०२१ व दि.३१.०१.२०२२ अन्वये रद्द केले आहेत.

श्री.रामचंद्र देवस्थान मौजे आष्टी कोयाळ येथील देवस्थान इनाम जमिनीबाबत पारीत करण्यात आलेले दि.२७.०२.२०१८ चे आदेश देवस्थानच्या वतीने आर्चक श्री. संतोष शशिकांत कुसरकर यांनी विलंब माफीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, बीड यांचेसमोर केलेल्या अर्जावर दि.०४.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये विलंब क्षमापित करण्यात आला आहे. तद्नंतर सदर विलंब क्षमापित करण्याच्या आदेशाविरुध्द अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यासमोर दाखल अर्जावर कोणताही निर्णय झालेला नाही. तथापि, त्यामध्ये कोणतेही स्थगन आदेश नसल्याने अपर जिल्हाधिकारी, बीड यांचेसमोर दि.१६.०३.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील सामाजीक कार्यकर्त्यांनी मा.मंत्री (महसूल) यांचेकडे दि.१७.०८.२०२१ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद आठ व अन्य दोन अशा एकूण दहा प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे. यामधील उपरोक्त आठ प्रकरणांव्यतिरीक्त दोन प्रकरणांमध्ये उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द जिल्हा वक्फ बोर्ड अधिकारी, बीड यांनी पोलीस स्टेशन, आष्टी व अंभोरा येथे गुन्हे दाखल केलेले आहेत. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने त्याबाबतची मूळ कागदपत्रे / संचिका तपासकामी पोलीसांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

बीड जिल्ह्यातील देवस्थान व इनाम जमिनीशी निगडीत प्रकरणांवर अर्धन्यायिक स्वरुपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन, आष्टी येथे नोंदविण्यात आलेला गु.र.क्र.२०५/२०२१ च्या अनुषंगाने तत्कालीन उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांना दि.१४.०१.२०२२ पासून निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. याबाबत बीड जिल्हयातील वक्फ/देवस्थान इनाम जमिनीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने शासन निर्देशानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असुन त्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला असून अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, चुकीच्या पध्दतीने आदेश पारीत झाले असल्यास फेरतपासणीस घेणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

****

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, अबू आजमी , मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना

"बीड जिल्ह्यातील देवस्थान/दर्गा/मस्जिद च्या जमिनी व ईनामी जमिनी खाजगी लोकांनी अनधिकृत खालसा केल्या असणे, या मध्ये महसूल आणि इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असणे, प्रकरणात उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन, बीड. यांना अटक होणे, जिल्हाभरात महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने बीड, माजलगाव, गेवराई, परळी, पाटोदा, अंबाजोगाई, धारुर, या तालुक्यातील जवळपास १० हजार एक्कर पेक्षा जास्त जमिनीची परस्पर विल्हेवाट लावल्याचे उघड होणे, वक्फ बोर्डाकडून गुन्हे नोंद करण्यात आले मात्र महसूल यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही न होणे, काही जमिनी तर मा.न्यायालयाचे आदेश डावलून हस्तांतरित करण्यात येणे, जमिनीचा शासन नियमाप्रमाणे संबंधित दुय्यम निबंधक यांच्याकडून काढून दिलेल्या व्हॅल्युवेशन प्रमाणे शासनाला नजराणा रक्कम न भरणे, तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करण्याची मागणी होणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

श्री. बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

तत्कालीन उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी देवस्थान-दर्गाच्या जमिनींबाबत प्रतिबंधित मालकीच्या अनुषंगाने विविध आदेश पारीत केले आहेत. अशा आदेशांविरुध्द जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, आष्टी येथे गु.र.क्र.२०५/२०२१ व पोलीस स्टेशन, बीड ग्रामिण येथे गु.र.क्र.००५३/२०२२ असे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच, तत्कालीन उपजिल्हाधिकारी, सामान्य, बीड यांनी अशा पारीत केलेल्या आदेशांविरुध्द देखिल गु.र.क्र.२४५/२०२१, गु.र.क्र.२७०/२०२१ व गु.र.क्र. ०४७४/२०२१ असे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच, प्रश्नाधीन नमूद तालुक्यांमधील प्राप्त तक्रारींची एकूण संख्या ७५ इतकी असून एकूण क्षेत्र साधारणपणे २३१८.१६ एकर एवढे आहे. यासंदर्भातील दि.१७.०८.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या निवेदनामध्ये १० देवस्थान-दर्गाच्या इनाम जमिनींचा समावेश असून अशा जमिनीबाबत प्रतिबंधीत मालकी घोषित करण्याबाबतचे आदेश पारीत झाल्याचे दिसून आले आहे. उक्त जमिनीपैकी दि.०९.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये खालसा करण्यात आलेल्या मौजे चिंचपूर येथील इनाम जमीनीबाबत तहसिलदार आष्टी यांनी दि.१८.०८.२०२० रोजीच्या आदेशान्वये अकृषिक परवानगी दिली आहे. तसेच सदर जमिनीच्या १३० प्लॉटची खरेदी-विक्री करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे. हैद्राबाद इनाम निर्मुलन (रोख अनुदाने) कायदा १९५४ चे कलम २ (ए) मधील तरतूदीनुसार पारित करण्यात आलेल्या आदेशांबाबत

शासन निर्देशानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालावर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत निर्देश देण्यात येत असून चुकीच्या पध्दतीने आदेश पारीत झाले असल्यास फेरतपासणीस घेणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तत्कालीन उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी रिट पिटीशन क्र.७५१०/२०१६ यामधील मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर दि.०६.०३.२०२० रोजी आदेश दिले होते. सदर आदेश अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.०२.०२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले असून, या आदेशानुसार अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचा दि.२९.०२.२०१६ रोजीचा निर्णय व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यामधील आदेश यानुसार प्रस्तुत प्रकरण सुप्त अवस्थेत ठेवण्यात आले आहे.

मदतमाश इनाम जमिनीचा धारणाधिकार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये करण्याची कार्यपध्दती शासन राजपत्र दिनांक १७.०८.२०१५ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार चालू बाजारभावाच्या ५० टक्के इतकी रक्कम नजराना म्हणून शासनास भरणा करण्याची तरतूद आहे. उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांनी धारणाधिकार-वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतरित करण्याबाबत परवानगी दिलेल्या ६ प्रकरणांपैकी ५ प्रकरणात नजराणा रक्कम भरुन घेण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय अधिवेशन)

श्री.शांताराम मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-

"उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचे कार्यालयामध्ये दि.२४.०२.२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून कार्यवाहीत कल्याण - कसारा ३ रा रेल्वे मार्ग संपादित जागेचा मोबदला बाधित शेतकऱ्यास देण्यासाठी उपविभागीय कार्यालयाकडून ६ लाखाच्या लाचेची मागणी करण्यात येऊन लोकसेवक विठ्ठल गोसावी नायब तहसीलदार उपविभागीय अधिकारी कार्यालय भिवंडी विभाग हे लाच मागताना व घेताना रंगेहाथ पकडले जाणे , सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पडताळणी चालू असताना मुख्य आरोपी विठ्ठल गोसावी नायब तहसीलदार यांनी तसेच त्यामधील अजून दोन आरोपी विजय कमलाकर भोईर व लक्ष्मण सिंह शंकर सिंह राजपुरोहीत यांनी प्रांताधिकारी व नायब तहसीलदार यांची वसुली आम्हीच करत असल्याचे कबूल केले आहे. तथापि वरील गुन्हयामध्ये विठ्ठल गोसावीप्रमाणेच प्रांताधिकारी बाळासाहेब वाघचौरे हे सुध्दा तेवढेच दोषी दिसून येणे, प्रांत कार्यालयाकडून कोणत्याही चुकीच्या पध्दतीने मोबदला अदा केला जात नाही, असे कळविण्यात कळविले जाणे, परंतु तक्रारदार शेतकऱ्यास मागील दोन महिन्यापासून कार्यालयात फेऱ्या मारयला लावणे, नायब तहसीलदार गोसावी यांनी अवाजवी टक्केवारी रक्कम मागून शेतकऱ्यास हैराण करुन सोडणे व शेवटी सही करणाऱ्या सर्वांना पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही असे सांगणे, याबाबत शेतकऱ्याने दि.४.०२.२०२२ रोजी लोकप्रतिनिधीकडे सदरील विषयाची तोंडी व लेखी तक्रार देणे, परिणामी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने योग्य ती कार्यवाही करुन काही लाचखोरांना गजाआड केलेले असणे, तरी जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यास देण्याऐवजी शेतकऱ्यांचीच लुट करत असलेल्या या प्रांताधिकारी वाघचौरे व गोसावी, नायब तहसीलदार या भ्रष्ट अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करण्याची आवश्यकता".

<u>मा. मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन</u>

कल्याण-कसारा रेल्वे मार्गाकरिता श्री. पंढरीनाथ बुधाजी जाधव यांची शहापूर येथील शेतजमीन शासनाने संपादित केली होती. भूसंपादित केलेल्या सदर जमिनीची नूकसान भरपाई बाधित शेतक-यांस देण्यासाठी श्री. विठ्ठल रामभाऊ गोसावी, नायब तहसिलदार, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भिवंडी विभाग, भिवंडी यांनी लाचेची मागणी केली. सदर लाच रक्कम रुपये २,००,०००/- व रुपये ४,००,०००/- किंमतीचा धनादेश स्वीकारतांना खाजगी व्यक्ती श्री.लक्ष्मणसिंह शंकरसिंह राजपुरोहित (सोनार) यांना रंगेहात पकडण्यात आले. सदर लाच रक्कम घेणेबाबत श्री. गोसावी यांनी दुजोरा दिला. सदर लाचेच्या आरोपाबाबत श्री. विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार, श्री.लक्ष्मणसिंह शंकरसिंह राजपुरोहित (सोनार) व श्री विजय भोईर उर्फ पिंटया (एजंट) खाजगी व्यक्ती यांच्याविरुध्द शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७,७(अ),१२ अन्वये गुन्हा नोंद क्र. १०७/२०२२ दिनांक २५/०२/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.

शेवा H/1163 (700-3-22)

E कुमार.

श्री. विठ्ठल गोसावी, नायब तहसिलदार यांना उपरोक्त लाचेच्या आरोपाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्या दिनांक १३/०३/२०२२ च्या आदेशान्वये दिनांक २५/०२/२०२२ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

सदर बाधित शेतक-याच्या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी विहीत वेळेत कार्यवाही केली असल्याचे विभागीय आयुक्त, कोकण / जिल्हाधिकारी ठाणे यांच्या तसेच सदर लाच प्रकरणी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचा अंतर्भाव नसल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या अहवालानुसार दिसून येते. सदर प्रकल्पातील भूसंपादन मोबदला वाटपाबाबत इतर तक्रारी उपविभागीय अधिकारी भिवंडी कार्यालयात प्राप्त झालेल्या नाहीत.

****

लक्षवेधी सूचना

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.शिरीष चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"जळगांव जिल्ह्यात रावेर व यावल तालुक्यातील सुकी व तापी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असून यावर शासनातर्फे नियंत्रण घालावे, अशी मागणी सातत्याने गिरणा नदीकाठच्या गावातील ग्रामस्थांकडून हात असून अनेकवेळा नदीकाठच्या गावातील ग्रामस्थांनी देखील सुकी व तापी नदीतून होणारा अवैध वाळूचा उपसा करताना रंगेहात पकडून महसूल विभागाकडे देणे, तथापि, त्यानंतर पुढे त्या अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणतीच कारवाई न होणे, कालांतराने पुन्हा त्याच ठिकाणी अवैध वाळूचा उपसा होत असणे, त्यामुळे सुकी व तापी काठच्या ग्रामस्थांचे मानसिक खच्चीकरण होणे, अवैध वाळू उपसा करणारे बिनदिक्कतपणे वावरत असणे, अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर महसूल प्रशासनाकडून गुन्हे दाखल केले जात असून त्यांचे ट्रॅक्टर वाळूसह जप्त करण्यात येत असतात, त्यानंतर सुध्दा कायद्यांमधील पळवाटाचा फायदा घेऊन वाळू तस्कर सहीसलामत सुटत असणे, वाळू तस्करांवर होणारी कायद्याची तरतूदही किरकोळ असल्याने कारवाई होऊनही पुन्हा अवैध वाळूची तस्करी केली जात असणे, त्यामुळे वाळू तस्करांवर लावण्यात येणारी गुन्ह्यांची कलमे कडक करण्यासाठी, त्यांचेवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रसंगी कायद्यामध्ये बदल करण्याची गरज तसेच अवैध वाळू उपसा प्रकारामध्ये वाढ होत असल्याने याबाबतीत तातडीने चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

जळगांव जिल्ह्यातील रावेर व यावल तालुक्यातील सुकी व तापी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करतांना नदीकाठच्या ग्रामस्थांनी रंगेहात पकडून महसूल विभागाकडे दिल्याची बाब आढळून आलेली नाही. मात्र गिरणा नदीकाठावरील मौजे आव्हाणे ता.जळगाव येथील नदीपात्रामध्ये दिनांक १४/०१/२०२२ रोजी ग्रामस्थांनी अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणारे एकुण ०२ ट्रॅक्टर हे पकडून तहसिल कार्यालय जळगाव यांच्या कार्यालयाच्या पथकाच्या ताब्यात दिलेले आहे. त्यानुसार जळगांव तालुका पोलीस स्टेशन जळगांव येथे गु.र.नं १९/२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित वाहनमालकांविरूध्द दंडात्मक कारवाईचे आदेश पारीत करण्यात आलेले आहे.

रावेर तालुक्यातील सुकी नदीपात्राच्या किनाऱ्यावरील तसेच तापी नदीपात्राच्या किनाऱ्यावरील गावांसाठी ग्रामदक्षता समितीची स्थापना करण्यात आली असून ग्रामदक्षता समितीमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. रावेर तालुक्यातील अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी सुकी व तापी नदीपात्राच्या मुख्य रस्त्याच्या ठिकाणी ९ फुट खोल अशा चाऱ्या खोदण्यात आल्या आहेत.

रावेर तालुक्यात सन २०२१-२२ मध्ये रात्री चोरट्या मार्गाने होणाऱ्या गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ६६ प्रकरणी रु.८७,२०,९२५/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच ११ वाहनधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

[illegible]

रोटा H/172 (700-3-22)

त्याचप्रमाणे यावल तालुक्यातील अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक होऊ नये याकरीता तापी नदीकाठावरील गावांसाठी ग्रामदक्षता समिती स्थापन करुन वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे. तसेच अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी वरील नदीपात्राच्या मुख्य रस्त्याच्या ठिकाणी खोल खड्डे खोदण्यात आलेले आहेत. यावल तालुक्यात सन २०२१-२२ मध्ये रात्री चोरट्या मार्गाने होणाऱ्या गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४९ प्रकरणी रक्कम रु.६४.२१ लाख इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच १३ वाहनाधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

जळगांव जिल्ह्यात तालुकास्तरीय, उपविभागस्तरीय व जिल्हास्तरीय पथकांमार्फत माहे एप्रिल, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी ८७२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून रु.५२०.५९ (लाख) इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. अवैध वाळूसाठ्याच्या ०५ प्रकरणी रक्कम रुपये ४६.०९ लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ३९ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जळगांव जिल्ह्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात येत असून भारतीय दंड संहिता १८६० मधील तरतूदीनुसार गुन्हे दाखल करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महसूल यंत्रणा, पोलीस विभाग व परिवहन विभाग यांनी आपसात समन्वय साधून सदर प्रकरणांवर सक्त कारवाई करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदर कारवाई करतांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये प्रतिबंधात्मक हद्दपारीबाबतची कारवाई, एम.पी.डी.ए. (MPDA) व मोक्का कायदयांतर्गत कारवाई करण्याच्या सुध्दा सक्त सूचना सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २ प्रकरणी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये हद्दीपारीची कारवाई करण्यात आली आहे. तसेच बांभोरी ता. धरणगांव व नारणे ता.धरणगांव या दोन्ही गावांचे सरपंच हे वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणात सहभागी आढळून आल्याने त्यांचे अपात्रतेच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

****

लक्षवेधी सूचना

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. संजय जगताप, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील कुंभार समाजाला आमच्या कुटुंबास मातीच्या विटा, कौले व सणसुदीला लागणाऱ्या वस्तु व मूर्ति तयार करण्यास दरवर्षी ५०० ब्रास पर्यन्त मातीसाठी स्वामित्वधन माफ केलेले असणे, तरीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून गौण खनिज उत्खननाथे तात्पुरते परवाने देणे बंद करणे, राष्ट्रीय हरित लवादाने जानेवारी २०२२ मध्ये जिल्हा प्रशासनाकडून गौण खनिज उत्खननासाठी दिले जाणारे तात्पुरते परवाने बेकायदा ठरविले असणे, पाच हेक्टरच्या आतील क्षेत्राच्या उत्खननासाठीही राज्यस्तरीय पर्यावरण समितीची मान्यता बंधनकारक करणे, राज्य सरकारकडून या संदर्भात अद्याप कोणत्याही सूचना किंवा मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आले नसल्याने जिल्हाप्रशासनाने असे तात्पुरते परवाने थांबविणे, याचा फटका कुंभार समाजाला मोठ्या प्रमाणात बसला असून समाजावर उपासमारीची वेळ आलेली असणे, पिढीजात कुंभार समाजाला पारंपारीक व्यवसायिकांच्या समोरील व्यवसायिक अडचणी लक्षात घेऊन नियमात विशिष्ट कालावधीत व विशिष्ट क्षेत्रात, विशिष्ट परिमणा इतके गौण खनिज उत्खनन करण्यास परवानगी देण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी, मा.तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले असणे, स्थानिक प्रशासनाकडून वन विभागाचे नाहरकत दाखला घेणे बंधनकारक केले आहे य याबरोबर गौण खनिज उत्खननासाठी विशिष्ट आराखडा मंजुरीची अटही बंधनकारक करणे, एकंदर यासाठीचे कागदपत्राचे सोपस्कार प्रचंड असणे कुंभार समाजाला जाणूनबुजून वेठीस धरले जात असून परिणामी कुंभार समाज देशोधडीला लागला असून या समाजामध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून कुंभार समाजाला न्याय मिळण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

मा. मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन

तहसिलदार यांच्याकडून कुंभार समाजाचे ओळखपत्र प्राप्त असणाऱ्या पिढीजात कुंभार समाजातील व्यक्तींना महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ नियम ४ नुसार तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या लेखी पुर्वपरवानगीने व कोणतीही फी किंवा स्वामित्वधन न घेता कोणत्याही पीढीजात कुंभाराच्या कुटुंबास विटा, कौले किंवा इतर वस्तु तयार करण्यास त्याच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी वर्षाला ५०० ब्रास पर्यंतच्या मर्यादेत माती काढण्यास परवानगी आहे.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ प्रकरण चार मधील तरतुदीनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर व उक्त नियमावलीच्या अंतर्गत असणाऱ्या अटी व शर्तीस अधिन राहुन तसेच शासनाकडील दि.१२.१२.२०१३ रोजीच्या मार्गदर्शक पत्रानुसार संबंधितास मागणीनुसार अल्प मुदतीचे गौण खनिज उत्खनन करण्याचे परवाने निर्गमित करण्यात येत होते. परंतु, मा. राष्ट्रीय हरीत लवाद, बेंच पुणे (W.Z) येथे श्री. लक्ष्मण धोंडीबा ठोंबरे यांनी दाखल केलेल्या मुळ

अर्ज क्रमांक ९९/२०१९ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दि.२०.१२.२०२१ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशानुसार पर्यावरण अनुमतीशिवाय खाणकामास अल्प मुदत परवाने कायदेशीर नसल्याचे नमुद केले आहे.

मा. राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज क्र.९९/२०१९ मध्ये दि.२०.१२.२०२१ रोजी दिलेल्या आदेशामुळे राज्यातील तात्पुरते गौण खनिज उत्खननाचे परवाने देण्याची कार्यवाही क्षेत्रीय कार्यालयाकडून थांबविण्यात आलेली आहे. सदर आदेशाविरूध्द योग्य त्या न्यायाधिकरणाकडे पुनर्विलोकन अर्ज/अपील दाखल करण्यास तसेच शासनाच्या वतीने बाजू मांडण्यास जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार पुनर्विलोकन अर्ज अथवा अपील दाखल करण्याचे कामकाज युध्द पातळीवर सुरू आहे.

****

H/209-1a

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. योगेश सागर, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड पराग अळवणी, ॲड आशिष शेलार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

"महिलांमध्ये सध्या सर्व्हायकल कॅन्सर झापाट्याने पसरत असणे, वय वर्षे ११ ते २० या वयोगटातील मुलींना सर्व्हायकल कॅन्सर होण्याची शक्यता असणे, सर्व्हायकल कॅन्सर रोखण्यासाठी यावर प्रतिबंधात्मक उपायासाठी लस उपलब्ध असणे, उक्त वयोगटातील मुलींना काही ठराविक अंतराने ३ लसी दिल्यास या आजारावर प्रतिबंध होऊ शकतो, परंतु एका लसीची किंमत रुपये ३ हजार असून ३ लसी घेण्यासाठी ९ हजार रुपये खर्च करावे लागत असणे, त्यामुळे सर्वसामान्य, मध्यमवर्गीय गरीब कुटुंबांना हा खर्च परवडणारा नसणे, सर्व्हायकल कॅन्सरमुळे दरवर्षी सरासरी २ लाख ६५ हजार, ६७२ महिलांचा मृत्यू होत असणे, सर्व्हायकल कॅन्सरसाठी गार्डासिल (Gardasil) आणि सिर्वरीक्स (Cervarix) या दोन लसी देण्याची आवश्यकता असणे, या लसी बनविण्याऱ्या ग्लॅक्सस्मिथ (Glax Smith) आणि मेर्क (Merck) या दोन कंपन्या असून दोन्हीही कंपन्या मुंबईत औषधाची उत्पादने करीत असणे, या दोन्ही कंपन्या राज्य सरकारच्या सर्व सवलती घेत असणे, यापूर्वी मुंबईसह राज्यामध्ये हॅपेटायटस "बी" रोखण्यासाठी सवलतीच्या दरात लसी उपलब्ध करुन देण्यात आले असणे, राज्य सरकार राज्यातील विविध ठिकाणी जनतेच्या आरोग्यासाठी महापालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा व वेगवेगळया सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन केले जात असणे, परंतु या आरोग्य शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी करुन उपचार केला जात असणे, मा.पंतप्रधान यांच्या बेटी बचाव बेटी पढाव या योजनेअंतर्गत राज्यभर महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरबाबत जनजागृती करुन, सर्व्हायकल कॅन्सरची लस उपलब्ध करुन महिलांना सवलतीच्या दरात देण्याची अत्यंत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे निवेदन

वय वर्ष ११ ते २० वयोगटातील मुलींमध्ये गर्भाशय मुख कर्करोग होत असल्याचे आढळून येत नाही. या वयोगटातील मुलींमध्ये HPVInfection होण्याची शक्यता अधिक असते. HPV Infection मुळे गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्याची शक्यता वाढते, असे जागतिक आरोग्य संघ्टनेच्या मार्गदर्शक सुचनेत नमूद आहे.

गर्भाशय मुख कर्करोगाचे एक कारण HPV या विषाणूचा संसर्ग असून कर्करोग शरीरामध्ये निर्माण होण्याची प्रकिया ही दीर्घकालीन असते. या करिता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून HPV लसीकरण हा एक

(क्र.मा.प)

उपाय आहे. किशोरवयीन मुलींना वयाच्या १४ व्या वर्षी ही लस देण्यात येते,महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग हा वयाच्या मुख्यतः ३० वर्षानंतर आढळून येतो. तसेच या कर्करोगावर प्रतिबंध करण्याकरिता विकसित केलेल्या लसीची (HPV-Human Papilloma Virus Vaccine) किंमत प्रति डोस सुमारे ३००० हजार रुपये असून लसीकरण पूर्ण करण्याकरिता २ ते ३ डोस घेणे आवश्यक आहे. HPVलसीकरणामुळे कर्करोगविरोधातील प्रतिकारशक्ती वयाच्या ४० ते ५० वर्षांपर्यंत टिकून राहण्याचे वैज्ञानिक पुरावे प्राप्त नाहीत मात्र जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत HPV Infection लसीकरण करावे, असे नमूद केले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार HPV लसीमुळे गर्भाशय मुख कर्करोग होण्याचे प्रमाण कमी होऊ शकते तथापी गर्भाशय मुख कर्करोग होणारच नाही अशी शाश्वती नसल्याबाबत संशोधनाअंती स्पष्टता केली आहे. त्यामुळे HPV लसीकरणानंतरही गर्भाशय मुखाची नियमित दर ५ वर्षांनी तपासणी करुन घेण्याविषयी मार्गदर्शक सूचना जागतिक आरोग्य संघटनेने दिल्या आहेत.

टाटा मेमोरीअल येथील तज्ञांच्या मतानुसार HPV लसीकरण केल्यामुळे गर्भाशय मुख कर्करोगाच्या प्रमाणात अथवा त्यामुळे होणा-या मृत्यूंमध्ये निर्णायक फरक पडतो, असे आढळून आले नाही. टाटा स्मारक केंद्राच्या संशोधनाद्वारे गर्भाशय मुख कर्करोगामुळे होणारे ३० टक्के मृत्यू हे प्रशिक्षित आरोग्य कर्मचा-यांकडून गर्भाशय मुखाच्या VIA(visual inspection by Acetic acid) या साध्या व सोप्या तपासणीद्वारे कमी करता येणे शक्य असल्याचे सिध्द झाले आहे.

या संशोधनाचा आधार घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात लोकसंख्येवर आधारित तपासणी कार्यक्रम राबविला जातो. याअंतर्गत ३० वर्षावरील सर्व स्त्रियांची गर्भाशयमुख तपासणी VIA या चाचणीद्वारे केली जात आहे. या चाचणीमुळे गर्भाशयमुख कर्करोगाचे प्राथमिक टप्प्यात निदान होऊ शकते व परिणामी लवकर उपचार दिल्यास रुग्ण पूर्णतः बरा होऊ शकतो. याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सदर कर्करोग प्रतिबंध व लवकर निदान होण्यासाठी लोकसंख्या आधारित सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत ३० वर्षावरील सर्व महिलांची गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची तपासणी केली जात आहे.

****

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

डॉ.राहुल पाटील, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५६ पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरु असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्यांची रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पद्धतीचा समावेशन शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबना, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे, मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना दिनांक २ जुलै २०१२ पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. दिनांक २३ सप्टेंबर २०१८ पासून प्रधान मंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितपणे राबविण्यात येत आहे. सदर योजना अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना तातडीच्या उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांमधून नि:शुल्क गुणवत्तापूर्ण उपचार देण्याच्या हेतूने राबविण्यात येत आहे.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ उपचार सामायिक असून प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अतिरिक्त २१३ उपचार मिळून एकुण १२०९ उपचार समाविष्ट आहेत. एकत्रित योजनेमध्ये रुग्णांना गंभीर, गुतागुंतीच्या व तातडीच्या आजारांवर उपचार करून रुग्णाचे प्राण वाचवण्याच्या हेतूने ३४ विशेषज्ञ सेवांमध्ये secondary व tertiary care वैद्यकीय उपचार व विविध शस्त्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे. या निर्णयाला अनुसरूनच योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत ॲलोपथी मधील वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया यांच्या सहाय्याने रुग्णांना वैद्यकीय लाभ दिला जात असून दिनांक २ जुलै २०१२ ते १६ मार्च २०२२ या कालावधीमध्ये एकत्रित योजनेंतर्गत ४३,८०,५९५ उपचार/शस्त्रक्रियांच्या माध्यमातून नागरीकांना वैद्यकीय लाभ देण्यात आले आहेत. यासाठी शासनामार्फत आतापर्यंत रुपये ८६०५.३० कोटी खर्च करण्यात आले आहेत. केंद्र शासनातर्फे संपूर्ण भारतभर राबविल्या जाणाऱ्या आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सुद्धा राज्य शासनाच्या योजनेप्रमाणेच secondary व tertiary care वैद्यकीय उपचार व विविध शस्त्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्या आजारावर उपचार केला नाही तर जीवाला धोका उद्भवू शकतो असे गंभीर व आकस्मिक आजारावरील खर्चिक उपचार मुख्यत्वेकरून योजनेत समविष्ट केले आहेत. अशा उपचारांचा समावेश आयुर्वेदिक उपचारांत नसल्याने आयुर्वेदिक उपचारांचा समावेश एकत्रित योजनेमध्ये सद्य:स्थितीत करण्यात आलेला नाही.

.....

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे फेब्रुवारी २०२२ च्या दुसऱ्या आठव्यात वा त्या दरम्यान जिल्हा अहमदनगर तालुका पारनेर येथील लोकप्रतिनिधी यांनी तालुका पारनेर येथे मौजे ढवळपुरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात येणे, मौजे टाकळी ढोकेश्वर येथे स्त्री उपचार रुग्णालयाची स्थापना व रुग्णालय कर्मचारी वसाहत नव्याने बांधणे, तालुका पारनेर येथे ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करणे व सुपा औद्योगिक वसाहत याठिकाणी "ट्रॉमा केअर सेंटरची" उभारणी करणे अशा आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून केलेल्या विविध मागण्या गेले महिने प्रलंबित असल्याची बाब उघड होणे, आरोग्याच्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक ग्रामस्थांना व नागरिकांना अनेक संकटांना सामोरे जाण्याची वेळ उदभवल्याने नागरिकांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना यावर शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यकती उपाययोजना."

श्री.राजेश टोपे, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.

मा. लोकप्रतिनिधी यांचे दि. ०३.०२.२०२१ च्या पत्रान्वये मौजे ढवळपुरी ता. पारनेर जि. अहमदनगर येथे नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर कार्यालयाचे दि. ०१.०६.२०२१ च्या पत्रान्वये सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुर करण्याबाबत चेकलिस्टनुसार सविस्तर प्रस्ताव आयुक्तालयास सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या प्रस्तावानुसार मौजे ढवळपुरी अंतर्गत कार्यक्षेत्राची लोकसंख्या व अंतर यांची छाननी करुन सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र लोकसंख्येचा निकष पुर्ण करीत आहे, परंतू अंतराचा निकष पुर्ण करीत नाही. तथापि लोकप्रतिनिधीच्या विनंतीवरुन जनतेला नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातुन आरोग्य सेवा मिळणेबाबत शासनस्तरावरुन योग्य तो निर्णय घेण्यासाठी आयुक्तालयाचे पत्र दि. ३०.०८.२०२१ नुसार प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

ग्रामीण रुग्णालय टाकळी ढोकेश्वर, अहमदनगर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. मौजे टाकळी ढोकेश्वर येथील स्त्री रुग्णालयाची मागणी दि. १८/०१/२०२२ रोजीच्या निवेदनानुसार करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने प्रस्ताव निकषानुसार तपासुन सादर करणेबाबत आयुक्तालयास कळविण्यात आले आहे. ग्रामीण रुग्णालय पारनेर, अहमदनगर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. ग्रामीण रुग्णालय पारनेर, अहमदनगर, येथील ३० वरुन १०० खाटांचा श्रेणीवर्धनाचा प्रस्ताव आयुक्तालयास दि.१५.०२.२०२२ च्या पत्रान्वये उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक कार्यालयाकडून प्राप्त झालेला असून निकषाप्रमाणे तपासून शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

औद्योगिक वसाहत सुपे येथील ट्रामाकेअर सेंटर उभारणी बाबतचा प्रस्ताव अप्राप्त आहे. सद्यस्थितीत सुपा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. शासन निर्णय दि.१८/०९/२०२० अन्वये नविन ट्रामा केअर युनिटला मान्यता देताना ते जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय अशा १०० खाटांचे रुग्णालय असलेल्या ठिकाणी मंजूर करण्यांत यावे असे शासनाचे धोरण आहे. जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथुन सुपा हे २८ कि.मी. अंतरावर आहे.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
श्री. संजय जगताप, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

"समाजाकडून आणि कुटुंबीयांकडूनही घृणा व तिरस्काराची वागणूक मिळणाऱ्या कुष्ठ रुग्णांसाठी सन १८८२ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या पुणे येथील डॉ. बंदोरवाला कुष्ठ रुग्णालयात, जेथे १००० पेक्षा जास्त पुरुष व महिला रुग्ण दाखल होत असणे, ज्यांना दिले जाणारे औषधोपचार, पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया सेवा, व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, मात्र स्वयंसेवी संस्थेकडे चालवण्यास देण्यात आलेले हे रुग्णालय सन २००२ मध्ये शासनाकडे हस्तांतरीत केल्यानंतर, आंतररुग्ण कक्षांची व स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्ती अभावी झालेली दुरावस्था, कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था. शस्त्रक्रियागृहाच्या नादुरुस्तीमुळे व शस्त्रक्रिया उपकरणा अभावी पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांचे बंद पडलेले काम यंत्रसामुग्री व कुशल कर्मचाऱ्या अभावी ठप्प झालेली रुग्ण सेवा, त्यामुळे तेथे दाखल रुग्णांच्या संख्येत झालेली लक्षणीय घट, दाखल असणाऱ्या रुग्णांमध्ये असणारा असंतोषाची भावना, तसेच कर्मचारी वर्गातील निर्माण झालेली नाराजी, तसेच या रुग्णालयाच्या जागेत होणारी अतिक्रमणामुळे रुग्णां होणारा त्रास त्यामुळे अतिक्रमणे हटविण्याची आवश्यकता, राज्यात कुष्ठ रुणांच्या संख्ये मुळे शासनाने डॉ. बंदोरवाला कुष्ठ रुग्णालयाची होणारी दुरावस्था दुर करण्यासाठी आवश्यकती सोयी सुविधा पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया.."

मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

डॉ. बंदोरवाला कुष्ठरोग रुग्णालय शासनाकडे सन २००२ मध्ये हस्तांतरीत करण्यात आले असून सद्दस्थितीमध्ये एकूण ७२ पदांपैकी ४८ पदे भरलेली आहेत. भरलेली पदे पुढीलप्रमाणे आहेत- प्रशासक-१, वैद्यकीय अधिकारी-५, परिचारीका-१६, अवैद्यकीय सहायक-२, भौतिकोपचारक तज्ञ-२, औषध निर्माण अधिकारी-२, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता-२, व्रणोपचारक-५, कक्ष सहायक-७, कार्यालयीन अधीक्षक-२, वरिष्ठ लिपिक-१, शिपाई-२ व स्वच्छक-१ अशी एकूण ४८ पदे भरलेली आहेत. उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत कुष्ठरोग रुग्णांना आवश्यक त्या रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

डॉ. बंदोरवाला कुष्ठरोग रुग्णालयामध्ये पुरुष, स्त्री व प्रशासन विभागामध्ये एकूण ३ स्वच्छता गृहे आहेत. या स्वच्छता गृहांची व इतर दुरुस्त्या सन २००८-२००९ यावर्षी करण्यात आलेल्या

(क्र.मा.प.)

आहेत. तसेच वेळोवेळी उद्भवणा-या इतर अंतर्गत दुरुस्त्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येतात.

सद्यस्थितीत कुष्ठरुग्णांचे प्रति दहा हजार लोकसंख्येमागे प्रमाण ०.८ असून सन १९९० च्या तुलनेत हे प्रमाण अत्यंत कमी आहे. तसेच विकृतीचे प्रमाण ही कमी झाल्याने कुष्ठरुग्णांचे आंतररुग्ण म्हणून उपचार घेण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा कमी झालेले आहे. डॉ. बंदोरवाला कुष्ठरोग रुग्णालयामध्ये उपलब्ध असणा-या निवासस्थानामध्ये ज्या रुग्णांना समाजाकडून स्वीकारले जात नाही असे निवासी रुग्ण राहतात. सदरील रुग्णालयात संपूर्ण राज्यातून विविध कारणांकरीता कुष्ठरुग्ण दाखल होतात. मागील दोन वर्षांमध्ये कोविड-१९ या साथीच्या आजारामुळे रुग्णालयात नवीन रुग्ण दाखल होण्याचे प्रमाण कमी झाले होते. तथापि या आजाराची साथ आटोक्यात आल्यानंतर पुन्हा कुष्ठरुग्ण दाखल होण्यास सुरुवात झालेली आहे. सध्या बाह्यरुग्ण विभागात दररोज सरारसी २५-३० कुष्ठरुग्ण व संशयित कुष्ठरुग्ण उपचारासाठी येतात. सद्यस्थितीत सदर रुग्णालयात सध्या १२० आंतररुग्ण उपचार घेत आहेत.

डॉ. बंदोरवाला कुष्ठरोग रुग्णालयामध्ये आहार सेवा, स्वच्छता सेवा व सुरक्षा सेवा कंत्राटी तत्वावर बाह्ययंत्रणेकडून पुरविल्या जातात. सदर रुग्णालयात पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया विभाग कार्यान्वित असून या विभागामार्फत पुनर्रचनात्मक शस्त्रक्रीया केल्या जातात. या शस्त्रक्रीया खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांकडून गरजेनुसार करवून घेतल्या जातात.

डॉ. बंदोरवाला कुष्ठरोग रुग्णालय परिसरामध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामांवर पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने दिनांक ०२.१२.२०२१ रोजी कारवाई केलेली आहे. सदर रुग्णालयाच्या परिसराभोवती संरक्षक भिंत बांधण्यासाठी सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांनी सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकात रु. ६,९०,११,०००/- इतकी रक्कम प्रस्तावित केलेली आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
श्री. बबनराव शिंदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

"टेंभुर्णी जि. सोलापूर हे पुणे- सोलापूर, पंढरपूर -शिर्डी या राष्ट्रीय महामार्गावरील प्रमुख गांव असून या ठिकाणावरून प्रवासी वाहतुक, श्री. क्षेत्र पंढरपूर, शिर्डी येथे जाणारी मोठी प्रवासी संख्या परिसरातील सुमारे ३० गावांतील ग्रामीण लोकसंख्या यांचे करिता वेळेत वैद्यकीय सुविधा मिळणेसाठी टेंभुर्णी शहरामध्ये ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधणेसाठी राज्य सरकारने मंजूरी देऊन १५ कोटी निधीची तरतुद केलेली असणे, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपजिल्हा रुग्णालय बांधणेसाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने स्थानिक लोकप्रतिंनिधी यांनी मागणी करून महाराष्ट्र कृष्णा खारे विकास महामंडळ (जलसंपदा विभाग) यांचे मालकीची टेंभुर्णी येथील गट क्रं.८६६ क्षेत्रफळ १.६० हेक्टर जागा उपजिल्हा रुग्णालयासाठी मंजूर केलेली असणे, त्यासाठी जलसंपदा विभागाने जागेचे १,४३,८०,८२१ रुपयांचे मुल्यांकन केलेले असणे, सदरचे आकारलेले मुल्य भरणेसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे मागणी केलेली असून त्यावर सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेत उपचार मिळणेस दिरंगाई होत असणे, उपचार न मिळाल्याने मृत्यूचे प्रमाण वाढणे याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परीणामी महामार्गावर प्रवास करणाऱ्या तसेच ग्रामीण भागातील जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे राज्य शासनाने जागेचे मुल्यांकन भरून तातडीने काम सुरू करणेबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

दि.०८.०३.२०२१ च्या शासन निर्णयान्वये, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. दिनांक ०१.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामाच्या रु.२०,०१,०१,००२/- (रुपये वीस कोटी, एक लाख, एक हजार, दोन रुपये फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ मध्ये डिसेंबर-२१ च्या पुरवणी मागणीमध्ये रु.१५०.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यांत आलेला आहे.

मा. श्री. बबनराव शिंदे, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०५.०१.२०२२ च्या पत्रान्वये, मौजे टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर या ठिकाणी रुग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी जागे उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (जलसंपदा विभाग) येथील गट क्रमांक ८६६ एकूण क्षेत्रफळ १.६० हेक्टर जागा उपजिल्हा रुग्णालयास कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने आवश्यक जागेचे मुल्य आकारुन जमीन देण्याबाबत निर्णय घेण्यात आल्याचे व याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने पाहणी करुन सदर जागेचे रु.१,४३,८०,८२१/- रुपयांचे शासकीय मुल्यांकन करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे.

(कृ.मा.प)

तथापि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त संस्थाकरीता जागा शक्यतो मोफत मिळवण्यात यावी व तशी ती मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध होत नसल्यास जवळच्या ठिकाणची शासनाची जागा नि : शुल्क अथवा नाममात्र दरात घेणे आवश्यक आहे. यास्तव उपजिल्हा रुग्णालय, टेंभुर्णी करीता टेंभुर्णी शहरातील किंवा परिसरातील जवळची जागा मोफत उपलब्ध करुन घेणे किंवा नि : शुल्क अथवा नाममात्र दरात घेणे उचित राहणार आहे. राज्यातील आरोग्य संस्थासाठी जागा दानपत्रावर किंवा शासकीय जमीन उपलब्ध करून घेण्यात येते. जागा विकत घेण्याचे प्रावधान नाही.

****

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सिध्दार्थ शिरोळे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६१ पुढीलप्रमाणे आहे.

"जिल्हा रुग्णालय औंध, जि. पुणे येथे दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दिव्यांगांचे हाल होत असल्याची बाब माहे मार्च, २०२२ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास येणे, रुग्णालयामध्ये दिव्यांगांना व्हील चेअर उपलब्ध नसणे, रुग्णालयामध्ये कर्मचारी व डॉक्टरांची कमतरता असणे, डॉक्टरांची वेळ एक आठवडा ते २ महिने मिळत नसणे, रुग्णालयात तिसऱ्या मजल्यावर दिव्यांगांसाठी मूल्यमापन कार्यालय असणे परंतू रुग्णालयाची लिफ्ट फक्त दुसऱ्या मजल्यापर्यंत सुरु असणे, दुसऱ्या मजल्यावरुन दिव्यागांना तिसऱ्या मजल्यापर्यंत जाताना अतिशय त्रास होणे, रुग्णालयात केसपेपर काढताना दिव्यांगांसाठी स्वतंत्र खीडकी नसणे, इंटरनेटमुळे अनेक यंत्रणा बंद असणे, एवढे होऊन सुद्धा दिव्यांगांचे एका दिवसामध्ये प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रिया पूर्ण न होणे, त्यांना दोन तीन वेळा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रुग्णालयात जावे लागणे, रुग्णालयामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राची अनेक प्रकरणे वरेच दिवस प्रलंबित असणे, दिव्यांगांना वेळेवर प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, शासनाने तातडीने दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची गरज, त्यादृष्टीने शासनाने गांभीर्याने व तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. राजेश टोपे, मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे येथे एकुण १५ व्हिलचेअर उपलब्ध असून त्या तळमजल्यावर बाहयरुग्ण विभागात दिव्यांगांकरिता दोन व्हिलचेअर राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत, त्या आवश्यकतेनसुार संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याकरिता दोन समाजसेवा अधिक्षक यांची बाहयरुगण विभागात मदतीसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. तसेच रुग्णालयामध्ये आकृतीबंधानुसार मंजूर असलेले वैद्यकीय अधिकारी यांची सर्व पदे भरलेली असून नियमित कर्मचारी संवर्गातील मंजूर पदे ही भरण्यात आलेली आहेत. तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र लवकरात लवकर देण्याबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियांनांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. प्रत्येक दिव्यांगांना तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयामध्ये आठवड्यातील दोन दिवस (बुधवार व गुरुवार) देण्यात येतात. दिव्यांग प्रमाणपत्रासाठी संगणक प्रणालीद्वारे होणारी नोंदणी संख्या ही जास्त प्रमाणात असल्याने डॉक्टरांना दिव्यांगांना तपासून त्याबाबतचे अभिप्राय नोंद घेऊन सदर अभिप्राय हे संगणक प्रणालीमध्ये अपलोड करण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे एक ते दोन आठवड्यामध्ये प्रमाणपत्र वितरीत करण्यात येते. दिव्यांगांसाठी मुल्यमापन तळमजल्यावर करण्यात येते. बौध्दीक अक्षमता असलेल्या, वय वर्ष १८ पेक्षा कमी असलेल्या दिव्यांगांना तसेच पुनवर्सन व विविध प्रकारची थेरपी आवश्यक असणाऱ्या दिव्यांगांना तिसऱ्या मजल्यावर आवश्यकतेनुसार पाठविण्यात येते.

रुग्णालयात एकूण तीन लिफ्ट आहेत. दोन लिफ्ट चालू असून एका लिफ्ट सध्या नादुरुस्त आहे. जिल्हा रुग्णालयाकडून बांधकाम विभागास लिफ्ट दुरुस्ती करुन देण्याबाबत कळविण्यात आलेले असून तातडीने लिफ्ट दुरुस्त करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

रुग्णालयात दिव्यांगांसाठी व वयोवृध्द दिव्यांगांसाठी केस पेपर व UDID Form ऑनलाईन भरणे व इतर मदतीसाठी स्वतंत्र खिडकी ठेवण्यात आलेली आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीमध्ये रस्त्यांची कामे व इतर खोदकामे सुरु असताना अनवधानाने इंटरनेट केबल तुटल्याने इंटरनेट सेवा बंद झाल्यास सदरची सेवा खंडीत झाल्यानंतर तात्काळ सुरु करण्यासाठी रुग्णालयाकडून खबरदारी घेण्यात येत असते. ज्या दिव्यांगांचे अर्ज व इतर कागदपत्रे परिपूर्ण असतात, त्यांना तपासणी करुन एक ते दोन भेटीमध्ये प्रमाणपत्र वितरीत केले जाते. माहे एप्रिल २०२१ ते मार्च, २०२२ (दिनांक २१.०३.२०२२) पर्यंत ५२०४ दिव्यांग प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेली आहेत.

.....

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.श्रीनिवास वनगा, श्रीमती.यामिनी जाधव, श्री.राजेश पाटील वि.स.स. यांनी

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

" पायरवाडी (ता.मोखाडा,जि.पालघर) येथील बालकास जव्हार कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आलेला कु. अजय युवराज पारधी या ६ वर्षीय बालकाचा दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान झालेला मृत्यू, सदर बालकास त्याच्या कुटुंबियांनी २४ जानेवारी, २०२२ रोजी त्र्यंबकेश्वर येथील दवाखान्यात नेणे, तेथे एक दिवसाच्या उपचारानंतर त्याला सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा त्र्यंबकेश्वर येथील डॉक्टरांनी सल्ला देणे, या सल्ल्यानंतर मुलाच्या पालकांनी त्याला मोखाडा येथील ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाणे, तेथील डॉक्टरांनीही बालकाला जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल करण्यास सांगणे, पालकांनी जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्या बालकावर उपचार मिळण्यास विलंब झाल्यामुळे दि. २५ जानेवारी, २०२२ रोजी उपचारादरम्यान बालकाचा झालेला मृत्यू, मृत बालकाचा देह घरी नेण्यासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने त्यांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्यास जव्हार येथील कुटीर रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून झालेला हलगर्जीपणा, मृतदेह रुग्णावाहीकेतून नेण्यासाठी पैसे न दिल्यास रुग्णावाहीका मिळणार नाही, असे रुग्णवाहीकेच्या चालकाने मृत बालकांच्या वडिलांना सांगणे, परिणामी मुलाचा मृतदेह ३५ ते ४० किमी अंतरावर असलेल्या स्वत:च्या घरी दुचाकीवरुन नेण्यात येणे, या दुर्देवी घटनेला जबाबदार असलेल्या रुग्णालयाच्या प्रशासनाच्या कारभाराविषयी जनमानसात पसरलेला तीर्व असंतोष, या दुर्देवी घटनेची व प्रशासनाच्या मनमानी कारभाराची चौकशी करुन जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी कु.अजय युवराज पारधी, वय ६ वर्षे या बालकास ग्रामीण रुग्णालय, मोखाडा येथून कुटीर रुग्णालय, जव्हार येथे संदर्भीत करण्यात आले होते. सदर रुग्णास कुटीर रुग्णालय, जव्हार येथे दुपारी ३.४० वाजता न्युमोनियाने गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले व त्यावर तातडीने उपचार सुरु करण्यात आले. उपचारा दरम्यान रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने त्यास सायंकाळी ७.३० वाजता १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देवून जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे पुढील उपचाराकरीता संदर्भीत करण्यात आले होते, परंतु नातेवाईक गावाकडून येणाऱ्या त्यांच्या इतर

(कृ.मा.प)

नातेवाईकांची वाट बघत होते. नातेवाईक आल्यानंतर रुग्ण कु.अजय पारधी यास जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे घेवून जावू असे सांगूण रुग्णास तात्काळ घेवून जाण्यास नकार दिला. दरम्यानच्या कालावधीत रुग्णाची प्रकृती अतिगंभीर झाली व उपचारा दरम्यान दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी रात्री ९.१५ वाजता रुग्णाचा मृत्यू झाला. रुग्णाच्या मृत्यू पश्चात नातेवाईकांनी मृतदेह घेवून जाण्यासाठी वाहणाची मागणी केली. रुग्णावाहिकेत मृतदेह वाहतूक करण्यात येत नाही, मात्र वैद्यकीय अधिक्षक यांनी रुग्णवाहिकेतून मृतदेह घरी सोडण्याच्या सूचना दिल्या. परंतु वाहनचालक विलंबाने रुग्णालयात आले व तत्पुर्वी नातेवाईकांनी मृतदेह कर्तव्यावरील कर्मचारी यांना न कळविता परस्पर घेवून गेले. याबाबत चौकशी करण्यात आली आहे व दोन वाहन चालकांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

****

लक्षवेधी सूचना क्र.६८

श्री. सुरेश भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६८ पुढीलप्रमाणे आहे :-

" जि. नाशिक, सिन्नर तालुक्यातील , सिन्नर पंचायत समितीच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंता गौरव सुर्यकांत गवळी यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी १५ हजार रूपयांपैकी पहिला टप्पा १० हजार रूपये लाच स्वीकारताना नुकतीच अटक करण्यात येणे, सिन्नर तालुक्यातील कासारवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी आर. ओ. प्लांट काम पूर्ण केल्यावर सदर कामाची मोजमाप पुस्तिका भरून केलेल्या कामाचे देयक काढून देण्यासाठी सदरहू अधिकारी यांनी १५ हजाराची लाच मागण्यात येणे, दरम्यान लाचखोर कनिष्ठ अभियंता गवळी यांना रंगेहाथ पकडल्यानंतर त्यांची कसून चौकशी करण्यात येणे, चौकशीत सदर लाच ही ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील तीन वरिष्ठ अधिकारी कर्मचारी कार्यकारी अभियंता श्री. भांड, उप अभियंता श्री. संजय मेस्त्री व शाखा अभियंता श्री. शिंदे यांच्यासाठी आपण स्वीकारली असल्याचा जबाब गवळी यांनी देणे, यामुळे नाशिक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा अधिकाऱ्यांबाबत जनतेत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यामुळे येथील ग्रामीण जनतेचा शासकीय अधिकाऱ्यांवरील विश्वास उडणे, त्यामुळे सदर वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांचीही चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दूर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत पंचायत समिती सिन्नर येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील श्री. गौरव सुर्यकांत गवळी, कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली असुन निलंबन कारवाई करणेबाबत पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक यांनी दिनांक १२/०१/२०२२ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. त्यानुसार ई- गव्हर्नन्स सोल्युशन्स् प्रा. लि. नवी दिल्ली या संस्थेने श्री. गौरव सुर्यकांत गवळी , कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना दिनांक १२/०१/२०२२ रोजी बडतर्फ केले आहे. तसेच सदर घटनेबाबत सिन्नर पोलिस स्टेशन गु.र.नं.१९/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक यांचे कडील दि.१२/०१/२०२२ चे पत्रान्वये श्री. गौरव सुर्यकांत गवळी, कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांना लाच स्वीकारतांना पंच साक्षीदार यांचे समक्ष रंगेहाथ पकडण्यात आले होते, त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक दिनांक १२/०१/२०२२ चे

पत्रामध्ये श्री. गौरव सुर्यकांत गवळी, कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सदर पत्रामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील श्री. पी. सी. भांडेकर, कार्यकारी अभियंता, श्री.संजय मिस्त्री उप अभियंता व श्री. शशीकांत शिंदे, कंत्राटी शाखा अभियंता यांच्या नावाचा उल्लेख केलेला नाही.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.- १११६

मा. श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी सन २०२२ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये म. वि. स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामात आर्थिक व्यवहाराशिवाय सामान्य प्रशासन विभागातून फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधीत विभागाकडे मार्गस्थ होत नसल्याचा गंभीर आरोप अरुण डोंगरे, जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे सभापती यांनी नुकताच केल्याचे निदर्शनास येणे, सदरहू सभापतीनी सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती चंचल पाटील यांचेवर थेट आरोप करण्यात येणे, शिवाय बढत्या, प्राथमिक शिक्षक समायोजन पदस्थापना यात मोठा आर्थिक घोटाळा केल्याचे आरोप करण्यात येणे, सदरहू सभापती महोदयांनी शिक्षक समायोजन व पदस्थापना देताना झालेल्या आर्थिक घोटाळ्याचे अनेक पुरावे असल्याचे वक्तव्य करणे, नुकतेच ७३ शिक्षकांचे समुपदेशन करण्यात येणे, मात्र त्यांना अद्यापपर्यंत शाळेत पदस्थापना देण्यात न येणे, यामुळे सदरहू प्राथमिक शिक्षकांच्या पदस्थापनेत मोठा आर्थिक घोटाळा झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये अधिकाऱ्यांनी आपले आर्थिक हीत जोपासले असणे, राज्य शासनाने शाळा सुरु करण्याचा निर्णय घेणे, मात्र सामान्य प्रशासन विभागाकडून केलेले घोटाळे उघडकीस येऊ नये म्हणून ऑनलाईनचा प्रयोग करण्यात येणे, या घोटाळ्यातील संबंधीत अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मंत्री (ग्राम विकास विभाग) यांचे निवेदन

जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर मधील सामान्य प्रशासन विभागाकडून बढत्या, प्राथमिक शिक्षक समायोजन पदस्थापना यात कोणत्याही प्रकारचे आर्थिक घोटाळे झालेले नाहीत. यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे सभापती यांचेकडून जिल्हा परिषदेकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही. शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या ७३ शिक्षकांच्या समुपदेशनाकरिता शिक्षण विभागाकडुन नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्तावित करण्यात आली होती. ७३ पैकी १९ शिक्षकांची मा. अप्पर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील अपिलाच्या दि.१४.०८.२०१९ च्या पारित निर्णयानुसार तर ५५ शिक्षकांची मा. उच्च न्यायालयाच्या निकालानुसार (मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल

रिट याचिका क्र.८२८२/२०२१, ८२८०/२०२१, ८२८६/२०२१, ८२८३/२०२१, ८२६९/२०२१, ८२८५/२०२१, ८२८४/२०२१) या सात याचिकेमधील दिलेल्या निर्देशान्वये समुपदेशनाने पदस्थापना देणेबाबत शिक्षण विभागाने नस्ती प्रस्तावित केली होती. समुपदेशनाने पदस्थापना देणे ही प्रक्रिया पारदर्शक असून, उपरोक्त ७४ शिक्षकांना जिल्हयातील रिक्त पदे दाखवून त्यांचे विकल्प घेऊन पदस्थापना देण्यात आलेली आहे. त्यामुळे आर्थिक घोटाळयाचा प्रश्नच उद्भवत नाही.

सदर शिक्षकांचे समुपदेशन दि.२८.०१.२०२२ रोजी करण्यात आले. १९ शिक्षकांची पदस्थापना आदेश नस्ती शिक्षण विभागाकडून १७ फेब्रुवारी २०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झाली. सदर नस्ती नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर यांचेकडे दि.१८.०२.२०२२ रोजी सादर करण्यात आली. तदनंतर नस्ती नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने शिक्षण विभागाकडे दि.२३.०२.२०२२ रोजी विभागाकडे परत गेलेली आहे. ५५ शिक्षकांचे पदस्थापना आदेश नस्ती दि.०४.०३.२०२२ रोजी शिक्षण विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झाली. ती सामान्य प्रशासन विभागाकडून दि.०८.०३.२०२२ रोजी नियुक्त प्राधिकारी यांच्या मान्यतेने सादर करण्यात आली. नियुक्ती प्राधिकारी यांची मान्यता दि.०९.०३.२०२२ रोजी होऊन शिक्षण विभागास दि.१०.०३.२०२२ रोजी परत गेलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फत शाळेच्या संदर्भात कोणताही ऑनलाईन प्रयोग करण्यात आलेला नाही.

तसेच शिक्षण विभागाकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या नस्तीमध्ये विभागाकडून नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर तात्काळ नस्ती परत गेलेली आहे. याबाबत कोणताही विलंब सामान्य प्रशासन विभागाकडून झालेला नाही. तसेच कोणत्याही प्रकारची अनियमितता तथा आर्थिक घोटाळे झालेले नसुन यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री. दिपक चव्हाण, अनिल पाटील, राजू कारेमोरे, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, नितीन पवार, दिलीपराव बनकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. सुनिल भुसारा, दौलत दरोडा, अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अशोक पवार, सुनिल शेळके, अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. आशुतोष काळे, निलेश लंके, संग्राम जगताप, रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, बबनराव शिंदे, यशवंत माने, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, मानसिंग नाईक, श्रीमती सुमन पाटील, श्री. सुनिल प्रभू, डॉ. भारती लव्हेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे: -

"जव्हार तालुक्यातील पाथर्डी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भाटीचा पाडा (जि.पालघर) येथील एका गरोदर महिलेला दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी बाळंतपणासाठी जवळील साकूर रुग्णालयात नेण्यासाठी गावांपासून रस्ताच नसल्याने सात-आठ किलोमीटर पायीच डोलीतून पायपीट करावी लागल्याची घटना दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा दरम्यान निदर्शनास येणे, या घटनेपूर्वीच सहा वर्षीय मुलाला जव्हार येथील रुग्णालयात नेण्यासाठी पैशाअभावी रुग्णवाहिका नाकारण्यांत आल्यामुळे बाईकवरुन रुग्णास घेऊन जाण्याची आलेली पाळी व त्यामुळे राज्यभर उमटलेले तीव्र पडसाद, परिणामी मौ.भाटीचा पाडा (ता.जव्हार) गावांत रस्ताच नसल्याने एका गरोदर महिलेला डोलीतून न्यावे लागणे ही बाब शासनास भूषणावह नसणे, सबब भाटीचा पाडा व अन्य लगतच्या गावांसाठी शासनाने रस्ता व वाहतुकीच्या अन्य सोईसुविधा निर्माण करण्याची आवश्यकता, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

जव्हार तालुक्यातील पाथर्डी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भाटीचापाडा हा पाडा अतिदुर्गम असून ग्रामीण मार्ग क्र.१९३ चा भाग आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार सदर पाडयाची लोकसंख्या २१० आहे. सदर पाडयास पाथर्डी सोळेपाडा गावापासून अंदाजे ४.०० कि.मी. लांबीचा कच्चा रस्ता अतितीव्र डोंगर उताराचा आहे. एकूण ४.०० कि.मी. लांबीपैकी ३.००

कि.मी. रस्त्याचा भुभाग हा वनविभागाकडे आहे. उर्वरीत १.०० कि.मी. लांबीचा भुभाग हा खाजगी जमिनीतून जातो.

२. ग्रामपंचायत पाथर्डी यांनी मागणी केल्यानुसार एकूण ४.०० कि.मी. लांबीसाठीचे काम म.ग्रा.रो.ह.यो. २०२१-२२ अंतर्गत आराखडयात समाविष्ट करुन अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

३. सदर रस्त्याचे सा.क्र.०/०० ते ३/०० हे क्षेत्र वनजमिनीमध्ये येत असल्याने ग्रामपंचायतीमार्फत दिनांक २१.०२.२०२२ रोजी प्रस्ताव मंजुरीसाठी वन विभागाकडे सादर केलेला आहे. तसेच ३/०० ते ४/०० हे मालकी क्षेत्र असल्याने संबंधित व्यक्तींची संमती घेवून त्यावर म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत काम सुरु करण्यात आलेले आहे.

४. तसेच लेखाशिर्ष ३०५४-०३६३ मार्ग व पुल जनजाती क्षेत्र कार्यक्रम २०२२-२३, ३०५४, TH ००२-२०% अपृष्ठांकीत रस्ते या लेखाशिर्षाखाली पाथर्डी डोंगरपाडा ते भाटीपाडा मनमोहाडी रस्ता (ग्रा.मा.१९३) नविन रस्ता तयार करणेसाठी रु.७५.०० लक्ष रक्कमेकरिता जिल्हा नियोजन आराखडयामध्ये समाविष्ट आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६४१ पुढील प्रमाणे आहे:-

"नागपूर, वर्धा येथील कामगारांच्या जीवावर कोट्यावधी रुपये नफा कमावणाऱ्या लॉयड्रस उत्तम गलवा कंपनीतील कामगारांची मोठया प्रमाणात पिळवणूक व आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना साधी वेतनसुध्दा अधिकृत वेतन स्लीपवर देण्यात न येणे, वेतन स्लीप आणि पीएफ स्लीप कामगारांना न देणे,विमा उतरविल्याचे सांगण्यात येणे,परंतु प्रत्यक्षात विम्याची रक्कम जमा न करता कामगारांची कंपनीकडून प्रचंड फसवणूक करण्यात येणे, कामगारांसाठी कोणत्याही सुरक्षात्मक उपाययोजना करण्याकडे कंपनी व्यवस्थापनातर्फे करण्यात येत असलेले हेतुपूर्वक दुर्लक्ष, सदरहू कंपनीत धोक्याच्या ठिकाणी कामगारांकडून काम करुन घेण्यात येत असणे, दि.१३.०२.२०२२ रोजीच्या पहाटे पाचच्या सुमारास कमलेश गजभिये नामक कामगार कन्वेयर बेल्टसमोर काम करताना सुरक्षेची कोणतीही साधने नसल्यामुळे सदर कामगाराचा बेल्टमध्ये अडकून मृत्यु झाल्याची गंभीर घटना घडणे,बेल्ट कापून कमलेशचा मृतदेह बाहेर काढण्यात येणे,या भीषण अपघातामुळे कामगारांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, कंपनी व्यवस्थापनाने सदरहू मृत्यु प्रकरण पोलीसांशी व कामगार अधिकाऱ्यांशी (लेबर ऑफिसर) आर्थिक संगनमत करुन सेवाग्राम मध्ये पाठविलेल्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करुन मृतदेह परस्पर कामगाराच्या गावी पाठविण्यात येऊन सदर प्रकरण दडपून टाकल्याचा घडलेला गंभीर प्रकार, सदरहू कंपनीत यापूर्वी मोठा बॉयलर स्फोट होऊन यामध्ये सुमारे ३४ कामगार जखमी होऊन दोन कामगारांचा मृत्यू होणे, यामुळे सदरहू कंपनीत कामगार सुरक्षित नसल्याने वारंवार अपघात होऊन कामगारांच्या जिवीताला निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे कामगारांमध्ये निर्माण झालेले संतापाचे, चिंतेचे व असुरक्षिततेचे वातावरण, शासनाच्या कामगार विभागाकडे यासंदर्भात वारंवार तक्रारी करुनही लेबर ऑफिसरचे सदर कंपनीशी असलेले आर्थिक हितसंबंध लक्षात घेता, सदर तक्रारींना केराची टोपली दाखविणे, यास्तव सदर कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कामगार अधिकाऱ्यास तात्काळ निलंबित करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

उत्तम गलवा मेटॉलीक लि.ही कंपनी बरबडी,भुगाव, लिंक रोड, जि. वर्धा येथे कार्यरत आहे.सदर कंपनीमध्ये हॉट मेटल,मेटालर्जीकल कोकचे उत्पादन होते.सदर कारखान्यामध्ये २९८ स्थायी कामगार असून १६ परवानाधारक कंत्राटदारामार्फत १६८० कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. सदर कंपनीला अभियांत्रिकी या उद्योगाचे किमान वेतन दर लागू आहेत. तसेच कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना वेतन स्लीप देण्यात येत असून सर्व कामगारांचे वेतन बँकेमार्फत करण्यात येते. तसेच पीएफबाबत ऑनलाईन पासबुक झाल्यामुळे सन २०१२ पासून पीएफ स्लीप कामगारांना देण्यात येत नाही. सदर कंपनीला ईएसआयसी योजना लागू असून

सदर आस्थापनेतील कोणत्याही कामगारांची ईएसआयसी व पीएफची रक्कम थकित नसल्याचे कंपनी व्यवस्थापनामार्फत सांगण्यात आले आहे.

सदरहु कारखान्यात ब्लास्ट फर्नेसचा वापर करून हॉट मेटल/मोल्टन मेटलचे उत्पादन केले जाते. दिनांक १३/०२/२०२२ रोजी पहाटे ४.५० वा. च्या सुमारास श्री. कमलेश गजभिये त्यांचा तोल गेल्याने ते कन्वेअर बेल्टवर पडले. त्याच दरम्यान ड्रममधून कच्चा माल त्यांच्या अंगावर पडल्यामुळे त्यांचा श्वास गुदमरला व ते बेशुद्ध झाले. त्यांना त्वरीत वर्धा येथील कस्तुरबा रूग्णालयात नेण्यात आले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदरहु अपघाताच्या घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून करण्यात आलेली असून चौकशी दरम्यान कारखाने अधिनियम,१९४८ चे कलम ७ A (२) (a) च्या कायदेभंगासाठी भोगवटादाराविरुध्द एक खटला न्यायालयात दाखल करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली असून न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई कायदा, १९२३ अन्वये रु. १४,९५,५००/- नुकसान भरपाई आयुक्त, वर्धा यांचेकडे दिनांक २५/०२/२०२२ रोजी जमा केले आहेत. तसेच मृत कामगाराच्या वारसांना सानुग्रह अनुदान म्हणून रु. १८,०४,५००/- नुकसान भरपाई आयुक्त, वर्धा यांचेकडे जमा केले आहेत. त्याचप्रमाणे कारखाना व्यवस्थापनातर्फे शववाहिकेचा खर्च आणि अंत्यविधीच्या खर्चाकरिता रु.५०,०००/- मृताच्या पत्नीस देण्यात आले. अपघाताच्या घटनेनंतर दिनांक १४/०२/२०२२ रोजी मृत कामगाराच्या परिवाराच्या परवानगीने शव विच्छेदन करण्यात आले.

सदरहू कारखान्यात यापुर्वी दिनांक ०३/०२/२०२१ रोजी सकाळी १०.१० वाजता अपघाताची घटना घडली असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेमध्ये ब्लास्ट फर्नेसचा वापर केला जातो. कांही ठराविक कालावधीनंतर ब्लास्ट फर्नेस बंद करून, त्या फर्नेसच्या आतील भागाच्या साफसफाईचे व वार्षिक देखभालीची कामे केली जातात. याकरिता त्या ब्लास्ट फर्नेसचे दिनांक ०२/०२/२०२१ रोजी शट डाऊन घेतल्यानंतर ब्लोडाऊन ऑपरेशन करणे सुरू होते. दिनांक ०३/०२/२०२१ रोजी सकाळी १०.१० वा. चे सुमारास ब्लास्ट फनेसमधील गरम कोक स्लंग काढण्याचे काम सुरू असतांना अचानक ब्लास्ट फर्नेसमधील मटेरियल /जाम (मेटल) त्यामध्ये पडल्यामुळे आतमध्ये तयार झालेल्या दाबामुळे आतील २०० अंश सेल्सिअस ची गरम हवा उघडया असलेल्या टयुअरमधून बाहेर निघाली व त्यामुळे ब्लास्ट फर्नेसच्या प्लॅटफॉर्मवर काम करीत असलेल्या ३८ कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या. ब्लास्ट फर्नेसच्या आतील बाजूस चिटकून असलेले मेटल पूर्णपणे निघाले नसल्यामुळे सदरचा अपघात घडला.

सदर अपघातामधील ३८ जखमी कामगारांपैकी उपचारादरम्यान दि. १४/०२/२०२१, १६/०२/२०२१ आणि २६/०२/२०२१ रोजी प्रत्येकी एका जखमी कामगारांचा मृत्यू अशाप्रकारे एकूण तीन कामगारांचा मृत्यू झालेला आहे. उर्वरित ३५ जखमी कामगार कारखान्यात कामावर रुजु झालेले आहेत.

सदरहु अपघाताच्या चौकशीमध्ये कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ A (२) (a) व कलम ७ A (२) (c) चा कायदेभंग आढळल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा यांच्या न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम १२३ (२) व नियम ११९ (१) चा कायदेभंग आढळल्याने व्यवस्थापकाविरूध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा यांच्या न्यायालयात एक खटला दाखल करण्यात आलेला आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मृत कामगारांच्या वारसांना खालीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली आहे.

१. श्री. अभिषेक मौमिक या मृत कामगारांच्या आईस प्रतिदिन रु ४७४/- प्रमाणे कामगार राज्य विमा मंडळाकडून हितलाभ दिला जात आहे. त्याचप्रमाणे त्या मृत कामगारांच्या वारसास व्यवस्थापनाने रू. ११,००,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे. सदरहू कामगार हा अविवाहित होता व त्याची आई वयोवृध्द असल्यामुळे त्यांच्याकडून नोकरीकरिता मागणी करण्यात आलेली नाही.

२. श्री. श्यामकिशोर पाल या मृत कामगाराच्या पत्नीस व मुलास प्रतिदिन रु. ७११/- प्रमाणे राज्य विमा मंडळाकडून हितलाभ दिला जात आहे. त्याचप्रमाणे त्या मृत कामगाराच्या वारसास व्यवस्थापनाने रू. २१,००,०००/- सानुग्रह अनुदान दिलेले आहे. मृतकाच्या पत्नीस कारखान्यात दि. १४/०४/२०२१ रोजी रू. २५,०००/ मासिक पगारावर नोकरीत सामावून घेण्यात आले आहे.

३. श्री मनोज कुमार यादव या मृत कामगाराच्या पत्नीस रु. २९०१/-, मुलीस रु. ७२५/ व मुलास रू. ७२५/- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था (EPFO) यांचेकडून प्रतिमाह हितलाभ दिला जात आहे. याशिवाय कारखान्याच्या व्यवस्थापनाने GPA (Group Personal Accident) पॉलिसी घेतलेली असल्याने मृतकाच्या वारसास रक्कम रू १९,९३,३२०/- देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने रु ५१,००,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे. मृत कामगार यांच्या पत्नीने अनुकंपा तत्वावर मिळत असलेली नोकरी करण्यास इच्छुक नसल्याचे व्यवस्थापनास लेखी कळविले आहे.

कारखाना व्यवस्थापनाने सर्व जखमी कामगारांना त्यांच्या जखमेच्या तीव्रतेनुसार एकूण रु. १३,६५,०००/- सानुग्रह अनुदान दिले आहे.

कारखान्यातील दोन्ही अपघातांमध्ये भोगवटदारांविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे या अपघातांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याची बाब खरी नाही.

****

लक्षवेधी सूचना

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना

सर्वश्री. विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.:-

"राज्यतील घरेलू कामगारांना एप्रिल २०२१ मध्ये जाहीर केलेले प्रत्येकी रु १५००/- अदयाप मिळाले नसल्याचे बाब माहे. फेब्रुवारी २०२२ तिस-या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, अनेक पात्र घरेलू कामगारांनी कोविड अर्थ सहाय्य तात्काळ मिळणे साठी निवेदनादवारे शासना कडे मागणी करूनही अध्याप दिली नाही तसेच घरेलू कामगारांना किमान वेतन व पेन्शन देण्याचे देण्याची मागणी शासन कडे प्रलंबित असणे, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाची स्थापना होऊन अनेक वर्ष होऊनही हे मंडळ पूर्ण पणे कार्यान्वित झाले नसणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही"

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

राज्यामध्ये कोविड-१९ या विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत विविध उपाययोजना करीत असताना घरेलू कामगारांना आर्थिक मदत देण्याची मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. त्यानुसार महाराष्ट्र घरेलू कामगार मंडळाकडे नोव्हेंबर,२०११ पासून नोंदित असलेल्या घरेलू कामगारांना रु.१५००/- इतके एकवेळचे अर्थसहाय्य देण्याबाबत दि.३०.४.२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे

वरील आदेशानुसार जिल्हास्तरावर लाभ वाटप करण्यात येवून आतापर्यंत ५९७८८ इतक्या घरेलू कामगारांना रू. १५००/- प्रमाणे रू. ८,९६,८२,०००/- "आर्थिक मदत" देण्यात आली आहे.

राज्यातील घरेलू कामगारांना एप्रिल, २०२१ मध्ये जाहिर केलेली रु.१५००/- ची आर्थिक मदत मिळाली नसल्याची बाब घरकामगार संघटनांनी दि.११.२.२०२२ व दि.१४.३.२०२२ च्या निवेदनाव्दारे निदर्शनास आणलेली आहे. तथापि, तशी वस्तुस्थिती नाही. दरम्यान मंडळाकडे नोंदित असलेल्या बऱ्याचशा घरेलू कामगारांचे बँक तपशिल उपलब्ध नसल्याने घरेलू कामगारांची माहिती अद्ययावत करणेकरीता मंडळामार्फत https://public.mlwb.in/public ही लिंक तयार करण्यात येवून जिल्हा कार्यालयास स्थानिक पातळीवर प्रसिध्दी देण्यात आली आहे. जेणेकरून जास्तीत जास्त घरेलू कामगारांची माहिती अद्ययावत होवून त्यांना रू. १५००/- चे एकवेळचे आर्थिक लाभ देणे शक्य होईल.

घरेलू कामगारांना किमान वेतन लागू करण्यासाठी त्यांच्या वेतनाचा समावेश किमान वेतन अधिनियमातील शेड्युल मध्ये असणे आवश्यक आहे. वेतन संहिता, २०२० लागू करण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. सदर वेतन संहिता, २०२० लागू झाल्यास घरेलू कामगारांचा व्यवसाय ज्या श्रेणीत येईल त्या श्रेणीतील वेतन त्यांना लागू होणार आहे. तसेच, असंघटित कामगारांना पेन्शन मिळण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना लागू करण्यात आली असून, या योजनेंतर्गत नोंदित घरेलू कामगारांना लाभ मिळणार आहे.

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम, २००८ च्या कलम ४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन दिनांक २७.०३.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनूसार एक सदस्यीय मंडळ अस्तित्वात आहे.

लक्षवेधी सूचना

श्री.संतोष दानवे, श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

"पुणे-नाशिक महामार्गावर संगमनेर तालुक्यातील चंदनपुरी घाटात धावत्या टेम्पोला आग लागून पुणे बोर्डाच्या बारावीच्या प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मध्यप्रदेशातील भोपाळ येथून या प्रश्नपत्रिका मुद्रीत करुन घेऊन येणे, पेपरफुटी टाळण्यासाठी आणि गोपनियता भंग होऊ नये म्हणून प्रश्नपत्रिका मुद्रीताचे काम महाराष्ट्राऐवजी परराज्यात देण्यात येणे, सदर प्रश्नपत्रिका बाहेरच्या राज्यात दिल्यामुळे मुद्रीतांचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रती अविश्वास व्यक्त झाल्यामुळे त्यांच्यात तसेच परिक्षेचे वेळापत्रक बदलण्यात आल्याने परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्याने परिक्षेची तारीख बदलण्यात येणे, प्रश्नपत्रिका मुद्रीताचे काम बाहेरील राज्यातील कंपनीला न देता राज्यातील शासकीय मुद्रणालयात पेपरफुटी व गोपनियतेचा भंग न करण्याच्या अटीवर देण्याबाबत आणि या पेपर जळीतकांडातील दोषींवर त्वरीत कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा दि.४.०३.२०२२ ते दि.३०.०३.२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोपनीय प्रश्नपत्रिका छपाईचे काम पूर्वीपासून प्रचलित असलेल्या कार्यपध्दतीनुसार करारनामा करुन महाराष्ट्र राज्याबाहेरील मुद्रणालयास देण्यात आले.

संबंधित गोपनीय मुद्रणालयाकडून इयत्ता १२ वी परीक्षेच्या दिनांक ५ व ७ मार्च, २०२२ रोजी आयोजित केलेल्या विषयांच्या सीलबंद प्रश्नपत्रिका पुणे विभागीय मंडळास पोच करण्यासाठी गोपनीय साहित्याचा ट्रक पाठविण्यात आला होता. तथापि, सदरील आयशर मालट्रकला दिनांक २३.०२.२०२२ रोजी सकाळी ६.०० च्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र.६० , चंदनापुरी घाटात, अचानक आग लागून सदरील मालट्रकने पेट घेतला व त्यामध्ये इयत्ता १२ वी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका जळत असल्याचा निरोप संबंधित गोपनीय मुद्रणालयाकडून तसेच पोलीस स्टेशन, घारगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांचेमार्फत राज्यमंडळास दुरध्वनीव्दारे प्राप्त झाला.

सदरली घटनेची राज्यमंडळातील अधिकारी यांनी पाहणी केली असता, त्यामध्ये गोपनीय मुद्रणालयाकडून पुणे विभागीय मंडळाकडे पाठविण्यात येत असलेल्या सीलबंद प्रश्नपत्रिका घेऊन

येणाऱ्या ट्रकला आग लागून त्यामध्ये असलेल्या इयत्ता १२ वीच्या दिनांक ५.३.२०२२ रोजीच्या व्दितीय भाषेच्या एकूण ५ विषयांच्या प्रश्नपत्रिका तसेच दिनांक ७.३.२०२२ रोजीच्या व्दितीय भाषेच्या एकूण १३ विषयांच्या प्रश्नपत्रिका अर्धवट जळालेलया स्थितीत आढळून आल्या. सदर प्रश्नपत्रिकांच्या वरील सीलबंद पाकीटे अर्धवट जळालेली असल्याने प्रश्नपत्रिकांमधील न जळालेल्या भागातील आशय दिसून येत होता.

उपरोक्त अकस्मित जळीत घटनेतील गोपनीय प्रश्नपत्रिका प्रत्यक्षात पुणे येथे पोहोचल्यानंतर गोपनीय मुद्रणालयाच्या प्रतिनिधीमार्फत पुणे विभागीय मंडळास हस्तांतरीत करण्यात येणार होत्या. परंतु, सदरचे साहित्य त्यांच्या ताब्यात देण्यापूर्वीच उपरोक्तप्रमाणे आगीची घटना घडली. त्यामुळे सदरचे साहित्य गोपनीय मुदणालयाच्याच ताब्यात असल्यामुळे सदर प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे विहीत पध्दतीने नष्ट करण्यासाठी पोलीस यंत्रणेमार्फत मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समक्ष गोपनीय मुदणालयाच्या प्रतिनिधीच्या ताब्यात देण्यात आले.

उपरोक्त वस्तुस्थिती आणि प्रश्नपत्रिकेचा आशय स्पष्टपणे दिसत असल्याची बाब विचारात घेता त्याच प्रश्नपत्रिकांचा वापर करुन परीक्षा घेणे योग्य नव्हते. तसेच नवीन प्रश्नपत्रिकांच्या आधारे सदर विषयांची परीक्षा दि.५.०३.२०२२ व दि.७.०३.२०२२ या निर्धारीत दिनांकास आयोजित करण्यासाठी पुरेसा कालावधी नव्हता. त्यामुळे सदर विषयांच्या परीक्षा अनुक्रमे दिनांक ५.०४.२०२२ व दि.७.०४.२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

प्रश्नपत्रिका छपाई संदर्भातील सर्व कामकाज गोपनीय असून अतिशय संवेदनशील आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विशिष्ट परीक्षेसाठी वापरण्यात येणाऱ्या विषयनिहाय प्रश्न पत्रिकांमधील आशय सदर कामकाजाशी संबंधीत कोणत्याही घटकास तसेच मंडळ अधिकारी, कर्मचारी अथवा परीक्षेशी संबंधीत अन्य कोणत्याही यंत्रणेला प्रत्यक्ष पेपर सुरु होईपर्यंत पाहण्यासाठी उपलब्ध नसतो. त्यामुळे गोपनीय मुद्रणालयाच्या स्तरावर या संदर्भात होणाऱ्या छपाईपूर्व, छपाई दरम्यानच्या तसेच सदर साहित्य सीलबंद करण्याच्या कामकाजाच्या वेळी प्रश्न पत्रिकेतील आशयाची गोपनीयता राखणे आवश्यक असते. यासाठी सदर गोपनीय छपाईचे कामकाज मंडळाच्या प्रचलित पध्दतीनुसार राज्याबाहेरील मुद्रणालयामार्फत करुन घेण्यात येते. यामागे राज्यातील मुद्रीताचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रती अविश्वास व्यक्त करण्याचा अथवा त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, घारगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर येथे अकस्मात जळीत रजिस्टर नंबर ०१/२०२२ अन्वये दि.२३.०२.२०२२ रोजी तक्रार नोंदविण्यात आली आहे.

****

लक्षवेधी सुचना क्रमांक - ४८७४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईत महारेराने चुकीचे बांधकाम करणाऱ्या विकासकांविरुद्ध ६३३ कोटी रुपयांचे पुनर्प्राप्ती वॉरंट जारी केल्याचे निदर्शनास येणे, तसेच मागील तीन वर्षापासून या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदनिका खरेदीदारांमध्ये अविश्वास निर्माण होत असणे, त्यामुळे खरेदीदारांना त्यांची गुंतवणूक परत करण्याबाबत चुकार विकासकांच्या विरोधात कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे त्याची तातडीने अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

<u>मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन</u> :-

राज्यात स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६, दि.०१ मे २०१७ पासून अंमलात आला आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे दि. ०१ जुलै २०१७ पासुन ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त व्हावयास सुरुवात झाली. जे प्रकल्प नोंदणीकृत आहे अशा प्रकल्पातील ग्राहक महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणकडे तक्रार दाखल करु शकतात. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण हे Quasi Judical न्यायाधिकरण असल्याने अशा प्राप्त झालेल्या तक्रारीवर सुनावणी घेऊन आदेश पारित केले जातात. सदर आदेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर दर्शविले जातात. जर विकासकाने सदर आदेशाचे वेळेवर पालन केले नाही तर विहित मुदतीत ग्राहक परत प्राधिकरणाकडे (Non-compliance) म्हणून तक्रार दाखल करतात. अशा तक्रारीवर परत सुनावणी होऊन कलम ४० अन्वये विकासकाविरुध्द जप्तीचे वॉरंट काढले जाते व सदर वॉरंट पुढील कार्यवाहीसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविले जातात व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुढील कार्यवाही करण्यात येते.

शेरा H/1212 (450-3-22)/ [illegible]

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातर्फे आतापर्यंत २७१ प्रकल्पांमधील ७०८ तक्रारीमध्ये रु. ७०२.४९ कोटीचे वॉरंट काढून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना पाठविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात येतो.

****

M/1212-19

गृहनिर्माण विभाग/झोपसू

लक्षवेधी सूचना

श्री. सुनिल कांबळे, श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये निर्माण झालेल्या अडचणी विषयी बैठक लावणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त पुणे यांना ९ सप्टेंबर २१ रोजी विभागीय आयुक्त पुणे यांना पत्र देणे परंतु सदर बैठकीचे आयोजन अद्याप पर्यंत न होणे. पुणे शहरात काशेवाडी, मंगळवार पेठ, लोहिया नगर, ताडीवाला रोड, नाना पेठ इत्यादी ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम चालू असणे. यापैकी बरेच प्रकल्प अर्धवट अवस्थेत असणे. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प करणाऱ्या विकसकांचे प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी असलेल्या हितसंबंधा मुळे प्रत्यक्ष झोपडपट्टी धारकांची विकासकाकडून वेगवेगळ्या प्रकारे अडवणूक करणे व पात्र असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना सुद्धा घरापासून वंचित राहावे लागणे प्राधिकरनाच्या कार्यालयामध्ये सदर प्रकल्पावर देखरेख व तांत्रिक तपासणी करण्यासाठी स्वत:चे योग्य ते मनुष्यबळ न. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या बांधकामाची तांत्रिक दृष्ट्या तपासणी न होणे. लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था केली असतानाही त्या ठिकाणी सदर झोपडपट्टीधारकांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे व लोहियानगर येथे होत असलेल्या प्रकल्पाचे काम गेल्या दहा वर्षांपासून रखडलेली असते त्यामुळे येथील रहिवाशांना स्वत:चे घर मिळण्यासाठी अनेक वर्षे वाट पाहावी लागणे. नाना पेठेतील प्रकल्प पूर्ण झालेला असून तेथे लाभधारकांना मिळालेल्या घरांमध्ये कोणत्याही सोयी सुविधा नसणे ताडीवाला रोड येथील पानमळा प्रकल्पातील झोपडपट्टी धारकाला विकसक व अधिकाऱ्यांच्या असलेल्या संगनमतामुळे पात्र असूनही अनेक वर्ष हेलपाटे मारायला लावून ही अद्याप पर्यंत त्यांना स्वत:च्या हक्काचे घर न मिळणे या सर्व गोष्टींची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व गरीब झोपडपट्टीधारकांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे निवेदन

राज्यातील प्रमुख शहरात वाढत्या नागरिकरणामुळे विशेषत: पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रात खाजगी, शासकीय तसेच निम शासकीय जमीनींवर वसाहती स्वरूपात अतिक्रमणे होऊन मोठया प्रमाणात झोपडपट्टया तयार झाल्या आहेत.

मागील काही वर्षांपासून बदललेल्या आर्थिक परिस्थिती व एकंदरीत बांधकाम क्षेत्रातील मंदीमुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे कार्यालयातील एस.आर.ए प्रकल्पांचे काम आणखी मंदावले आहे. वर्षाला ४० हून अधिक प्रकल्पांना मंजुरी देणाऱ्या झोपुप्रा, पुणे कार्यालयाकडे मागील ३ वर्षांमध्ये ९,७,५ या उतरत्या क्रमाने प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच मा. विधानसभा सदस्य यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या सर्व पत्रांची योग्य दखल घेऊन, त्यानुसार संबंधीतांना अवगत केले जाते.

झोपुप्रा, पुणे कार्यक्षेत्रातील रखडलेल्या सर्व योजना मार्गी लावण्यासाठी व भविष्यात जास्तीत जास्त पुनर्वसन प्रकल्पांना चालना मिळणेकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र विकास नियंत्रण नियमावली, २०२२ च्या अंतिम मसुद्यामध्ये २५ प्रमुख बदल सुचविले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड यांनी प्रस्तावित केलेले एकत्रित विकास नियमावलीतील बदलाच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अंतर्गत सुरू असलेले एकूण २७७ प्रकल्पांपैकी ५२ प्रकल्प पुर्ण व १९ प्रकल्प अंशत: पुर्ण झालेले आहेत. तसेच एकूण प्रकल्पांपैकी १२२ प्रकल्पांचे कामकाज विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर सुरू आहेत. तसेच एकूण प्रकल्पांपैकी ४६ प्रकल्पांची कलम (३ड) व झोपडपट्टी निष्कासनाची कार्यवाही सुरू आहे. तसेच एकूण प्रकल्पांपैकी ३८ प्रकल्पांना प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याने जागेवर बांधकाम प्रगतीपथावर सुरू आहे.

झोपुप्रा, पुणे कार्यालयात प्रस्ताव दाखल झाल्यानंतर योजना क्षेत्रात जाऊन जागेवरील असलेली झोपडीधारकांची सर्वेक्षण पुर्ण करुन त्यांची पात्रता निश्चित करण्याबाबतची कार्यवाहीसाठी प्राथमिक व अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येते. तसेच पुराव्या अभावी अपात्र झालेल्या झोपडीधारकांची अपिल दाखल केल्यानंतर छाननी करुन पात्रता देखील निश्चित करण्यात येते.

प्राधिकरणाकडे अधिकाऱ्यांची नेमणूक ही इतर विभागाकडून प्रतिनियुक्तीवर करण्यात येते. तसेच काही अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक कंत्राटी मानधन तत्वावर करण्यात येते. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल होणारे तसेच ज्या प्रकल्पांना बांधकाम मंजूरी देण्यात आली असून अशा प्रकल्पांच्या देखरेखीचे काम प्राधिकरणातील तांत्रिक विभागामार्फत वेळोवेळी तपासणी केली जाते. तसेच आवश्यक त्या वेळी गरज पडल्यास कोणत्याही प्रकल्पांमधील कोणत्याही बाबींची तपासणी प्राधिकरणातील तांत्रिक अधिकाऱ्यांकडून केली जाते.

लोहियानगर येथील झोपडपट्टी धारकांना बिबवेवाडी येथे तात्पुरती राहायची व्यवस्था कात्रज लेकटाऊन येथे केली असून त्या ठिकाणी झोपुप्रा कार्यालयामार्फत वेळोवेळी तेथील सुविधांबाबत योग्य ती कार्यवाही करुन दक्षता घेतली जाते.

नाना पेठ येथे सुमारे ३ ते ४ पुनर्वसन प्रकल्प पुर्ण झाले आहेत व त्यापैकी काही प्रकल्प पुर्ण होऊन ५ वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. तसेच त्यापैकी १ प्रकल्प महानगरपालिकेमार्फत पुर्ण करण्यात आला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकासकामार्फत प्रकल्प पुर्ण करुन सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन तद्नंतरच त्यास भोगवाटा प्रमाणपत्र अदा करण्यात येते.

पानमळा येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे बांधकाम मागील ४ वर्षांपासून सुरू आहे, ही वस्तूस्थिती आहे. तथापि, अन्य रखडलेल्या झोपुप्रा प्रकल्पांप्रमाणेच सदर प्रकल्प पुर्णपणे टीडीआरवर अवलंबून असल्याने विकासकाच्या आर्थिक अडचणीमुळे सदर प्रकल्प पुर्ण होण्यास अडचण निर्माण झाली आहे. तथापि, असे सर्व प्रकल्प नविन नियमावलीस मान्यता मिळाल्यानंतर पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या कोरोना काळात विकासकांची आर्थिक परिस्थिती मंदावल्याने विकासक यांना बऱ्याच प्रमाणात योजना पुर्ण करण्याच्या दृष्टीने आर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील जवळपास सर्व प्रकल्प प्रचलित नियमावलीनुसार केवळ टीडीआरवर अवलंबून आहेत व विकासक यांना देय असणारा टीडीआर बाजारातील त्यांचे दरातील मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या चढ-उतार यामुळे आर्थिक दृष्ट्या परवडणारा नसल्याने विकासक यांना सदरचा प्रकल्प वेळेत पुर्ण करणे शक्य होत नाही. त्यामुळे सदर योजनेतील झोपडीधारकांना बऱ्याच प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरीदेखील जे जे प्रकल्प विकासक यांना आर्थिक दृष्ट्या पुर्ण करणे शक्य होत नसल्यास अशा विकासकाकडून सदरचा प्रकल्प काढुन घेऊन त्याबाबत ई-निविदेद्वारे अन्य सक्षम विकासकामार्फत सदरचा प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने झोपुप्रा, पुणे कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात बऱ्याच प्रमाणात झोपडपट्टी व्याप्त असलेल्या क्षेत्रात विकासक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविणेकरीता तयार आहेत, परंतू सद्यस्थितीत बांधकामापोटी देण्यात आलेला टीडीआरला बाजारात विक्री करण्यास बाजारभाव नसल्याने तसेच प्रस्तावित करण्यात आलेल्या नविन नियमावलीच्या मंजूरीअंती बरेच विकासक यांनी झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रात असलेले पुनर्वसन प्रकल्प दाखल करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

त्यामुळे सुधारीत नियमावलीस शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील गेले अनेक वर्ष प्रलंबित तसेच भविष्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना नवसंजिवनी मिळून पुणे व पिंपरी-चिंचवड शहर झोपडपट्टी मुक्त करण्यास खऱ्या अर्थाने चालना मिळणार आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.मंगलप्रभात लोढा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात मुंबईतील रखडलेल्या ३८० झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देण्यासाठी शासनाने अभय योजना आणली या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधी शासनाकडे करीत असल्याची बाब माहे जानेवारी २०२२ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, एसआरएचे घर विकताना पुर्वीची १० वर्षाची अट तीन वर्षाची करणे, सन २००० ते २०११ पर्यंत राहणाऱ्या झोपडपट्टीतील रहिवाश्यांकडून वसूल करण्यात येणारी रक्कम कमी करुन शासन निर्णय २०१८ ची अंमलबजावणी करणे, एसआरए योजने अंतर्गत मुंबईच्या आदिवासींना पर्यायी घरे देणे पुर्वी चाळी बांधून पहिल्या मजल्याची घरे विकत घेतली त्या नागरिकांना पर्यायी घरे देणे, आदी मागण्या केलेल्या असणे, या मागण्यांना न्याय देण्याची आवश्यकता असतानाही न देणे, त्यामुळे सर्वसामान्य झोपडपट्टी धारकांच्यामध्ये शासना विरोधी नाराजी व्यक्त होत असणे, एसआरएची, जी योजना बंद केली आहे ती सुरु करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबईत सुमारे ३८० झोपडपट्टी पुनर्वसन योजना विविध कारणांमुळे रखडलेल्या आहेत. सदरहू रखडलेल्या योजनांना गती देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.०८.२०२१ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार रखडलेल्या योजना मार्गी लावण्यासाठी खालील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत:-

प्रस्ताव १ - रखडलेल्या योजनांकरिता निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे.

प्रस्ताव २ - झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व म्हाडा यांच्या संयुक्त भागीदारीत योजना पूर्ण करणे.

प्रस्ताव ३ - शासकीय जमीन धारणीधारक 'क' (वर्ग-१) मध्ये रुपांतर करण्याची मुभा देणे.

प्रस्ताव ४ - अभय योजना (Amnesty Scheme) राबविणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बांधकाम केलेल्या सदनिका/गाळे विकण्याची कालमर्यादा महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(ई) मधील तरतुदीनुसार सदनिका/गाळे यांचा ताबा मिळाल्यापासून १० वर्षे इतका आहे. तर गृहनिर्माण विभागाच्या दि.१६.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२००० ते ०१.०१.२०११ पर्यंतच्या झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला आहे. तेव्हा, अधिनियमाच्या कलम ३(ई) मध्ये सुधारणा आणि सशुल्क सदनिकांचे

शुल्क निश्चित करुन झोपडपट्टीवासियांना धोरणात्मक सवलत देण्याच्या हेतूने दि.०९ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

मा.मंत्रीमंडळ उपसमितीने खालील शिफारशी केलेल्या आहेत :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या पुनर्वसन सदनिका ३ वर्षाच्या कालावधीनंतर विकण्यास परवानगी देण्यात यावी. सदरहू ३ वर्षाच्या कालावधीची गणना ही पात्र लाभार्थ्यांच्या झोपडीचे निष्कासन केल्याच्या दिनांकापासून गृहीत धरावी. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये आवश्यक सुधारणा केल्यानंतर सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

(२) सशुल्क पुनर्वसन सदनिकेची किंमत सरसकट रुपये २.५ लाख इतकी करण्यात यावी. पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपडीधारकांसाठी सशुल्क सदनिकेचे शुल्क सरसकट रु.२.५० लाख इतके करण्याची शिफारसही मंत्रीमंडळ उपसमितीने केली आहे.

त्याचप्रमाणे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्यातील महत्वाच्या उपाययोजना खाली नमूद करण्यात येत आहेत:-

१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना परवानगी देण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी संगणकीय प्रणाली (Auto DCR) विकसित करण्यात येत आहे.

२) पात्र अपात्रतेबाबतचे परिशिष्ट-२ निर्गमित करण्यासाठी लागणारा दीर्घ कालावधी कमी करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने Auto Annexure संगणकीय प्रणाली विकसित करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे परिशिष्ट-२ तात्काळ निर्गमित करणे शक्य होणार आहे.

३) सार्वजनिक जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी अधिमूल्य भरण्यास सवलत देण्यात आली असून सदरचे अधिमूल्य १०:१०:८० या प्रमाणात घेण्यात येत आहे.

४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना आशयपत्र व मंजूर आराखडे एकाच वेळी देण्यात येत आहेत.

५) परिशिष्ट-२ ला लागणारा कालावधी कमी करण्याकरिता झोपडीधारकाचे बायोमेट्रीक सर्व्हेक्षण प्रक्रिया अवलंबिण्यात येत आहे. त्याकरिता नव्याने ४ संस्थांची नेमणूक निविदेद्वारे करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१, झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक हे पुनर्वसन सदनिकेचा लाभ घेण्यास पात्र ठरत नाहीत. सदरची बाब मा.उच्च न्यायालयाने देखील वेळोवेळी अधोरेखित केलेली आहे. पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना घरे देणे हे कोणत्याही दृष्टीकोनातून तर्कसंगत/ व्यवहार्य ठरत नाही. त्यामुळे पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घरे देणे शक्य होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

लक्षवेधी सूचना

नगर विकास विभाग

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-

"कल्याण पश्चिमेकडील कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नजीक असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात विकासकाने अनियमितता झाल्याच्या तक्रारीवर मा. सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार, कल्याणच्या बाजारपेठ पोलीस ठाण्यात केडीएमसीच्या पाच माजी आयुक्तांसह, सहाय्यक संचालक, नगररचनाकार, बिल्डर आणि वास्तूविशारद यांचेसह १८ जणांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार दि.१८ जानेवारी, २०२२ रोजी गुन्हा दाखल केल्याची घटना घडणे, माणिक कॉलनी वसाहतीतील १३७ मूळ रहिवाशी कुटुंबांना मालकी हक्काची घरे मिळावी यासाठी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणे, परंतु, रहिवाशी कुटुंबा बरोबर केलेल्या करारनाम्या ऐवजी बांधकाम नकाशा मंजूर करताना केवळ एकच भाडेकरू राहत असल्याचे दाखवत, जुन्या सर्व १३७ रहिवाशी कुटुंबांचा घरे मिळण्याचा हक्क हिरावून घेऊन त्यांना बेघर करणे, विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून व एफएसआयचा चुकीचा वापर करून २००४ साली बांधकाम परवानगी घेण्यात येणे. पार्किंग, मैदान यासारख्या आवश्यक सुविधा देणे अपेक्षित असताना विकासकाने पार्किंगच्या जागी १६ गाळे काढून या गाळ्यांची विक्री करण्यात येणे, विकासकाने किती रहिवाशांना ताबा दिला आहे आणि किती क्षेत्रावर बांधकामे केल्याची पडताळणी न करताच त्याला एफएसआय मंजूर केल्याचा रहिवाशांनी आरोप करणे, या संदर्भात रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी आयुक्त महापालिका व पोलीसांत तक्रार दाखल करणे, तसेच पालिका अधिकारी आणि विकासक यांच्यातील बैठकीचे इतिवृतही बनावट असल्याचे उघड होणे, तत्कालीन आयुक्तांनी तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयात दावा करण्यात येणे, मा. सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधीत दोषींविरूध्द पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात येऊनही बाजारपेठ पोलीसांनी आरोपीस अटक करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू प्रकरण विकासक व दोषी आयुक्तांनी राजकीय बळाचा तसेच बाजारपेठ पोलीसांनी आर्थिक संगनमताने दडपून टाकण्याचा प्रयत्न करण्यात येणे, सदर प्रकरण शासनाच्या निदर्शनास येऊनही अद्याप शासनाने उच्च स्तरावरून कोणाच्याही दबावाला बळी न पडता, बेघर १३७ रहिवाशी कुटुबांना न्याय देण्यासाठी कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, माजी आयुक्त गोविंद राठोड, रामनाथ सोनवणे, एस. एस. भिसे, ई. रविंद्रन, गोविंद बोडके, तत्कालीन नगररचनाकार चंद्रप्रकाश सिंग, रवी राव, मारूती राठोड यांना तात्काळ अटक करणे, सध्या महापालिकेत सेवेत असलेले सुरेंद्र टेंगळे, ज्ञानेश्वर अडके, देविदास जाधव, रघुवीर शेळके, संजय भोळे, सुहास गुप्ते, प्रसाद सखदेव यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी बेघर रहिवाशांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

श्री. अरूण गीध, माजी नगरसेवक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात अनियमितता केल्याबाबत तक्रार केली. सदर तक्रारीवर बाजारपेठ पोलीस स्टेशनमार्फत कार्यवाही न झाल्याने श्री. गीध यांनी मा. सत्र न्यायालय, कल्याण येथे दावा क्र. ३२७/२०२१ दाखल केला. दि.१८.०१.२०२२ रोजी मा. सत्र न्यायालयाने सदर दाव्याचे अनुषंगाने बाजारपेठ पोलीस स्टेशन यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १५६(३) अन्वये चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

R.TA/H-1168 (750-3-2022)

त्यासअनुसरून बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ४२०, ४१८, ४१५, ४६७, ४४८, १२०ब, ३४ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ९ आणि १३ नुसार महापालिका अधिकारी/कर्मचारी, विकासक व वास्तूविशारद अशा एकूण १८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल केलेल्या सर्वांनी मा. जिल्हा सत्र न्यायालयाकडे क्रिमीनल रिव्हीजन ॲप्लीकेशन क्र. ९/२०२२, १०/२०२२ व १३/२०२२ अन्वये अपील दाखल केले. सदर रिव्हीजन अर्जाचे अनुषंगाने मा. जिल्हा सत्र न्यायालयाने सदर प्रकरणाच्या चौकशीस दि.०१.०४.२०२२ पर्यंत स्थगिती दिलेली आहे.

मौजे कल्याण येथील सि.स.नं. २२४०, २२४९अ, २२४९/१, ते ११, २२९९, २३००, २३०६ व २३०७ (क्षेत्र ४३३८ चौ.मी) या भुखंडावर पुनर्विकासाच्या अनुषंगाने दि.०८.०४.२००८ अन्वये अंतरिम बांधकाम परवानगी, दि.२५.०२.२०१३ अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र तसेच दि.०६.०१.२०२२ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आलेली आहे. पुनर्विकासामध्ये भाडेकरूंसाठी बांधण्यात येणाऱ्या तळ मजला + ११ या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर इमारतीस पूर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला आहे. तर दुसऱ्या तळ मजला + २२ या इमारतीला भाग बांधकाम पूर्णत्वाचे दाखले देण्यात आलेले आहे.

सदर कॉलनीत १३७ मूळ भाडेकरू रहात होते. महानगरपालिकेने सदर कॉलनीच्या पुनर्विकासाची परवानगी देण्यापुर्वी ७०% भाडेकरूंचे संमतीपत्र घेतले आहेत. तद्नंतर बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले. आजमितीस १३७ रहिवास कुटुबांपैकी ३० भाडेकरूंचे पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित भाडेकरूंना सदनिकांचा ताबा घेण्यासाठी नोंदणीकृत करारनामा करण्यासाठी आवाहन केले होते. तथापि त्यांनी अद्याप प्रतिसाद दिलेला नाही.

सदर बांधकाम परवानगीमध्ये माणिक कॉलनी या रहिवाशी संकुलाला महापालिकेच्या तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादेमध्ये बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बांधकाम परवागनीमध्ये चार पोडीयम मजले पार्किंग बांधण्यात आली असून नियमानुसार पार्किंग प्रस्तावित करण्यात आलेली आहे, तसेच सदर बांधकाम परवानगीमध्ये आवश्यक ६१९.८३ चौ.मी. क्षेत्र मनोरंजन मैदानाकरीता राखीव ठेवण्यात आलेली आहे.

सदर भुखंडावरील पुर्वीच्या भाडेकरूंच्या पुनर्वसनाकरीता तत्कालीन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी विकासक व भाडेकरू यांचेसमवेत दि.१३.११.२०१० व दि.०१.११.२०१२ रोजी बैठक घेऊन त्यानुसार इतिवृत्त निर्गमित केलेले आहे. पुर्वीच्या भाडेकरूंनी चटईक्षेत्र निर्देशांक, विकास नियंत्रण नियमावली व अंतरिम बांधकाम परवानगीच्या मुद्यांबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४५८८/२०१६ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाच्या दि.२०.०७.२०१६ च्या आदेशानुसार तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी विकासक व भाडेकरू यांची सुनावणी घेऊन Speaking Order निर्गमित केलेली आहे. त्यामुळे बनावट इतिवृत्त असणे तसेच आयुक्तांनी तक्रारीकडे दुर्लक्ष करणे, अशी वस्तुस्थिती नाही.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मध्ये वर्तक चौक ते माणिकपूर नाका दरम्यान डिव्हायडर आणि रस्ता सुस्थितीत असतानाही पालिका प्रशासनाने कागदोपत्री खराब दाखवून या कामासाठी दोन कोटी रुपयांचे कंत्राट मंजूर केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताचा उघडकीस येणे, सदरहू अर्धा कि.मी.रस्ता चांगला असणे, तसेच डिव्हायडर देखील मजबुत असणे, याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करुन पालिका प्रशासनाने त्याच कामासाठी २ कोटी १ लाख ५२ हजार १६४ रुपयांचे कंत्राट मे. जय भवानी एम्पोप्रोजेक्ट भाईंदर यांना मंजूर करुन देण्यात येणे, सदर ठेका मंजूर निविदेपेक्षा २३.१० टक्के जादा दराने मंजूर करणे, सदरहू कंत्राट महापालिकेचे शहर अभियंता श्री. एम.जी.गिरगावकर यांचे स्वाक्षरीने मंजूर करण्यात येणे, एकंदरीतच या गैरप्रकारामुळे महापालिका प्रशासनाने कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचा प्रकार उघडकीस येणे, एकूणच गरज नसताना काम काढलेल्या या निविदेसह यापूर्वीच्या अनेक कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, कामाचे इस्टिमेट बनविताना, कामाचा कार्याभार आदेश देताना, काम पूर्ण झाल्यावर त्याचे बिल अदा करताना अशा प्रत्येक टप्प्यांवर ठेकेदारांकडून अक्षरश: सावकारी पध्दतीने टक्केवारी घेण्याच्या गैरप्रकारामुळे या भागातील ठेकेदार त्रासले असून, त्यांनी व या भागातील विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात स्थानिक आमदारांकडे, आयुक्तांकडे व नगरविकास मंत्र्यांकडे तसेच लाचलूचपत प्रतिबंधक खात्याकडे केलेल्या तक्रारी, यामुळे महापालिकेच्या निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला व होत असलेला अपव्यय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, संबधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच अंतर्गत वसई रोड रेल्वे स्टेशन परिसरात अण्णासाहेब वर्तक चौक ते माणिकपूर व त्यापूढे वसई शहराकडे जाणारा हा मुख्य रस्ता असून शहर विकास योजनेनुसार ४० मी. रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्ता हा महानगरपालिका स्थापना पूर्वीच्या नगर परिषद काळातील खडी व डांबरीकरणाद्वारे विकसित करण्यात आला होता. उपरोक्त प्रमुख रस्त्याची खड्डे पडल्याने दुरावस्था झाल्यामुळे रस्त्याची दुरुस्ती व उंच डिव्हायडर नव्याने बसविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनीधी व नागरीकांची वारंवार मागणी होत असल्याची बाब महानगरपालिकेनी कळविली आहे.

सदर रस्त्याच्या काही भागात पाणीपुरवठा जलवाहिनी अंथरण्याचे काम सन २०१९-२० मध्ये करण्यात आले होते. त्यामुळे रस्त्याची साईडपट्टी व डांबरी रस्त्याचा काही भाग पूर्णपणे नादुरुस्त झाला होता. सदर रस्त्याची दुरुस्ती हाती घेणे आवश्यक होते. तसेच शहराच्या पोलीस

विभागामार्फत सदर रस्त्यांवर डिव्हायडर बसविणे, लेनमार्क, झेब्राक्रॉसिंग चिन्हांकित करणे इत्यादी सूचना महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या.

सदर रस्त्याची वस्तुस्थिती व वाहतूक पोलीस शाखेच्या सूचना विचारात घेऊन सदर रस्त्याच्या नुतनीकरणाचे रु. २.०१ कोटी किमतीच्या अंदाज पत्रकास वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या दिनांक ११.०९.२०१९ रोजीच्या ठरावान्वये मंजूरी प्रदान केली. उपरोक्त मंजूरीस अनुसरुन महानगरपालिकेमार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर प्रक्रियेअंतर्गत प्राप्त निविदांपैकी मे. जय भवानी इन्फ्रा प्रोजेक्ट्स या कंत्राटदाराची अंदाजपत्रकीय दराच्या सुमारे २३.१० % जादा दराची निविदा महानगरपालिकेस प्राप्त झाली असून सन २०१९-२० च्या एस.एस.आर. मधील दराशी तुलना करुन सदर निविदेस (अंदाजपत्रकीय दराच्या २३% ज्यादा व प्रचलित दरसूचीच्या २.७२% ज्यादा) प्रशासकीय ठराव दिनांक ०१.०३.२०२१ अन्वये मंजूरी प्रदान केल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. तथापि, सदर कामांतर्गत कंत्राटदारास रु. २.४८ कोटी इतक्या रकमेचे कामाचे कार्यादेश दिनांक ०४.०२.२०२२ रोजी शहर अभियंता, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या स्तरावरुन निर्गमित केले आहेत. श्री. एम.जी. गिरगावकर, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची दिनांक २४.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शहर अभियंता (जल) वसई-विरार शहर महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून श्री. गिरगावकर दिनांक २५.०३.२०२१ रोजी महानगरपालिकेत रुजु झाले आहेत.

सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या रस्ता दुरुस्तीच्या कामाच्या कार्यादेशात सदर काम पूर्ण करण्याकरीता कंत्राटदारास २७० दिवसांची मुदत देण्यात आली असून निविदेतील अटीनुसार कंत्राटदाराने प्रत्येक महिन्याला मागील काळात झालेल्या कामाचे देयक सादर केल्यावर त्यानूसार तपासणी करुन देयकाचे प्रदान करण्याची बाब नमूद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत दिनांक १४.०३.२०२२ पासून कंत्राटदाराने डिव्हायडर बसविण्याचे काम सुरु केले आहे. सदर रस्ता दुरुस्तीच्या कामाच्या अनुषंगाने प्रचलित कार्यपध्दतीनुसार मंजूरी प्रदान केली असून सदर कामात कोणतीही अनियमितता निदर्शनास आली नसल्याची बाब आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविली आहे. तथापि, सदर विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

दरम्यान मार्च, २०२० पासून उद्भवलेल्या कोविड-१९ महामारी व त्याकाळात अनुषंगीक लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने कोविड अनुषंगीक कामांना प्राधान्य दिल्याची बाब नमूद करुन या काळात पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे, अतितातडीची व अत्यावश्यक कामे यांना प्राधान्यक्रम दिल्याची बाब महानगरपालिकेने नमूद केली आहे. तथापि, माहे जानेवारी, २०२२ पासून महानगरपालिकेचे कराचे उत्पन्न व आर्थिक क्षमता विचारात घेऊन मागील काळात स्थगित करण्यात आलेली विकास कामे पुनःश्च हाती घेण्यात आली आहेत. सदर विकासकामे करताना विहित सर्व तांत्रिक व वित्तीय नियमांचे पालन करण्यात येत असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेत सुरु असलेल्या विकास कामांच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारीस अनुसरुन वेळोवेळी आवश्यक ती नियमोचित कार्यवाही महानगरपालिका स्तरावर होत असल्याची बाब आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविली आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ६०९०

मा.श्री.राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.६०९० पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीतील आनंदवली शिवारातील, नवशा गणपती येथे सर्व्हे नं.६५ या भूखंडावर खाजगी बांधकाम व्यावसायीकाकडून मोठ्या प्रमाणावर नदी किनारी अनधिकृत बांधकाम सुरु असून यामुळे गोदावरी नदीचे पात्र अरुंद करण्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, सन २००८ मध्ये गोदावरी व उपनद्यांना पूर आल्यानंतर पाटबंधारे विभागामार्फत निळी व लाल पूररेषा आखण्यात आली असल्यामुळे नदीकिनारी शेकडो मिळकती बाधित झाल्याने तेथील नागरीक या आपत्तीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत असताना महापालिकेच्या नगररचना विभागाकडून मात्र सर्रास गोदावरी किनारी पूररेषेत अनधिकृतपणे व आर्थिक संगनमत करुन विकासकांना बांधकाम परवाने देण्याचा प्रकार सुरु असणे, यामुळे मनपा व पाटबंधारे खात्याने पूररेषा आखून दिलेली असताना नदी किनारी किती बांधकामांना, कोणत्या आधारे परवानग्या देण्यात आलेल्या आहेत याची सविस्तर चौकशी होणे अत्यंत आवश्यक असणे, मोठया प्रमाणावर लाच घेऊन बिल्डिंग प्लॅन आणि पीटीसीट मंजूर केलेल्या नाशिक महानगरपालिकेचे अधिकारी राजेंद्र आहेर, संजय अग्रवाल, सी.बी.आहेर व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यास जबाबदार धरुन त्यासह दोषी विकासकाविरुद्ध तात्काळ चौकशी करुन कारवाई करण्याची तसेच सदरहू अनधिकृत बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे, खुद्द महापौर सतिश कुलकर्णी यांच्या पाहणीत देखील सकृतदर्शनी अनधिकृत बांधकाम आढळले होते, मात्र संजय अग्रवाल यांच्यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांना थेट गुणनियंत्रण विभागासारखा महत्वाकाचा विभाग देण्यात येणे, विशेष म्हणजे अग्रवाल यांना काही काळासाठी अन्य विभागात पदोन्नती देऊन ३१ जानेवारी नंतर नगररचना विभागात कार्यकारी अभियंता म्हणून आणण्यासाठी आर्थिक संगनमत करुन प्रयत्न करण्यात येणे, नगरविकास विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करणे, सदरहू चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांना निलंबीत करणे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महापालिकेच्या लोकप्रतिनिधींनी शासन तथा महापालिकेस देण्यात येणे, तसेच नाशिक शहरातील पूर रेषेतील बांधकामाचा गेले अनेक वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच वरील अधिकाऱ्यांच्याबाबतीत आर्थिक संगनमताशिवाय कोणतेही काम न करण्याच्या विकासकांच्या असलेल्या तक्रारी, याकडे झालेले व होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

-:मा. मंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेने मौजा आनंदवल्ली सर्व्हे नंबर ६५/१/१अ मधील इमारत बांधकामाबाबत सॉफटवेअरव्दारा ऑनलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी जा.क्रं.एलएनडी/बी.पी./आनंदवल्ली/ डीसीआर/ १४२३/२०१९, दिनांक २७/०७/२०१९ अन्वये तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांच्या मोजणी नकाशानुसार, पाटबंधारे विभागाने निश्चित केलेल्या पुररेषेच्या अधिन राहून व समतल दर्शक नकाशानुसार (पी.टी.शीट) दिली आहे.

नाशिक शहरासाठी मंजूर सुधारित विकास योजनेनुसार मौजे आनंदवल्ली सर्व्हे नंबर ६५ मधील गोदावरी नदीच्या उजव्या तीरावरील नदीकिनारी गोदापार्कसाठी क्षेत्र आरक्षित आहे. नाशिक महानगरपालिकेने उक्त जागेपैकी सदर गोदापार्कसाठी आरक्षित सुमारे १४०० चौरस मीटर क्षेत्र संपादित केले आहे. सदर आरक्षित क्षेत्र सोडूनच नाशिक महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिलेली आहे.

श्री. अशोक फकिरराव सोपे व इतर यांचे ज.मु. शिंदे ॲण्ड शिंदे बिल्डर्स यांना नाशिक महानगरपालिकेने जा.क्र.नरवि/वशि/अ-१/२३०/२०२० दिनांक १९/०६/२०२० रोजी संरक्षक भिंतीचे खोदकाम बंद करणेबाबत त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६४,२६५,२६६, व ४७८ चे

तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराप्रमाणे नोटीस देण्यात आलेली होती. सदर नोटीसीस जागामालक यांचेमार्फत ॲडव्होकेट श्री.नंदकिशोर लाहोटी यांनी दिनांक २४/०६/२०२० रोजी नाशिक महानगरपालिकेस उत्तर दिलेले आहे.

तदनंतर स्थानिक प्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने जागामालक श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर ज.मु.धारक विकसनकर्ता श्री.शिंदे ॲण्ड शिंदे, व्दारा आर्किटेक्ट श्री. संजय रमेश नाईक यांना प्रथम नोटीस जा.क्र.ननिवि/वशि/अे१/ २६/२०२१, दिनांक २३/१२/२०२१ रोजी व अंतिम नोटीस जा.क्र. ननिवि/वशि/८४/२०२२ दिनांक १२/०१/२०२२ अन्वये देण्यात आली आहे. सदर प्रकरणी श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५९९/२०२२ दाखल केली. सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी "वादी यांना सुनावणी दिल्याशिवाय बांधकामाबाबत कोणतीही कठोर कारवाई करण्यात येऊ नये", असे आदेश दि.१९/०१/२०२२ रोजी पारित करुन उक्त रिट याचिका निकाली काढली आहे.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशाच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने जागामालक श्री.अशोक फकिरराव सोपे व इतर यांना दिनांक ०८/०२/२०२२ रोजी सुनावणी दिलेली आहे व सुनावणी संबंधीचे आदेश कार्यकारी अभियंता, नगर नियोजन विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दिनांक ११/०२/२०२२ रोजी पारित केले आहेत. सदर दि.११/०२/२०२२ रोजीच्या आदेशात " गोदापार्कसाठी आरक्षित व संपादित सुमारे १४०० चौरस मीटर क्षेत्राच्या हद्दी निश्चित करुन तसेच सदरचे क्षेत्र समतल करुन नाशिक महानगरपालिकेकडे नियमानुसार हस्तांतरीत करावे व विनापरवाना बांधलेल्या संरक्षक भिंतीची व जागेतून जाणा-या नाल्यासंबंधीची रितसर परवानगी संबंधित विभागाकडून घ्यावी व परवानगची प्रत नाशिक महानगरपालिकेकडे देण्यात यावी व नाशिक महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीनुसार जागेवर बांधकाम करावे " असे नमुद केले आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या महासभेत वरील विषयी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने नाशिक शहराचे मा. महापौर श्री. सतिश (नाना कुलकर्णी) व इतर मान्यवर सदस्य यांनी महानगरपालिका अधिकारी यांचेसमवेत गोदावरी नदीत बोटीतून प्रत्यक्ष पहाणी करुन शहानिशा करण्यात आली होती. त्यामध्ये संबंधित बांधकाम परवानगी ही महानगरपालिकेचे गोदापार्कचे क्षेत्र सोडून देण्यात आली असून सदरची बांधकाम परवानगी ही तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या मोजणीनुसार पाटबंधारे विभागाने निश्चित केलेली पूररेषा तसेच समतलदर्शक नकाशानुसार (PT Sheet) यास अधिन राहूनच देण्यात आलेली असून ती योग्य असल्याचे मा.महापौर दौ-यात निदर्शनास आले असल्याने यास मंजुरी देणेत येत आहे, असा ठराव क्रमांक १४६९ दिनांक १०/०३/२०२२ नाशिक महानगरपालिकेच्या महासभेत सर्वानुमते मंजुर करण्यात आलेला आहे.

श्री. संजय लालचंद अग्रवाल यांनी पदोन्नतीच्या पदाची शैक्षणिक अर्हता व सेवाजेष्ठता धारण केलेली असल्याने त्यांना नियमानुसार पदोन्नती देणेबाबत पारित मा. महासभा ठराव क्रमांक ११५० दिनांक १२/११/२०२१ नुसार नाशिक महानगरपालिका यांचेकडील जा.क्र. आस्था/वशि/२६१६/२०२१, दि.२६/११/२०२१ अन्वये श्री. संजय लालचंद अग्रवाल यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर नियमानुसार पदोन्नती देणेत आलेली असून नाशिक महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.आस्था/वशि/ १६५/२०२२, दि.१७/०१/२०२२ अन्वये गुणनियंत्रण विभागात पदोन्नतीने पदस्थापना देणेत आलेली होती. तद्नंतर श्री. संजय लालचंद अग्रवाल, यांची नाशिक महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.आस्था/वशि/ कार्या-१२/२७४/२०२२, दि.११/०२/२०२२ अन्वये प्रशासकीय कारणास्तव नगर नियोजन विभागात बदली करणेत आलेली आहे.

नाशिक शहरासाठी सुधारीत विकास योजना दि.०९/०१/२०१७ रोजी मंजूर झाली असून सदर विकास योजनेमध्ये पाटबंधारे विभागाकडून प्राप्त माहितीच्या आधारे पुररेषा दर्शविण्यात आलेली आहे. शासनाने दि.०२/१२/२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर केलेली व दि.०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नाशिक महानगरपालिकेसाठी देखील लागू आहे. सदर नियमावलीमध्ये पुररेषेच्या अनुषंगाने विनियम क्रमांक ३.१.३ अन्वये सविस्तर तरतुदी अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.

.....

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.४१६

मा.श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४१६ पुढीलप्रमाणे आहे :-

" पालघर जिल्ह्यात जिल्हा मुख्य कार्यालय उभारण्याच्या बदल्यात दुग्धविकास विभागाने सिडकोला दिलेल्या सुमारे ४०० एकर जागेतील गवताची तस्करी व विक्री करुन लाखो रुपयाचा चारा घोटाळा केल्याचे दि.५.२.२०२२ रोजी निदर्शनास येणे, सिडकोच्या काही अधिकाऱ्यांनी स्थानिक ठेकेदाराबरोबर आर्थिक संगनमत करुन केळवे रोड, टोकराळे, रामबाग, डोंगरपाडा आदि भागातील ४०० एकर जमिनीत उगवणाऱ्या गवताची निविदा प्रक्रिया प्रसिद्ध करण्यापूर्वी ४५० मजूर लावून गवताची कापणी करण्यात येणे, गवत वाहतुकीच्या दिवस-रात्र गाड्या चालूनही २० कि.मी. अंतरावर असलेल्या सिडकोच्या कार्यालयाच्या एकाही अधिकारी कर्मचाऱ्याला त्याची भणक सुद्धा न लागल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येणे, यासंदर्भात सिडकोने सापळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात येऊनही अद्याप सदर प्रकरणी पोलीसांनी दखल घेऊन संबंधित दोषीविरुद्ध अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, संबंधित सिडको अधिकारी आणि ठेकेदार दरवर्षी २० ते २५ लाख रुपयाचे गवत एकतृतीयांश किंमतीमध्ये विक्री करुन सिडकोचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान अद्यापपर्यंत करण्यात येत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

पालघर जिल्हा मुख्यालय व पालघर नवनगर विकसित करण्यासाठी सिडकोस " पालघर नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून दि.१.१०.२०१६ रोजी घोषित करण्यात आले आहे. कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पालघर तालुक्यातील मौजे पालघर, कोळेगाव, मोरेकुरण, नंडारे, दापोली, टेंभाडे व शिरगाव या ७ गावांतील एकुण ४४०-५७.९० हे.आर. जमीन महसुल व वन विभागाच्या दि.२९.०६.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सिडकोस हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पालघर तालुक्यातील मौजे- केळवे रोड येथील १०१.११ हे.आर. शासकीय जमीन महसुल व वन विभागाच्या दि.११.९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सिडकोस हस्तांतरित करण्यात आली आहे. तथापि, मौजे- टोकराळे, रामबाग, डोंगरपाडा येथील जमीन सिडको हद्दीत येत नसुन सदर जमीन दुग्धविकास विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मालकीची आहे.

मौजे-पालघर व इतर ६ गावांतील गवत विक्री संदर्भात सन २०१८-१९ व २०१९-२० मध्ये गवत कापणीसाठी निविदा काढून गवत विक्री करण्यात आले आहे. त्यामधून अनुक्रमे रु.७.२० लाख व रु.७.८५ लाख सिडकोस प्राप्त झाले आहेत. तद्नंतर सन २०२०-२१ मध्ये स्थानिक वृत्तपत्रात निविदा मागविण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु सदर जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्यामुळे निविदेची प्रक्रिया पूर्ण झाली नाही. त्यामुळे गवत विक्रीचे काम होऊ शकले नाही.

मौजे-केळवे-रोड येथील जमीन दि.११.९.२०१९ रोजी सिडकोस हस्तांतरित झाल्यानंतर जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून दि.०५.१२.२०१९ रोजी ७/१२ सदरी सिडकोच्या नावे जमीन प्राप्त झाली. सदर जमिनीचा साधारणत: फ़ेब्रुवारी -२०२० च्या दरम्यान सिडकोस ताबा मिळाला. तथापि, कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सन २०२०-२१ मध्ये केळवे येथील जमिनीवरील गवत विक्री लिलावाच्या निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

सन २०२१-२२ या हंगामाकरिता गवत विक्रीची निविदा पालघर व केळवे रोड याकरिता स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.३.३.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरातीस प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा दि.१४.०३.२०२२ रोजी उक्त जमिनीवरील गवत विक्रीचा ठेका ३ हंगामी वर्षाकरिता अनुक्रमे सन २०२१-२२ , २०२२-२३ व २०२३-२४ करिता प्रसिद्ध करणात आल्या आहेत.

सिडकोकडे जमीन हस्तांतरण होण्यापुर्वी दुग्धविकास विकास विभाग, व्यवस्थापक पशु पैदास व संगोपन केंद्र, पालघर यांचेकडुन गवत विक्री ठेका हातची किंमत राखुन प्रत्येकी दरसालासाठी दोन लिफाफा पद्धतीने संपुर्ण निविदा ऑनलाईन (ई-टेंडरिंग) पद्धतीने निविदा पद्धतीने करण्यात येत होती. त्यानुसार गवत विक्रीतुन सन २०१४-१५, २०१५-१६ व सन २०१६-१७ या दरम्यान दुग्धविकास विभागास अनुक्रमे रु.७.५० लाख, ७.५९ लाख व ८.२८ लाख एवढी रक्कम प्राप्त झालेली आहे. त्यामुळे गवत कापणीच्या ठेक्यामध्ये सिडकोचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

दरम्यान, सन २०२१-२२ च्या हंगामातील केळवे येथील काही जमिनीवरील गवत अज्ञातांनी कापून नेल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये निर्दशनास आले आहे. केळवेरोड येथील सिडकोच्या मालकी हक्कातील जमिनीवरील गवत अनधिकृतपणे अज्ञातांनी कापणी केल्याबाबत सफाळे पोलीस ठाणे, ता.जि. पालघर येथे गुन्हा र. नं. १९/२०२२ भा.दं.वि.स.च्या कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यासंदर्भात पुढील तपास सुरु आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. प्रताप सरनाईक, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-

"मिरा-भाईंदर क्षेत्रांमध्ये कचरा व साफसफाईचा ठेका ठेकेदाराला देण्यासंदर्भात निविदा प्रक्रिया दर तीन वर्षांनी राबवण्यात येणे, शासनाकडे लोकप्रतिनिधींनी वारंवार केलेल्या तक्रारीनंतर निविदा प्रक्रिया न राबविता त्याच ठेकेदाराला सन २०१७ पासून सातत्याने राज्य शासनाची कुठलीही परवानगी न घेता गेली पाच वर्षे मुदतवाढ देणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना कचरा व साफसफाईसाठी वार्षिक निविदा काढण्याची ३ वर्षांचे निविदा प्रक्रिया राबविली जात का नाही असा प्रश्न जनतेकडून विचारला जाणे, या वर्षी कचरा व साफसफाईच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया राबवित असताना कोविडमुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली असताना देखील काही मोजक्या ठेकेदारांना फायदा होईल या दृष्टीने महानगरपालिकेने तब्बल ८०० कोटी रूपयांची निविदा प्रक्रिया राबविली असणे, ही निविदा प्रक्रिया राबवित असताना अर्थसंकल्पामध्ये कुठल्याही प्रकारची तरतूद नसताना तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कुठल्याही योजनेमध्ये ८०० कोटी रूपयांचे अनुदान अथवा कर्ज नसताना ही निविदा प्रक्रिया बेकायदेशीरपणे राबविली असल्याचे मत महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे असणे, महानगरपालिकेने निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षाला आर्थिक फायदा होण्यासाठी निविदा प्रक्रियाचा घाट घातलेला असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या कर रुपाने येणाऱ्या पैशाचा दुरूपयोग होत असल्याचे मत नागरिकांमध्ये बनलेले असणे, चौकशी करून योग्य ती कारवाई करणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती निहाय वॉर्ड साफसफाई करणे व घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट यांना सन २०१२ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून पाच वर्षासाठी ठेका देण्यात आला होता. सदर कामाची मुदत सन २०१७ मध्ये पूर्ण झाली. तद्नंतर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती निहाय दैनंदिन वॉर्ड साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामी महासभा ठराव क्र. ५४, दि.०८.१२.२०१७ अन्वये महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन कामी कंत्राटी मजूर व वाहनांची संख्या निश्चित करून निविदा मागविण्याचा ठराव केला. त्यासअनुसरून दि.१८.०४.२०१८ व दि.१९.०७.२०१८ रोजी निविदा मागविण्यात आल्या. तथापि दरम्यानच्या काळात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) दि.३०.०१.२०१९ रोजी मान्यता देण्यात आली. DPR नुसार वाहने खरेदी करणार असल्याने दि.१८.०३.२०१९ रोजी सदरची निविदा रद्द करण्यात आली.

महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन ही अत्यावश्यक बाब असल्याने सदर कामी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत पुर्वीचे ठेकेदार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट यांना महासभेच्या मंजूरीने मुदतवाढ देण्यात आली आहे.

दरम्यान २०१७ ते २०२२ या ५ वर्षातील शहरातील लोकसंख्या वाढ तसेच शहरात नव्याने होणाऱ्या इमारती, रस्ते, गटारे, व्यावसायिक आस्थापना या बाबी विचारात घेऊन साफसफाईकरीता लागणारे सफाई कर्मचारी आणि कचरा संकलन व वाहतुकीसाठी आवश्यक वाहनांची संख्या गृहीत धरून घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व स्वच्छ भारत अभियानाच्य मार्गदर्शक तत्वानुसार मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली समितीने निर्णय घेण्याचा ठराव दि.१९.०५.२०२१ रोजी मंजूर झाला.

त्यासअनुसरून दैनंदिन रस्ते सफाई, गटारे सफाई कामी कंत्राटी कामगार व महानगरपालिकेच्या वाहनामार्फत (वाहने देखभाल दुरूस्ती, इंधन, निगा, वाहनचालक व कामगारासह) कचरा संकलन करून वाहतुक करणे कामी ०५ वर्षे कालावधी करीता निविदा मागविणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर कामाची ई-निविदा दि.२१.०१.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि.१४.०३.२०२२ पर्यंत आहे. सद्यस्थितीत राबविण्यात येत असलेल्या निविदेसाठी अटीशर्ती या महानगरपालिकेच्या कामाच्या आवश्यकतेनुसार व CVC मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करण्यात आल्या आहेत. सदर कामी निविदेसाठी पहिल्या वर्षाकरीता १५५ कोटी इतके अंदाजपत्रक तयार केलेले असून दरवर्षी आवश्यक ती तरतूद अर्थसंकल्पात केली जाईल.

सद्यस्थितीत सदर कामी निविदा प्रक्रिया सुरू असून नियमानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करून नव्याने ठेकेदाराची नेमणूक करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. प्रताप सरनाईक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही वर्षापूर्वी जुन्या व नवीन ठाण्याचे प्रतिबिंब दाखवण्यासाठी घोडबंदर रोड वरील मानपाडा येथे "जुने ठाणे व नवीन ठाणे" हा प्रकल्प उभारण्यात येणे, लोकमान्य नगर येथील रुणवाल प्लाझा मागील बाजूस चित्रपटसृष्टीला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बॉलीवुड फिल्म ची थीम पार्कची निर्मिती करण्यात येणे, परंतु ठेकेदार व महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे या दोन्ही थीम पार्कची दुर्दशा झालेली असणे, या दोन्ही थीम पार्कमध्ये करण्यात आलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असणे, ठेकेदाराने निविदेतील अटी व शर्तीनुसार या पध्दतीचे व ज्या किमतीचे काम करणे अपेक्षित होते त्यापेक्षा कमी दर्जाचे सुमार काम केलेले असणे, असे असुनसुध्दा काही अधिकाऱ्यांच्या शिफारशीमुळे जुने ठाणे नवीन ठाणे या थीम पार्कमध्ये अंदाजे १६ कोटी रुपये व बॉलिवूड या थीमपार्क मध्ये अंदाजे १३ कोटी रुपयांची बिले ठेकेदाराला अदा केल्याचे बाब उघडकीस येणे, याबाबत सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी वेळोवळी तक्रारी करुन चौकशीची मागणी केल्यानंतरही अद्यापपर्यंत या प्रकरणी चौकशी अहवाल महानगरपालिकेने जारी केला नसणे. याबाबत शासनाने तातडीने करावायाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अस्तित्वातील उद्याने, बगीचा/पार्क, आरक्षित भुखंड व सुविधा भुखंडावर "थीम पार्क" विकसीत करणेकरीता सन २०१३ मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या महासभेच्या ठराव दिनांक ०३.०९.२०१३ अन्वये मंजूरी देण्यात आली. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे चितळसर-मानपाडा येथील भुखंडावर "जुने ठाणे शहराची प्रतिकृती" या संकल्पनेवर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक २०.०२.२०१४ च्या महासभा ठरावाद्वारे उपरोक्त प्रकल्पाअंतर्गत रुपये १५.९० कोटीच्या अंदाजखर्चास (बी.ओ.टी.पध्दतीच्या निविदा मागवून तसेच आवश्यकता भासल्यास ४०% खर्च वी.जी.एफ. तत्त्वाने निधी उभारुन) मान्यता प्रदान करण्यात आली. तद्नंतर सदर कामे प्रथमत: बी.ओ.टी. तत्त्वावर व पुन:श्च व्ही.जी.एफ. तत्त्वावर निविदा काढण्यात आली. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रुपये १६.३५ कोटी रकमेच्या सुधारीत अंदाज खर्चास दिनांक २०.०५.२०१६ रोजी मंजुरी प्रदान करण्यात आली.

सदरचे काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, या प्रकल्पांतर्गत काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेद्वारे एन.डीस्. आर्ट वर्ल्ड प्रा. लि. या कंत्राटदारास दिनांक २०.१२.२०१६ रोजीच्या आदेशान्वये रुपये १६.३५ कोटी रकमेच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले. सदर कामाची मुदत दोन वर्षे असून दिनांक १२.०३.२०१८ रोजी सदरचे काम पूर्ण करण्यात आले. सदर प्रकल्पाअंतर्गत कंत्राटदारास रुपये १०.८१ कोटीचे देयक अदा

करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराने केलेल्या कामाचे मुल्यमापन कला संचालनालय, मुंबई व त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण संस्थेमार्फत करुन अहवाल ठाणे महानगरपालिका स्तरावर घेऊन त्यानुसार कंत्राटदारास देयके प्रदान करण्यात आल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक ०३.०९.२०१३ रोजीच्या महासभेच्या निर्णयाअंतर्गत ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वर्तक नगर प्रभाग समितीत पद्मश्री आप्पासाहेब पवार उद्यानाचे "बॉलिवूड पार्क" या संकल्पनेनुसार विकसन करण्याकरीता मंजूरी देण्यात आली. तसेच सदर कामांतर्गत दिनांक २०.०२.२०१४ च्या महासभेच्या ठरावाद्वारे रुपये २०.०० कोटी अंदाज खर्चास (बी.ओ.टी. पध्दतीच्या निविदा मागवून तसेच आवश्यकता भासल्यास ४०% खर्च व्ही.जी.एफ. तत्त्वाने निधी उभारुन) मंजूरी प्रदान करण्यात आली. त्यानुसार सदर कामे प्रथमत: बी.ओ.टी. तत्त्वावर व पुन:श्च व्ही.जी.एफ. तत्त्वावर निविदा काढण्यात आली. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. दरम्यान, सदर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रुपये २०.६१ कोटी रकमेच्या सुधारीत अंदाज खर्चास दिनांक २०.०५.२०१६ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली. सदरचे काम महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, उपरोक्त प्रयोजनार्थ निविदा प्रक्रियेद्वारे एन.डीस्. आर्ट वर्ल्ड प्रा. लि. या कंत्राटदारास दिनांक २०.१२.२०१६ रोजीच्या आदेशान्वये रुपये २०.६१ कोटी रकमेच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले. सदर कामाची मुदत दोन वर्षे होती. सदरचे काम अद्यापही अपूर्ण आहे.

ठाणे महानगरपालिका स्तरावरुन दिनांक ०२.०३.२०१९ व दिनांक २६.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये संबंधित कंत्राटदारास सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी बॉलिवूड थीम पार्क विकसित करण्याचे काम जैसे थे अवस्थेत रद्द करुन प्रत्यक्ष जागेवर उभारण्यात आलेले सेट्स व फसाड इतर मोकळ्या जागेत स्थंलांतरीत करणे, कमीत कमी खर्चाचा सुधारीत आराखड्याचे सादरीकरण करणेकरीता सन २०२० मध्ये मान्यता प्रदान करण्यात आली. तथापि, तद्नंतर सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर प्रकल्पाअंतर्गत कंत्राटदारास रुपये ६.८८ कोटीचे देयक अदा करण्यात आले आहे.

"जुने ठाणे-नवीन ठाणे" व "बॉलिवूड थीम पार्क" या प्रकल्प विकसनाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेने दिनांक ०६.१०.२०१८ रोजी चौकशी समिती नियुक्त केली. तथापि, उपरोक्त समितीने "जुने ठाणे-नवीन ठाणे" या प्रकल्पाच्या चौकशी अहवालात दिलेल्या शिफारशीनुसार ठाणे महानगरपालिकेने दिनांक ३१.०८.२०१९ रोजी कार्यवाही करण्यास मान्यता दिली असून त्याअंतर्गत तत्कालीन नगर अभियंता/अतिरिक्त नगर अभियंता यांना नाराजी पत्र देण्यात आले. तसेच कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. "बॉलिवूड थीम पार्क" या प्रकल्पाचा चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही. कोविड-१९ च्या काळात निगा-देखभाल करणे शक्य झाले नाही तसेच मागील तीन पावसाळ्यात भिजल्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत काही स्कल्पचर्स व शिल्प यांची दुरावस्था झाली आहे ही वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सद्यस्थितीत "जुने ठाणे-नवीन ठाणे" या प्रकल्पांतर्गत कामाची निगा व देखभाल ठाणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागमार्फत केली जात असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

एस ००३१-१अ

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. पंकज भोयर, श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"घुग्गुस हे चंद्रपूर जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक शहर असणे, येथील दलित समाजाच्या नागरिकांनी वार्ड क्र. ४ व ५ मध्ये काही विकासकामांचा दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत समावेश करण्याची मागणी करणे, मात्र हेतुपुरस्सर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांनी या मागणीकडे दुर्लक्ष करणे, घुग्गुस मधील सहा पैकी चार वार्डांना योजनेत समाविष्ट करण्यात येणे, परंतु दलितांची संख्या जास्त असून सुद्धा वार्ड क्र. ४ व ५ ला हेतुपुरस्सर वगळण्यात येणे, सन २०१५ व सन २०२० ला आरक्षणाच्या सोडतील दलित मतदारांच्या संख्येच्या आधारावर दोन्ही वार्डात दोन अनुसूचित प्रवर्गाची जागा आरक्षीत असणे, वार्ड क्र. ५ हा वार्ड महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखला जाणे, या परिसराला आंबेडकरनगर असे संबोधले जाणे, या दोन्ही वार्डाचा या योजनेत समावेश न होणे म्हणजे तेथील दलित जनतेवर अन्याय होणे, यासंदर्भात घुग्गुस येथील दलित बांधवांनी उपोषण करणे, मुख्याधिकारी नगर परिषद घुग्गुस यांनी जाणीवपूर्वक या प्रक्रियेत दलित जनतेवर अन्याय केल्याने दलित बांधवांमध्ये तिव्र असंतोष, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्याधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी दलित बांधवांमध्ये असंतोष वाढीस लागणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. एकनाथ शिंदे, मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

घुग्घुस नगरपरिषदेची स्थापना दिनांक ३१/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आली आहे. तेथे अद्याप नगरपरिषदेचे प्रभाग निश्चित करुन त्यांना मंजूरी देण्यात आलेली नाही. सध्या पूर्वीच्या ग्रामपंचायतीचे जे ६ वॉर्ड होते त्यानुसार सोयीसाठी कामाचे नियोजन केले जाते.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत घुग्घूस नगरपरिषदेसाठी एकूण रुपये ३,१०,८८,०५४/- इतका नियतव्यय मंजूर होता. या निधीतून ६ वॉर्डमधील कामे करावयाची होती. नगरपरिषदेने याकरीता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे

सादर केलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून दिनांक १४/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये एकूण रुपये २,९४,९८,७५२/- इतक्या रक्कमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरच्या निधीमधून वॉर्ड क्रमांक १, वॉर्ड क्रमांक २, वॉर्ड क्रमांक ३ व वॉर्ड क्रमांक ६ मध्ये कामे प्रस्तावित आहेत. नगरपरिषदेच्या उर्वरित वॉर्ड क्रमांक ४ व ५ मधील जागा या वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड (WCL) यांच्या मालकीच्या असल्याने त्यात विकास कामे न करण्याचा निर्णय प्रशासक व मुख्याधिकारी, नगरपरिषद घुग्घूस यांनी घेतला. वॉर्ड क्रमांक ४ व ५ मध्ये कामे होण्यासाठी तेथील स्थानिक नागरिकांनी उपोषण व आंदोलन केल्याने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड (WCL) यांनी ना-हरकत पत्र दिल्यास तेथे शासनाच्या निधीतून विकास कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वेस्टर्न कोलफिल्डस लिमिटेड (WCL) ला पत्र पाठवून त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र दिनांक ६ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त करुन घेण्यात आले आहे. वॉर्ड क्रमांक ४ व ५ मधील बांधव विकास कामांपासून वंचित राहू नयेत म्हणून दलितवस्ती सुधार योजनेंतर्गत निधी उपलब्ध नसला तरी अन्य योजनेतून तेथील विकासकामे करण्याचा नगरपरिषदेने दिनांक २४/१/२०२२ रोजी ठराव पारित केला. या २ वॉर्डमधील रुपये १,५५,९५,८१९/- एवढ्या रक्कमेच्या कामांना दिनांक २१/२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार नगरपरिषदेने दिनांक २२/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय मंजूरीस्तव प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे सादर केला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेतून वॉर्ड क्रमांक ४ व ५ येथील रुपये १,०३,२७,०१६/- इतक्या रक्कमेच्या कामांना दिनांक २२/३/२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे शहरातील पाणी पुरवठा यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी महापालिकेने समान पाणी पुरवठा योजना हाती घेतली असणे, सदर २४ तास पाणी पुरवठा योजनेसाठी २ हजार २६३ कोटी रुपयांचे कर्जरोखे पुढील पाच वर्षात उभारण्याचा माहे जून २०१७ मध्ये घेण्यात आलेला निर्णय, मात्र पुणे महापालिकेकडून समान पाणी पुरवठा योजनेचे काम संथ गतीने सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, त्यातच पाणी वाटपात असमानता असणे, टाक्यांचे काम अपूर्ण असणे, पाईपलाईन अद्यापही बऱ्याच भागात न पोहचणे, पाणी पुरवठा योजनेच्या कामात अनेक चुका होत असून, काम चांगल्या पध्दतीने होत नसल्याचे निदर्शनास येणे, विशेषत: गेल्या अनेक महिन्यात प्रकल्पाचे प्रत्यक्षातील काम व निधीचा वापर याबाबत समाधानकारक चित्र नसणे, पुणे शहरातील नागरिक मनपा कर पूर्ण भरत असणे, मात्र काही भागात सदर योजनेचे काम करणे व काही भागात काम न करणे असा दुजाभाव करणे, नागरिकांच्या करातून ही योजना राबविण्यात येत असताना, त्यांना विश्वासात घेण्यात आले नसणे, रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यापूर्वी जलवाहिन्यांची कामे करण्यात आली नसणे, योजनेचा आराखडा करताना सर्वेक्षण केलेले नसणे, आतापर्यंत ३ लाख १८ हजार ५७४ मीटरपैकी १४ हजार ११२ मीटर बसविण्यात आले असणे, जलवाहिन्या टाकण्याचे काम ३१० किलोमीटरपर्यंत (४१ टक्के) पूर्ण असणे, एकूण ८४ साठवण टाक्या बांधण्यात येणार असून, ७२ टाक्यांचे काम सुरु असणे, त्यातील पहिल्य टप्प्यातील २०० कोटी रुपयांचे किंमतीच्या कर्जरोखांचा मुंबईत संपन्न झालेला कार्यक्रम, कर्ज रोख्यांपोटी पुणे महानगरपालिकेला ७.५९ टक्के दराने व्याज अदा करावे लागणार असणे, कर्ज आणि मुद्दलाची रक्कम दहा वर्षात फेडायची असणे, महानगरपालिकेने कर्ज काढून ही योजना राबविण्याचे ठरविण्यात आले असणे, त्यामुळे महानगरपालिकेवर मोठ्या प्रमाणात पडणारा आर्थिक ताण, परिणामी इतर नागरी सुविधांवर होणारा विपरीत परिणाम, नागरिकांवर नागरी सुविधांपासून वंचित राहण्याची ओढवणारी आपत्ती, यावर उपाययोजना म्हणून या योजनेसाठी केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करण्याची नितांत गरज, लवकरात लवकर समान पाणी पुरवठा योजना पूर्ण होऊन पुणेकरांना पाणी पुरवठा सुरळीत होणे, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना"

-: मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन :-

पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील पाणी पुरवठ्यासाठी समान पाणी पुरवठा योजना हा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सदर पाणी पुरवठा योजनेची किंमत रुपये २८१८.४० कोटी इतकी असून सल्लागार फी, भूसंपादन व अपेक्षित भाववाढीसह सदर प्रकल्पास रुपये ३३१२.४५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी पाण्याच्या टाक्या बांधण्याच्या उपांगास केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत रुपये ११७.९७५ कोटी इतके केंद्र व राज्य हिश्याचे अनुदान उपलब्ध झाले आहे. तसेच, मीटर व पाईप लाईनच्या कामासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत रुपये १६५ कोटी अनुदान प्राप्त आहे. तसेच, पुणे महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्रमांक ९९ दिनांक ०८ जून, २०१६ अन्वये रुपये २२६४ कोटी इतका निधी कर्जरोखे अथवा अनुदान स्वरुपात उभारण्यास मान्यता प्राप्त असून उर्वरीत खर्च

महानगरपालिका निधीतून करण्याचे नियोजित आहे. त्यानुसार, आज अखेर रुपये २०० कोटी रकमेचे कर्जरोखे उभारण्यात आलेले आहेत. त्याकरीता, केंद्र शासनाकडून रुपये २६ कोटी इतके प्रोत्साहन अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

सदर प्रकल्प हा सन २०१७ पूर्वीच्या पुणे शहरासाठीच्या हद्दीसाठी आखण्यात आला असून सन २०१७ नंतर टप्प्याटप्प्याने समाविष्ट ३४ गावांसाठी नव्याने प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

समान पाणी पुरवठा योजनेमध्ये ८२ नवीन पाण्याच्या टाक्या बांधणे, १२० किमी पाण्याच्या टाक्यांना पुरवठा करण्याऱ्या ट्रान्समिशन लाईन टाकणे, १५५० किमी वितरण नलिका टाकणे, ५ ठिकाणी पंपींग स्टेशन बांधणे, ३ लाख १७ हजार नळजोड बदलणे व एएमआर पाण्याचे मीटर बसविणे या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. सदर योजनेतील पाण्याच्या टाक्या बांधण्याचे कार्यादेश दिनांक २३ सप्टेबर, २०१६ रोजी देण्यात आले असून आजतायागत ३९ टाक्यांचे काम पूर्ण झाले आहे, ३४ टाक्यांचे काम प्रगतीपथावर आहे व ९ टाक्यांचे काम जागेअभावी अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. सदरचे काम दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते तथापि, जागेच्या उपलब्धतेच्या अडचणी, कोव्हीड प्रादुर्भावातील टाळेबंदीमुळे कामास विलंब झालेला असून ठेकेदारामार्फत झालेल्या दिरंगाईमुळे आतापर्यंत रुपये ६१ लक्ष दंडापोटी रक्कम राखून ठेवण्यात आलेली आहे व सध्या रुपये ३९७७५ प्रतिदिन दंड सुरु असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे. पाण्याच्या टाक्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी १२० कि.मी.ची पाईप लाईन टाकण्यात येणार असून त्यापैकी ५३.१४ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली असून उर्वरित लांबीच्या कामांची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर कामातील ठेकेदारामुळे झालेल्या कामातील विलंबापोटी निविदा अटी व शर्तीनुसार रुपये ७३.२५ लक्ष इतका दंड महानगरपालिकेमार्फत राखून ठेवण्यात आलेला आहे. तसेच, सदर कामातील कार्यादेश दिल्यानंतर कोणतेही नवीन रस्त्याची कामे सुरु करण्यापूर्वी त्याठिकाणी आवश्यकतेनुसार पाण्याच्या लाईन टाकून घेण्यात येऊन त्यानंतरच रस्त्यांची कामे करण्यात येतात त्यामुळे सदर कामामध्ये कोणतेही नवीन रस्ते तोडण्यात आलेले नसून सदर कामे पथ विभागाशी समन्वय ठेवून करण्यात येतात असे महानगरपालिकेने कळविले आहे.

वरील कामाव्यतिरिक्त जलशुद्धीकरण केंद्रनिहाय वितरण नलिका, एएमआर मीटर बसविणे, पंपिंग स्टेशन बांधणे इत्यादी कामासाठी जलशुद्धीकरण केंद्रनिहाय पाच निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. यामध्ये १५५० कि.मी. लांबीच्या वितरण नलिका टाकण्याच्या कामाचा समावेश असून त्यापैकी ६२१ किमी लांबीचे वितरण नलिका टाकण्याची कामे पूर्ण झालेली आहेत. योजनेत ३ लक्ष १७ हजार एएमआर मीटर बसविण्याचे नियोजन असून त्यापैकी ५७ हजार ९४० मीटर बसविण्याची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामांमध्ये देखील

ठेकेदारामार्फत झालेल्या विलंबापोटी निविदा अटी व शर्तीनुसार रुपये ९६.६९ इतका दंड पुणे महानगरपालिकेमार्फत राखून ठेवण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीस पाण्याच्या टाक्या बांधणेच्या कामाची भौतिक प्रगती ६२.५० % इतकी झालेली आहे व इतर निविदांची भौतिक प्रगती ४३.८० % झालेली असून सध्या सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, सदरील कामे सल्लागारांनी केलेल्या डिझाईननुसार सुरु असून यामध्ये कोणत्याही चुका असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच, सदर कामाच्या तांत्रिक सल्लागारामार्फत सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्यात आलेला आहे.

तसेच, सदर प्रकल्पीय कामातील लष्कर जलशुध्दीकरण केंद्राच्या अखत्यारीतील भागांमध्ये वितरण नलिका टाकणे, एएमआर मीटर बसविण्याचे कामातील कंत्राटदाराच्या असमाधानकारक प्रगतीमुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. तथापि, त्यानंतरही कामात सुधारणा न झाल्याने त्यांचे काम काढून घेण्यात आले होते. तद्नंतर, संबंधित कंत्राटदाराने निविदा अटी व शर्तीनुसार लवादाकडे दाद मागितली होती. त्यावर मा. लवादाने ठेकेदाराच्या बाजूने निर्णय दिला असून संबंधित ठेकेदाराने पुन्हा काम सुरु केले आहे. त्यामुळे, लष्कर जलशुध्दीकरण केंद्राच्या अखत्यारीतील भाग प्रामुख्याने हडपसर, वानवडी, खराडी, महम्मंदवाडी, कोरेगाव पार्क या भागातील कामाची प्रगती उर्वरीत शहरातील कामापेक्षा कमी आहे. सदरील बाब सदरील कायदेशीर प्रक्रिया व कोव्हीड प्रादुर्भावामुळे उद्भवली आहे.

तसेच, शहरातील कोणत्याही भागामध्ये नव्याने काम सुरु करण्यापूर्वी त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी, सोसायटी चेअरमन व स्थानिक नागरिकांशी चर्चा करून त्यांना योजना समजावून सांगून नंतरच कामे महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासाठी आजअखेर रुपये २०० कोटी रकमेचे कर्ज रोखे उभारण्यात आलेले असून कोणत्याही पायाभूत सुविधा उभारण्याच्या कामाचे दर हे चलनवाढीमुळे दरवर्षी ५ ते ७ टक्के ने वाढत असतात. याचा विचार करता व नागरिकांना गरजेनुसार उपलब्ध होणाऱ्या सोयी सुविधांचा विचार करता व्याजापोटी येणारा खर्चाची बाब महापालिकेच्या आर्थिक हिताची आहे.

पुणे महानगरपालिकेच्या समान पाणी पुरवठा योजनेतील कामांसाठी अमृत अभियानातून केंद्र व राज्य हिश्यापोटी रुपये ११७.९७५ कोटी, स्मार्ट सिटी अभियानातून रुपये १६५ कोटी व रोखे उभारण्यासाठी प्रोत्साहन म्हणून केंद्र शासनाने दिलेले रुपये २६ कोटी याप्रमाणे रुपये ३०८.९७५ कोटी इतके अर्थसहाय्य महानगरपालिकेस उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच, समान पाणी पुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-

"कल्याण (पूर्व) येथील चेतना शाळा ते नेवाळी नाका मलंग रस्ता हा कल्याण-डोंबिवलीकरांसाठी महत्वाचा असणे, या रस्त्यावर पडलेल्या खड्यांमुळे अपघात होत असल्याच्या आलेल्या असंख्य तक्रारी, त्यामुळे दि.२९ सप्टेंबर २०२१ रोजी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना व कंत्राटदाराला घेऊन लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष दौरा करून आढावा घेतला असता रस्त्याच्या दर्जाबाबत व महानगरपालिकेने कंत्राटदाराला दिलेल्या बिलाबाबत धक्कादायक बाबी उघडकीस येणे, उपरोक्त रस्त्याचे काम महानगरपालिकेकडून मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. मुंबई या कंपनीला ४२ कोटी रूपयांना देण्यात येणे, जी कंपनी मुंबईमध्ये काळ्या यादीत असणे, महापालिकेने सदरहू कंपनीला दि.१३.०४.२०१७ रोजी काम दिले व १२.०९.२०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश देणे, परंतु दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न होणे, त्यानंतर पुन्हा दि.३१.०५.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येणे व मूळ रकमेत जवळपास ४ कोटी रूपये कंत्राटदाराला वाढवून देण्यात येणे, धक्कादायक बाब अशी की रस्त्याचे काम ७५ टक्के झाले नसतानाही महानगरपालिकेने कंत्राटदारास ९५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम दिलेली असणे, अशा या महत्वाच्या रस्त्यामध्ये कंत्राटदार व महापालिकेतील अधिकारी यांनी आर्थिक संगनमत करून केलेला कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार, कल्याण-डोंबिवली मधी गेल्या ८ वर्षात खड्डे भरण्यासाठी ११४ कोटी रूपये खड्डयात घातल्याची होत असलेली चर्चा, इथे तर रस्त्याचा संपूर्ण निधीच हडप केल्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, सदर प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व रस्त्यावर कार्यादेश दिल्यापासून आतापर्यंत निकृष्ट दर्जाच्या कामाला जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करणे, तसेच सदर कंपनीला मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रात जिथे-जिथे कामे दिली असतील त्या कामांची दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत चौकशी करावी व कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकूण्न कल्याण महानगरपालिकेकडून बिलापोटी देण्यात आलेली रक्कम वसूल करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मलंग रस्ता नागरिकांसाठी महत्वाचा आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण शीळ रोड व पत्रीपुलाचे काम सुरू असल्याने जडवाहनांची वाहतुक मोठ्या प्रमाणावर मुख्यत्वे मलंग रोड वरून होत असल्याने पावसाळ्यातील अतिवृष्टीमुळे रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे पडले होते. रस्त्याच्या दुरूस्तीबाबत प्राप्त तक्रारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि.२९.०९.२०२१ च्या दौऱ्यानंतर आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे घेण्यात आलेल्या बैठकीत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी रस्त्यावरील खड्डे भरण्याचे निर्देश दिले. त्यासअनुसरून द्वारली गावातील रस्त्यावरील खड्डे भरण्यात आलेले आहेत.

रस्त्याच्या ४०५०.० मी. लांबी व ३०.०० मी. रूंदी मोजमापासाठी सविस्तर प्राकलनास महासभेची रू.४१७६.०४ लक्ष या रक्कमेस प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असून, त्यानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून सदर कामाच्या जाहिर निविदा मागविण्यात आल्या. त्यात न्युनत्तम ठेकेदार मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. मुंबई यांना कामाचे आदेश देण्यात आले.

सदर निविदा प्रक्रिया सुरू असताना मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. मुंबई यांना बृहन्मुंबई महापालिकेने काळ्या यादीत टाकले आहे, अशी तक्रार प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यापुर्वी बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदर अभिकरणास काळ्या यादीत टाकले नसल्याचे कळविले.

विहीत निविदा प्रक्रिया राबवून न्युनत्तम ठेकेदार मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा. लि. मुंबई यांना दि.१३.०४.२०१७ रोजी कामाचे आदेश देण्यात आले. सदर कामाची मुदत १८ महिने (म्हणजेच दि.१३.०४.२०१७ ते दि.१२.०९.२०१८) अशी होती. सदर कामाची प्राकलन रक्कम रू. ४९.९७ कोटी इतकी होती. निविदा स्विकृती रक्कम रू. ४१.७६ कोटी इतकी आहे. (४.५९ टक्के कमी दराने)

सदर काम सुरू झाल्यानंतर द्वारली व भाल गावातील ग्रामस्थांनी जवळपास १८६ मिटरच्या रस्ता रूंदीकरणाला विरोध केल्याने काम पूर्ण करता येऊ शकले नाही. यासंदर्भात आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या स्तरावर ४ वेळा स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, मा. आमदार व ग्रामस्थ यांच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. नियमानुसार भुसंपादन करून जागेचा मोबदला (TDS/FSI/भुखंड) देण्याचे कबुल केले आहे. परंतु, तरी देखील ग्रामस्थ तयार होत नाहीत. स्थानिक युवकांना महापालिकेत नोकरी मिळणेबाबत आग्रही आहेत. वारंवार कामात अडथळे आणून काम बंद करण्यात आले आहे. दरम्यान ग्रामस्थांचा रस्ता रूंदीकरणाला असलेला विरोध कमी झाल्याने या रस्त्याचे उर्वरित कामे करण्याचा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने निर्णय घेतला व अभिकरणास दि.३१.०५.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

सदर रस्त्याचे काम करताना प्रत्यक्षात कामाच्या ठिकाणी जागेची परिस्थिती बघून प्राकलनामध्ये अंतर्भुत नसलेली कामे करावी लागली. त्यात चेतना शाळेजवळील व ५०-५० रेस्टॉरंट जवळील परिसरात यापुर्वी नाले नसल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पुर परिस्थिती निर्माण होत होती त्यासाठी रस्त्यालगत २७० मी. लांबीचा नाला बांधावा लागला. त्यामुळे सदर प्राकलनातील परिमाणामध्ये जवळपास ४.०० कोटी रककमेने वाढ झाली, ही वस्तुस्थिती आहे. त्यास वेळोवेळी सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर रस्त्याच्या एकूण ४०५०.०० मी. लाबीच्या रस्त्यापैकी ३८६४.०० मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आले असून १८६.०० मी. लांबीचे द्वारली गावातील रस्त्याचे काम स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे प्रलंबित आहे. एकूण कामापैकी पूर्ण झालेल्या ९५ टक्के कामाचे देयक अभिकरणास अदा करण्यात आलेले आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ४२२.०० किमी लांबीच्या रस्त्याची दुरूस्ती करणेकरीता सन २०१३-१४ ते २०२०-२१ या मागील आठ वर्षात सुमारे ११३.९४ कोटी रूपये खर्च झाला, ही वस्तुस्थिती आहे.

सदर रस्त्याच्या कामाकरीता वापरण्यात आलेल्या साहित्यांच्या वारंवार दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून तसेच खाजगी प्रयोगशाळेकडून आवश्यक त्या चाचण्या करून घेण्यात आलेल्या आहेत. याशिवाय त्रयस्थ तांत्रिक परीक्षकाकडून कामाचा दर्जा व गुणवत्तेबाबत परिक्षण करून घेण्यात आले असून, रस्त्याचा संपुर्ण निधी हडप केला, अशी वस्तुस्थिती नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"वसई-विरार महापालिका हद्दीत नालासोपारा, विरार आणि वसईच्या पूर्वेकडील भागात आणि मुंबई अहमदाबाद मार्गावरील गावांमध्ये तसेच संतोष भुवन, बिलालपाडा धानिवबाग, फुलपाडा, श्रीरामनगर, पेल्हार, चंदनसार, वालिव आदी अनेक ठिकाणी भूमाफियांनी व विकासकांनी हजारो इमारती, लाखो चाळींची अनधिकृत बांधकामे केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, भूमाफिया आणि विकासकांनी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आशिष पाटील व त्यांचे सबंधीत विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांचेबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करुन अनधिकृत इमारती व चाळींची बांधकामे करण्यात येणे, यापूर्वी अनधिकृत बांधकाम विभागातील काही कर्मचारी या बाबतीत पैसे घेताना रंगेहाथ पकडले गेल्याची घटना घडणे, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्यास महापालिका संपूर्णत: अपयशी ठरणे, काही वेळेला जास्त दबाव आल्यानंतर पालिकेतर्फे अनधिकृत बांधकाम तोडल्याने अनेक गरीब परिवारांचे संसार उघड्यावर येणे, सदरहू अनधिकृत बांधकामाबाबत स्थानिक नागरिक, सामाजिक संघटना यांनी वसई-विरार महापालिकेत दाखल केलेल्या तक्रारीची पालिका प्रशासनाने कोणतीच दखल घेण्यात न येणे, जास्त दबाव आला तर थातूरमातूर कारवाई केल्याचे दाखविण्यात येणे, अनधिकृत बांधकामा संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांना खोटी माहिती दिल्याने न्यायालयाने महापालिका प्रशासनावर गंभीर ताशेरे ओढून फटकारण्यात येणे व महापालिका बरखास्त करण्याचा दिलेला गंभीर इशारा, त्यानंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरीता ॲक्शन प्लॅन तयार करण्याची घोषणा करण्यात येऊनही अद्याप यावर वसई-विरार महापालिका प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, आत्तापर्यंत महापालिका हद्दीत लाखो अनधिकृत बांधकामे झाली असून परिस्थिती नियंत्रणा बाहेर जाणे, याबाबत मा. उच्च न्यायालयाने कारवाई संदर्भात दिलेले आदेश विचारात घेता शासन तथा वसई-विरार महापालिका प्रशासनाने वेळीच कारवाई न केल्यास पालिकेस अनधिकृत बांधकाम थोपविणे अत्यंत कठीण होणार असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील स्थानिक जनतेत पालिका प्रशासनाबाबत निर्माण झालेली तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या सर्व गोष्टींना जबाबदार असणाऱ्या व अतिक्रमण विभागाची जबाबदारी असलेल्या अतिरिक्त आयुक्तांना तात्काळ निलंबित करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करुन त्यांच्या हाताखाली अधिकाऱ्यांची मंत्रालयातील सचिव अथवा सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये करण्यात आली आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विस्तीर्ण परिक्षेत्रात महसूल व वन विभागाच्या गायरान,

नवीन शर्तीच्या जमीनी व वन जमिनी मोठ्या प्रमाणावर आहेत. वसई-विरार क्षेत्रात काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर क्षेत्रातील बहुतांश अनधिकृत बांधकामे ही तत्कालीन ग्रामपंचायत/ नगरपरिषद व सिडको विशेष नियोजन प्राधिकरण असल्यापासून अस्तित्वात आहेत. तसेच काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे ही महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर झाली असून वाढते औद्योगिकरण, मुंबई लगतचा भूप्रदेश, मुंबई- अहमदाबाद द्रुतगती महामार्गाशी जवळीक इत्यादी कारणांमुळे प्रभाग समिती सी,एफ,जी अंतर्गत नालासोपारा, विरार, वसईच्या पूर्वेकडील भागात तसेच संतोष भूवन, बिलालपाडा, घानिवबाग, श्रीराम नगर इ.भागात काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत अशी वस्तुस्थिती वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. आशिष पाटील, विक्रीकर विभाग, महाराष्ट्र शासन यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती दिनांक ११.०९.२०२० पासून अतिरिक्त आयुक्त पदी करण्यात आली असून त्यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त, अतिक्रमण या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. श्री. आशिष पाटील, अतिरिक्त आयुक्त यांच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली A to I (एकूण ९ प्रभाग समिती) या प्रभाग समिती अंतर्गत अनधिकृत बांधकामाच्या निष्कासन विषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त हे या परिक्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनाबाबत पदनिर्देशित अधिकारी आहेत. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त, अतिक्रमण यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली उपायुक्त, अनधिकृत बांधकाम तसेच संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत अनधिकृत बांधकाम निष्कासन / अतिक्रमण हटविण्याचे कर्तव्य पार पाडले जाते.

तसेच अतिरिक्त आयुक्त, अतिक्रमण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती सी, एफ, जी मधील अनधिकृत बांधकामांवरील कार्यवाही अंतर्गत माहे फेब्रुवारी, २०२२ अखेर पर्यंत ११,५८३ इतकी अतिक्रमणे निष्कासित करुन महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमान्वये ५२८ गुन्हे व १२७ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर कार्यवाही अंतर्गत एकूण ५,३८,००७ चौ. फुट क्षेत्रफळ निष्कासित करण्यात आले असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण प्रकरणी शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनाचे काटेकोरपणे पालन केले जात असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच अनधिकृत बांधकाम प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय/मा. उच्च न्यायालय येथे दाखल विविध याचिकां अंतर्गत मा. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येते. तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. दरम्यान मागील काळात प्रभाग समिती एफ अंतर्गत अनधिकृत विभागातील ठेक्यावरील कनिष्ठ अभियंता यांच्याविरुध्द झालेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यवाहीनंतर महानगरपालिकेच्या स्तरावरुन सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ७/२०२० मध्ये महानगरपालिकेमार्फत दाखल फेर प्रतिज्ञापत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या अनधिकृत बांधकामाची संख्या, परवानगीशिवाय करण्यात आलेल्या बांधकामाची

संख्या, स्थगिती असलेल्या दाव्यांची संख्याबाबत संख्यात्मक गोषवारा सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यान महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणण्याकरीता विशेष ॲक्शन प्लॅन तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने हाती घेतली आहे.

शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासीत करण्याकरीता वेळोवेळी महसूल विभागासोबत संयुक्त विद्यमाने विशेष मोहिम हाती घेऊन महानगरपालिकेने कारवाई केली आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करताना काही प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने अशा प्रसंगी महानगरपालिकेमार्फत अत्यंत सावधगिरीने पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्यवाही पार पाडण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे यांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर शासन निर्णय दिनांक ०२.०३.२००९ मध्ये विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याकरीता सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आदेशित करण्याकरीता आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना निर्देश दिले आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.किसन कथोरे, श्री.गणपत गायकवाड, ॲड.आशिष शेलार, श्री.संजय केळकर, श्री.कुमार आयलानी, श्री.राम सातपुते, श्री.अतुल भातखळकर, श्री. गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील मार्च २०१९ ते आजतागायत कोरोना १९ च्या कालावधीमध्ये कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजनाकरिता लाखो रुपयांचा विना निविदा खर्च करण्यात येणे, काही कामांमध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात येणे परंतु सदरची कामे हि आपल्याच मर्जीतील ठेकेदाराला देण्याकरिता प्रशासनाने व राजकीय प्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार काढलेल्या निविदा उघडण्याच्या वेळी अनेक वेळा निविदा रद्द करुन पुर्ननिविदा काढण्यात येणे, कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने गेल्या पाच वर्षात किती निविदा वेळेत उघडल्या गेल्या नसल्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, नगरपरिषद हद्दीमध्ये रस्ते, कमानी, लव बदलापूर, ओपन जीम, सेल्फी पौईन्ट, कचरा उचलणे निविदा, गार्डनचे सुशोभीकरण इत्यादी कामांच्या निविदा राजकीय प्रतिनिधी व प्रशासन यांच्या संगनमताने उघडून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झालेला असणे, प्रत्येक विकास कामाला तोच टेस्ट रिपोर्ट, तीच इन्शुरन्सची कॉपी लावलेली असणे, लेखा परीक्षण अहवालात सुध्दा ताशेरे ओढले असणे त्यामुळे कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील गेल्या पाच वर्षात झालेल्या विकास कामांची व त्याबाबत काढलेल्या निविदा तसेच, कोरोना कोविड १९ च्या कालावधीमध्ये खर्च केलेल्या निधी बाबत श्वेत पत्रिका काढण्याची व त्रयस्त समितीद्वारे चौकशी करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगांव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात कोविड-१९ च्या कालावधीत कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजना करिता आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक बाब म्हणून कामे करण्यात आली असून सदर कामांपैकी कोविड-१९ कालावधीमधील प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरीता संपूर्ण साहित्य खरेदी नियमानुसार निविदा प्रक्रीया राबवून करण्यात आली आहे. कोरोना बाधित रुग्णांवर तातडीने उपचाराकरीता लागणारा मेडिकल ऑक्सिजन, ऑक्सीजन टँक उभारणे, ऑक्सीजन जनरेशन प्लॅन्ट उभारणे, रुग्णवाहीका खरेदी करणे, बेड व इतर साहित्य खरेदी करणे, रॅपिड ॲन्टिजन टेस्ट किट, RTPCR Lab व्यवस्थापन, रेमडीसिवर इंजेक्शन तसेच, आवश्यक असलेल्या टॅब्लेट्सची खरेदी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम-९३(८) नुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचे मंजूरीनुसार व संचालक संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी नेमुन दिलेल्या पुरवठाधारकाकडून करण्यात आली आहे.

नगरपरिषदेमार्फत केली जाणारी विकास कामे ई-निविदा प्रक्रीया राबवून पूर्ण केली जातात. नगरपरिषदेने आतापर्यंत केलेल्या कामांना ठेकेदाराचा पुरेसा प्रतिसाद मिळालेला आहे. मात्र, काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही निविदांना पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे (कमीत कमी ३ निविदा प्राप्त न झाल्यामुळे) फेरनिविदा काढाव्या लागल्या आहेत. निविदा मंजुरीसाठी कमीत कमी ३ निविदा प्राप्त होणे आवश्यक असते. तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास नव्याने निविदा बोलविण्यात याव्यात अशा सूचना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्र.३६ मध्ये केलेल्या आहेत. सन २०१७ ते २०२१ या कालावधीत कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने विविध कामांसाठी एकूण १७१२ निविदा प्रक्रीया राबविल्या असून ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याने एकूण ९७ निविदा प्रकरणी फेरनिविदा काढण्यात आल्या आहेत.

नगरपरिषद हद्दीमधील रस्ते, कमानी, लव्ह बदलापूर, ओपन जिम, सेल्फी पॉईंट, कचरा उचलणे, गार्डनचे सुशोभिकरण इत्यादी कामे सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने तांत्रिक मंजूरी घेऊन ई-निविदा पध्दतीने करण्यात आलेली आहेत. रुपये २५ लक्ष किंवा त्यापेक्षा वरील रक्कमेच्या कामांचे "त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरिक्षण" करण्यात आले आहे. नगरपरिषदेमध्ये प्रत्येक विकास काम करतांना कामाचा दर्जा उत्तम राहण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची तपासणी शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून केली जाते. तसेच, प्रत्येक कामाचा विमा देखील काढला जातो. नगरपरिषदेच्या आतापर्यंत झालेल्या विकास कामांच्या लेखापरिक्षणामध्ये किरकोळ स्वरुपाचे आक्षेप घेतल्याचे दिसून येते. तथापि, प्रत्येक विकास कामांसाठी एकच चाचणी अहवाल / विम्याची प्रत जोडली असल्याचा आक्षेप लेखापरिक्षण अहवालामध्ये घेतल्याचे दिसून येत नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील कोविड-१९ च्या कालावधीमध्ये कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांकरीता नगरपरिषदेच्या विविध विभागामार्फत करण्यात आलेली कामे विना निविदा करण्यात आलेली नाहीत. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या अनुषंगाने उद्भवलेली परिस्थिती, त्यानुषंगाने करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच, कोरोना रुग्णांवर तातडीने करावयाचे उपचार या बाबी विचारात घेऊन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम-९३ (८) मधील तरतुदीन्वये दिलेल्या आदेशानुसार संबंधित पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात आल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"जि. पालघर येथील वसई तालुक्यातील वालिव विभागातील चिंचोटी, बापाणे, म्हात्रेवाडी, हसोबानगर, वाघराळपाडा, धुमाळनगर आदी भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, वसई-विरार महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री. सुभाष जाधव व अतिरिक्त आयुक्त यांच्या अखत्यारित मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली असतानाही, अद्याप त्याची जबाबदारी स्वीकारुन राजीनामा देणेबाबत कोणतीच कार्यवाही न करणे, वालिव, पेल्हार, चंदनसार या प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर सहायक आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांनी कारवाई करण्याऐवजी आर्थिक तडजोड करुन अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास येणे, अनधिकृत बांधकामांतून होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील वसुल्यांना हे दोघेच जबाबदार असून, सदरहू भ्रष्ट अधिकाऱ्याला प्रशासनातून त्वरित काढून टाकण्याची स्थानिक नागरिकांकडून महापालिका आयुक्तांकडे मागणी करण्यात येणे, सुभाष जाधव यांचे मूळ पद हे लिपिक असताना तसेच त्यांना एका प्रकरणात निलंबित करुन चौकशी चालू असतानाही त्यांना "जी" वालीव येथे प्रभारी सहायक आयुक्त पदावर नेमणूक देणे, अनधिकृत बांधकाम प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी देखील कठोर कारवाई करण्याचे आदेश वेळोवेळी निर्गमीत केले असतानाही वसई तालुक्यातील उपरोक्त भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे करण्यात येऊन संबंधीत महापालिका अधिनियम व नियमांचे सऱ्हास उल्लंघन केल्याची बाब स्पष्ट होणे, या सर्व प्रकरणाची दखल घेऊन शासनाने सुभाष जाधव व संबधीतांना तात्काळ निलंबीत करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी सुरु करण्याची होत असलेली मागणी, सदर प्रकरण शासनाच्या निदर्शनास येऊनही यावर कोणतीच कारवाई न करता राज्य शासनाने घेतलेली बघ्याची भूमिका, परिणामी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने उच्च स्तरावरुन हस्तक्षप व चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये करण्यात आली आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विस्तीर्ण परिक्षेत्रात महसूल व वन विभागाच्या गायरान, नवीन शर्तीच्या जमीनी व वन जमिनी मोठ्या प्रमाणावर आहेत. वसई-विरार क्षेत्रात काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर क्षेत्रातील बहुतांश अनधिकृत बांधकामे ही तत्कालीन ग्रामपंचायत/नगर परिषद काळातील व सिडको विशेष नियोजन प्राधिकरण असल्यापासून अस्तित्त्वात असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे ही महानगरपालिका अस्तित्त्वात आल्यानंतर वाढते औद्योगिकीकरण, मुंबई लगतचा भूप्रदेश, मुंबई-

अहमदाबाद महामार्ग क्र. ८ शी असलेली जवळीक इ. कारणांमुळे निर्माण झाली आहेत, ही देखील वस्तुस्थिती आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील चिंचोटी, बापाणे, म्हात्रेवाडी, हसोबानगर, वाघराळपाडा, धुमाळनगर हे भाग प्रभाग समिती G अंतर्गत समाविष्ट असून सदर प्रभागाकरीता श्री. सुभाष जाधव, लिपीक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे प्रभारी सहाय्यक आयुक्त पदाचा कार्यभार जुन, २०२१ ते दिनांक ०८.०३.२०२२ या कालावधीत सोपविण्यात आला होता. तथापि, प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त हे त्यांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम प्रकरणी पदनिर्देशित अधिकारी असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

श्री. जाधव, लिपीक यांच्याविरुध्द कोणतीही चौकशी प्रलंबित नाही. तसेच त्यांच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या कार्यकाळात अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, ही वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या कामाचा निपटारा जलदगतीने होण्याकरीता केवळ प्रशासकीय कारणास्तव श्री. सुभाष जाधव, लिपीक यांना प्रभाग समिती जी प्रभारी सहाय्यक आयुक्त पदाचा कार्यभार सोपविण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. आशिष पाटील, विक्रीकर विभाग, महाराष्ट्र शासन यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती दिनांक ११.०९.२०२० पासून अतिरिक्त आयुक्त पदी करण्यात आली असून त्यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त, अतिक्रमण या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. श्री. आशिष पाटील, अतिरिक्त आयुक्त यांच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली A to I (एकूण ९ प्रभाग समिती) या प्रभाग समिती अंतर्गत अनधिकृत बांधकामाच्या निष्कासन विषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. आशिष पाटील, अतिरिक्त आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुभाष जाधव, प्रभारी सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यकाळात प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात एकूण २,४२,६०० चौ.फुट अनधिकृत बांधकाम व ३२३ खोल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अंतर्गत आजतागायत ४२ गुन्हे व ०५ फौजदारी गुन्हे महानगरपालिकेमार्फत दाखल करण्यात आले आहेत. तथापि, सदर क्षेत्रात अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे यांच्या विरोधात निरंतर कारवाई केली जात असून वेळोवेळी विशेष मोहिम हाती घेऊन अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याचे सर्व प्रयत्न महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत केले जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकाम नियंत्रण व निष्कासन करण्याकरीता शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनाचे काटेकोरपणे पालन केले जाते. तसेच अनधिकृत बांधकाम प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय/मा. उच्च न्यायालय येथे दाखल विविध याचिकेअंतर्गत मा. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. ७/२०२० मध्ये महानगरपालिकेमार्फत दाखल फेर प्रतिज्ञापत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या अनधिकृत बांधकामाची संख्या, परवानगीशिवाय करण्यात आलेल्या बांधकामाची संख्या, स्थगिती असलेल्या दाव्यांची संख्याबाबत संख्यात्मक गोषवारा सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यान महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर

नियंत्रण आणण्याकरीता विशेष ॲक्शन प्लॅन तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने हाती घेतली आहे.

दरम्यान वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याकरीता वेळोवेळी महसूल विभागासोबत संयुक्त विद्यमाने विशेष मोहिम हाती घेऊन महानगरपालिकेने कारवाई केली आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करताना काही प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने अशा प्रसंगी महानगरपालिकेमार्फत अत्यंत सावधगिरीने पोलीस विभागाच्या समन्वयाने महानगरपालिकेमार्फत कार्यवाही पार पाडण्यात येते.

वसई-विरार शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने कार्यरत अतिरिक्त आयुक्त, श्री. आशिष पाटील व प्रभारी सहाय्यक आयुक्त यांनी अनधिकृत बांधकाम/अतिक्रमाणाविरुध्द केलेली परिणामकारक कारवाई विचारात घेता, सदर अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करणे संयुक्तीक होणार नाही, असे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. दरम्यान श्री.आशिष पाटील, अतिरिक्त आयुक्त यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरून कार्यवाही सुरू आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे यांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर शासन निर्णय दिनांक ०२.०३.२००९ मध्ये विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याकरीता सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आदेशित करण्याकरीता आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सुचित करण्यात आले आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.राम सातपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" ठाणे जिल्हयातील बदलापूर येथील स्वच्छता सर्वेक्षणात राज्यात दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनात अनियमितता, गैरप्रकार व गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत कचरा संकलनासाठी ठेकेदारांची नेमणूक करण्यापासून त्यांना बिल अदा करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत अनियमितता व मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात येणे, नगरपरिषदेने नगरपरिषद हद्दीतील कचऱ्याचे संकलन करण्यासाठी दहा झोन तयार करुन तीन ठेकेदार नेमण्यात येणे, तसेच अलीकडे अकरावा झोन तयार करुन चौथ्या ठेकेदाराचीही नेमणूक करणे, दररोज किती टन कचरा संकलित होतो याचे मोजमाप ठेवण्यासाठी वजनकाटाच नसल्याने ठेकेदारास कोणत्या निकषाखाली बिले अदा केली याबाबत संशय निर्माण होणे, ठेक्याची मुदत संपुष्टात आली असताना निविदा न मागविता याच ठेकेदारांना मुदतवाढ दिल्याचा आश्चर्यजनक प्रकार घडणे, ठेका संपुष्टात येण्यापूर्वीच सर्वसाधारण सभेने दि.२८.२.२०१८ रोजी ठराव मंजूर करुन घंटागाडी, चालक, कामगार, इंधन, देखभाल दुरुस्तीसह नव्याने ठेका देण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली असतानासुध्दा परिषदेने नव्याने निविदा मागविता त्याच ठेकेदारास काम देऊन झुकते माप दिल्याचा प्रकार घडणे, सदरहू कामात नगरपरिषदेचे सबंधीत अधिकारी व ठेकेदार यांनी आर्थिक संगनमत करुन मोठया प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात येणे, यास्तव नगरपालिकेचे संबधीत अधिकारी यांना तात्काळ निलंबित करुन त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची व संबधीत ठेकेदाराचा ठेका तात्काळ रदद करुन त्याला काळ्या यादीत टाकण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कुळगाव-बदलापुर नगरपरिषद 'अ' वर्ग नगरपरिषद असुन शहराचे क्षेत्रफळ ३५.३६ चौ.कि.मी. आहे. तर सध्याची लोकसंख्या अदांजे २.९ लक्ष इतकी आहे. शहरात दैनंदिन सरासरी ओला ६५ मे.टन व सुका ३५ मे.टन असा एकूण १०० मे.टन कचरा निर्माण होतो. या कचऱ्याचे घरोघरी जाऊन घंटागाडीव्दारे वर्गीकृत संकलन करण्यात येते. दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे १००% संकलन व वाहतुक घनकचरा व्यवस्थापनाकरीता निश्चित केलेल्या "वालीवली" या ठिकाणी करण्यात येते. निर्माण होणाऱ्या एकूण ओल्या कचऱ्यापैकी ९०% कचऱ्यावर "पीट व विन्ड्रो" कंपोस्टींग पध्दतीने, तसेच बायोगॅस प्रकल्पामध्ये प्रक्रिया करुन खत तयार करण्यात येते. निर्माण होणाऱ्या एकूण सुक्या कचऱ्यापैकी ८०% कचरा पुनर्चक्रीकरण करण्यात येतो.

स्वच्छ सर्व्हेक्षण-२०२१ अंतर्गत केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत परिक्षण करण्यात आले असून त्यानुसार " स्वच्छ सर्व्हेक्षण १ ते १० लक्ष लोकसंख्या अमृत शहरे " या गटात नगरपरिषदेने राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे, हे खरे आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्र.७९, दि.०१/०८/२०१२ अन्वये नगरपरिषदेच्या सर्व प्रभागांचे कचरा वाहतुकीसाठी १० झोन तयार करण्यात आले असून उर्वरित सर्व मुख्य रस्ते, गटारे याकरीता ११ वा झोन स्वतंत्रपणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तदनंतर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० च्या अमंलबजावणीकरीता शहरातील १० झोन करीता साफसफाई व घंटागाडीव्दारे घरोघरी जावुन ओला व सुका कचरा गोळा करणे, कचऱ्याची बंदिस्त वाहतुक करणे याकामाचे वार्षिक प्राकलन तयार करुन नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ठराव क्र.७५, दि.०८/०७/२०१५ अन्वये तीन वर्षाकरीता कंत्राट देण्यासाठी मंजुरी देण्यात आली. सदर प्राकलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मान्यता दिली आहे.

C:\SAGAR\Budget-2022_Lakshvedhi\Niyodas_1515.docx

मंजूर प्राकलनानुसार जाहीर निविदा प्रसिद्ध करुन दरपत्रक मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी सर्वात कमी दराच्या निविदेला विशेष सभा ठराव क्र.२१२/१, दि.३०/१०/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली. त्यानुसार पात्र निविदाधारकाबरोबर करारनामा करुन तीन वर्षाकरीता कामाचे आदेश देण्यात आले. दैनंदिन साफसफाई कामाचे मूल्यमापन प्रभाग स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांचेमार्फत करण्यात येत असुन नागरीकांच्या सह्या, स्वच्छता दुत यांचे कामाच्या गुणवत्तेबाबतचे अभिप्राय इ. विचारात घेऊन नियमानुसार देयके अदा करण्यात आली आहेत.

उपरोक्त १० झोनमध्ये सामाविष्ट नसलेले नगरपरिषद क्षेत्रातील मुख्य बाजारपेठ व त्यालगतचे मुख्य रस्ते याकरीता निर्माण करण्यात आलेल्या झोन क्र.११ येथील कामाच्या प्राकलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार जाहीर निविदेव्दारे नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९८/२, दि.१०/०७/२०१३ अन्वये कामाची निविदा मंजूर करण्यात आली असून स्वच्छता निरिक्षक यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन नागरीक/व्यापारी यांचे कामाच्या गुणवत्तेबाबतचे अभिप्राय घेऊन नियमानुसार कंत्राटदाराची देयके अदा करण्यात आली आहेत.

सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३२, दि.२८/०२/२०१८ अन्वये करारनाम्यामध्ये समाविष्ट असलेल्या अटी व शर्तीनुसार कचरा संकलन व वाहतुकीच्या मंजुर प्राकलनात १०% वाढ करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

कंत्राटदाराच्या कामाची मुदत दि.१५/१२/२०१८ रोजी समाप्त होत असल्याने नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२६, दि.३१/१०/२०१८ अन्वये नगरपरिषद हद्दीतील कुटुंबाच्या सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल तातडीने प्राप्त करुन घेऊन सविस्तर अहवालानुसार साफसफाई व घंटागाडीव्दारे घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा गोळा करणे व नगरपरिषद प्रकिया केंद्रापर्यंत वर्गीकृत वाहतुक करणे या कामांचे वार्षिक प्राकलन तयार करून त्याबाबतचा अहवाल सभेपुढे सादर करणे व या प्राकलनास तांत्रिक मंजुरी घेऊन नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच नवीन कंत्राटदाराची नेमणूक होईपर्यंत सद्य:स्थितीत सुरु असलेल्या कंत्राटदाराला मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती.

तदनंतर विशेष सभा ठराव क्र.३९०, दि.२६/०२/२०१९ अन्वये नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ चे अंमलबजावणीकरीता साफसफाई व घंटागाडीव्दारे घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा गोळा करणे व वर्गीकृत कचरा नगरपरिषद प्रकिया केंद्रापर्यंत वाहतुक करणे याकामी कंत्राटदारांची नेमणूक करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सदर कामाच्या प्राकलनास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.२६/०७/२०१९ रोजी मान्यता दिली आहे.

मंजुर प्राकलनानुसार दि.१०/०८/२०१९ रोजी प्रसिध्द जाहीर निविदेनुसार प्राप्त निविदाधारकांची कागदपत्रे तपासली असता तांत्रिकदृष्टया अपात्र ठरल्याने दि.१९/०९/२०१९ रोजी फेरनिविदा प्रसिध्द करुन निविदाधारकांकडून दरपत्रक मागविण्यात आले. प्राप्त झालेल्या दरपत्रकास स्थायी समिती सभा ठराव क्र.९२/३, दि.१२/१२/२०१९ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली. प्राप्त मंजूरीनुसार पात्र निविदाधारकाबरोबर करारनामा करून पाच वर्षाकरीता कामाचे आदेश दि.१२/०५/२०२० रोजी देण्यात आले असून त्यानुसार कचरा संकलनाचे काम सुरु आहे.

नगरपरिषद क्षेत्रामधून कंत्राटदारामार्फत दैनंदिन संकलित करण्यात येणाऱ्या घनकचऱ्याचे वजन करण्याकरीता घनकचरा व्यवस्थापनाकरीता निश्चित केलेल्या वालीवली या ठिकाणी वजनकाटा बसविण्यात आला असून सद्य:स्थितीत वजनाचे परिमाण व स्वच्छता निरीक्षक यांनी केलेले कामाचे मुल्यमापन विचारात घेऊन नियमानुसार देयक अदा करण्यात येत असल्याचे कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने कळविले आहे.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. संतोष बांगर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ नुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"हिंगोली नगर पालिकेला महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत मंजूर झालेल्या रस्त्याची पूर्ण झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये निदर्शनास येणे, उक्त अभ्यियानांतर्गत रस्त्याकरिता १०१ कोटीचा निधी मंजूर झाला असून यामध्ये ४६ रस्ते सिमेंटचे तर ११ रस्ते डांबरीकरणाचे असणे, सदरहू रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून अवघ्या सहा महिन्यातच या रस्त्यावर जागोजागी खडडे पडलेले असून वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.नगरविकास मंत्र्यांकडे पत्रव्यवहाराव्दारे चौकशीची केलेली मागणी, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांच्या कामाची पाहणी करण्याची आवश्यकता, तसेच दर्जाहीन व निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी वाया घालवणाऱ्या दोषी कंत्राटदारावरुध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच यास जबाबदार असणाऱ्या दोषी ठेकदारांची देयके तात्काळ थांबविण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

-: मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हिंगोली शहरासाठी माहे जून, २०१९ मध्ये रु. १०१.०९ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प मंजूर करण्यात आला. सदर प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे सदर प्रकल्पाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडून करण्यात आलेले आहे. सदर त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण अहवालानुसार सदर प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे दिसून येते.

माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री, नगर विकास यांच्याकडे चौकशीची मागणी केली. त्यानुसार सदर प्रकल्पाच्या कामाच्या दर्जाबाबत मुख्याधिकारी, हिंगोली यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर

अहवालात सदर प्रकल्पाचे ११ वेळा त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आल्याचे नमूद करुन सदर अहवालात रस्त्यांच्या कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, सदर प्रकल्पात वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या गुणवत्तेची तपासणी दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून करण्यात आलेले असून त्याबाबतच्या अहवालानुसार सदर प्रकल्पातील साहित्याची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे सदर अहवालात नमूद करण्यात आले असून त्यासंबंधीत कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत. तसेच, सदर प्रकल्पाचे काम विहित मुदतीत व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, हिंगोली नगरपरिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकल्पात एकूण ५७ कामे असून त्यापैकी ४६ रस्ते सिमेंटचे व ११ रस्ते डांबरीकरणाचे आहेत. सद्यस्थितीत त्यापैकी ४६ सिमेंट रस्त्यांचे व १० डांबरी रस्त्यांचे काम पूर्ण झालेले असून केवळ एका रस्त्याचे काम सद्यस्थितीत शिल्लक असून एप्रिल, २०२२ अखेर पर्यंत सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सदर रस्ते प्रकल्पाच्या कंत्राटदाराचे देयक अदा करण्यापूर्वी रस्त्यांच्या कामचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आले. त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल समाधानकारक असल्याची खात्री करुनच कंत्राटदारासचे देयक अदा करण्यात आल्याचे मुख्याधिकारी, हिंगोली नगरपरिषद यांनी नमूद केले आहे.

*****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री. मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"गोंदिया जिल्ह्यातील सडक / अर्जुनी व अर्जुनी / मोरगाव नगरपंचायतीच्या हद्दीतील शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणावर अनेक वर्षांपासून अतिक्रमण करुन कच्ची घरे बांधून नागरिक राहत असले तरी "सर्वांसाठी घरे-२०२२" च्या धोरणानुसार जमिनीचा पट्टा त्यांचे नावावर नसणे, त्यामुळे पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकूल योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची त्यांचेवर आलेली वेळ, नागरी क्षेत्रातील अतिक्रमणधारकांचे नावे जमिनीचे पट्टयांचे वाटप करुन शासकीय घरकुल योजनेचा लाभ संबंधित कुटुंबांना देणेबाबत शासनाच्या नगरविकास विभागाचे दिनांक ६ मार्च, २०१८ चे शासन निर्णयाप्रमाणे, अतिक्रमित जमिनीचे पट्टे नावावर करुन देण्याबाबत शासनाचे धोरण असणे, तथापि असे असतांनाही घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत नागरिकांनी केलेल्या मागणीला सडक अर्जुनी व अर्जुनी / मोरगाव या नगरपंचायतीकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी येणे, या तक्रारींवरुन मा.लोकप्रतिनिधींनी नगरपंचायतीचे पदाधिकारी व अतिक्रमण धारकांची बैठक घेऊन घरकुलासाठी जमिनीचे पट्टे संबंधिताचे नावावर करुन देणेबाबत निर्णय घेण्यांत येणे, परंतु एक वर्षापासून नगरपंचायतीचे पदाधिकारी व अतिक्रमित जमीनवाटप समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर, शासनाचे धोरणानुसार अतिक्रमित जमिनीचे पट्टे वाटपाबाबत कार्यवाही न झाल्यामुळे दोन्ही योजनांची कोट्यावधी रुपयांची रक्कम जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे गेल्या दोन वर्षांपासून अद्याप अखर्चित असल्याचेही दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी सडक / अर्जुनी व अर्जुनी / मोरगाव परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे संबंधित नगरपंचायतीचे अधिकारी व जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता तसेच संबंधितांना जमिनीचे पट्टे वाटपाची व घरकूल योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. एकनाथ शिंदे, मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

शासनाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत नगर विकास विभाग, दिनांक १७/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेतला आहे. त्यानंतर

नगर विकास विभाग, दिनांक ६ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या (वन विभाग वगळून) जमीनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत निर्णय घेतला आहे.

सदर सर्वांसाठी घरे-२०२२ धोरणाच्या अनुषंगाने नगरपंचायत सडक-अर्जुनी अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभाकरीता एकूण ५१४ घरकुलांचा DPR मंजूर आहे. त्यापैकी शासकीय जमीनीवर, स्वमालकीच्या जागेवर असलेल्या ३२४ लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात आला आहे व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित १९० लाभार्थ्यांपैकी १२१ लाभार्थी जमीन मालकी संदर्भात तसेच फेरफार प्रलंबित असल्याने त्यांना लाभ देय करण्यात आले नाही. उर्वरित ६९ अर्जदार यांचे नगरपंचायत हद्दीतील भूमापन क्रमांक ७३, १२९, १७१, १८० व १८२ मध्ये अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे. सदर जागा ७/१२ च्या नोंदीनुसार "सरकार" अशी नोंद असून इतर हक्कामध्ये झुडपी जंगल, मोठ्या झाडांचे जंगल अशा नोंदी आहेत. या ६९ लाभार्थ्यांना दिनांक १७/११/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घरकुलाचा लाभ देण्यासाठी अनुषंगिक कार्यवाही म्हणून नगरपंचायत सडक-अर्जुनी यांनी दिनांक १६/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, सडक-अर्जुनी यांचेकडे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केली. याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "वरील नमूद एकूण पाच ७/१२ गटावरती वनसंवर्धन अधिनियम, १९८० च्या तरतूदी लागू होतात, येथे वनेत्तर कामे करावयाची असल्यास केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे," असे कळविले आहे. त्यामुळे सदरच्या ६९ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देणे शक्य झाले नाही.

नगरपंचायत अर्जुनी अंतर्गत DPR नुसार एकूण ३२३ लाभार्थी पात्र ठरले असून त्यापैकी २६२ लाभार्थ्यांना पंतप्रधान योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित ६१ लाभार्थ्यांच्या संदर्भात त्यांच्या मालकी हक्काची कागदपत्रे अद्ययावत नसल्याने त्यांच्याबाबत कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

पंतप्रधान आवास योजनेच्या लाभासाठी अर्जुनी नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या अर्जांपैकी २४९ अर्जदारांचे नगरपंचायत हद्दीतील गट क्रमांक २६७/१, १८२, १८५, २४४, २९० व २८८ मध्ये अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे. सदर जागा ७/१२ च्या नोंदीनुसार "सरकार" अशी नोंद असून इतर हक्कामध्ये झुडपी जंगल, मोठ्या झाडांचे जंगल अशा नोंदी आहेत. ही बाब DPR तयार करतानाच दिसून आल्याने या अर्जदारांचा समावेश DPR मध्ये करण्यात आलेला नाही.

वरीलप्रमाणे सडक अर्जुनी नगरपंचायत अंतर्गत मंजूर DPR मध्ये ६९ व अर्जुनी नगरपंचायत अंतर्गत अर्ज प्राप्त झालेल्या २४९ व्यक्तींना, वन विभागाने हरकत घेतल्याने या योजनेचा लाभ देता आला नाही. यासंदर्भात केंद्र शासनाची मंजूरी मिळविण्याच्या दृष्टीने वन विभागाशी सल्लामसलत करुन योग्य ती कार्यवाही सत्वर केली जाईल.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. अतुल सावे, नारायण कुचे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"औरंगाबाद शहराला जायकवाडी धरणातुन पुरवठा होत असणे, परंतु पूर्वीची पाणी पुरवठा योजना जुनी व अपुरी पडत असणे, त्यामुळे राज्यसरकारने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून १६८० कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याकरता तब्बल १ वर्ष वेळ घेणे, त्यानंतर माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते या योजनेचे भूमिपूजन करणे, परंतु अद्यापपर्यंत राज्य शासनाने या योजनेसाठी निधि उपलब्ध करून न देने, जुन्या समांतर जलवाहीनीच्या महापालीकेकडे जमा असलेल्या पैशांमधूनच नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी खर्च करने, गेल्या काही महिन्यांपासून हे पैसे देखील न मिळाल्या मुळे पाणी पुरवठा योजनेचे काम ठप्प असणे, या योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी ३६ महिने (३ वर्ष) असणे, आतापर्यंतच्या १ वर्षाच्या काळात साधारण ५० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित असणे, परंतु प्रत्यक्षत ५ ते १० टक्के च काम होने, त्यामुळे ही योजना पूर्ण न होण्याची शक्यता असणे व त्यामुळे औरंगाबाद शहराचा विकास खुंटने, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

-: मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत औरंगाबाद शहरासाठी रुपये १६८०.५० कोटी किंमतीचा पाणी पुरवठा प्रकल्प माहे सप्टेबर, २०१९ मध्ये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाची कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून त्यांच्याकडून सदर प्रकल्पाचे काम पूर्ण ठेव तत्वावर करुन घेण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पाचे भूमीपूजन मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले असून या प्रकल्पातील जलशुध्दीकरण केंद्र, मुख्य संतुलन जलकुंभ, गुरुत्व वाहिन्या, २२ जलकुंभ व वितरण व्यवस्था इत्यादी कामे प्रगतीपथावर असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केले आहे. सदर प्रकल्पाची मोठी किंमत विचारात घेता या प्रकल्पास भविष्यात केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अभियांनातून निधी वितरीत करण्याचे योजना मंजूर करतानाच ठरविण्यात आले आहे. त्यामुळे, पूर्वीच्या समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी राज्य शासनाने

औरंगाबाद महानगरपालिकेला वितरीत केलेल्या केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीतून रूपये २०४.४४ कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वर्ग करण्याचा सूचना औरंगाबाद महानगरपालिकेस देण्यात आल्या होत्या. मात्र, महानगरपालिकेने प्रकल्पाची प्रगती विचारात घेऊन आतापर्यंत रूपये ९३.१७ कोटी इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करून दिलेला असून त्यामधून आतापर्यंत रूपये ३५.१६ कोटी इतका खर्च झाला आहे. त्यामुळे, निधीअभावी काम ठप्प झाले अशी वस्तुस्थिती नाही.

या योजनेचे कार्यादेश दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ रोजी देण्यात आले असून काम पूर्ण करण्याचा कालावधी ३६ महिने इतका आहे. फेब्रुवारी, २०२२ अखेर या योजनेचे साधारणत: २५ टक्के काम पूर्ण होणे आवश्यक होते. त्या तुलनेत आतापर्यंत सुमारे १० टक्के इतके काम झाले आहे. योजनेच्या मंजूर बारचार्टप्रमाणे कामाची अपेक्षित प्रगती होऊ शकली नाही. परंतु, संबंधित ठेकेदाराने मूळ मुदतीच्या उर्वरित कालावधीत निविदेअंतर्गतची सर्व काम पूर्ण करण्यासाठी सुधारीत बारचार्ट/ नियोजन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केले आहे. त्याआधारे मूळ मुदतीच्या उर्वरित कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्याचे कार्यान्वयण यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.विकास ठाकरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

"नागपूर महागनर पालीके अंतर्गत मनपाच्या विविध विभागांसह विविध झोन कार्यालयांना स्टेशनरीचे वाटप करण्यात येत असणे, मे.मनोहर साकोरे ॲन्ड कंपनी, मे. स्वस्तीक ट्रेडींग, मे. गुरूकृपा स्टेशनरी. मे. एस.के. एंटरप्रायझेस व मे. सुदर्शन कंपनी य एकाच मालकाच्या विविध नावांच्या कंपन्यामार्फत स्टेशनरीचा पुरवठा करण्यात येणे, सदर्रहू स्टेशनरी पुरवठा करीत असतांना स्टेशनरीचा पुरवठा न करता अधिकारh@कर्मचारी यांच्या खोटया सहया करून आरोग्य विभागामध्ये रू.२.१५ कोटी (१३१ फाईल), लायब्ररी विभाग रू.७४.३ लाख (४७ फाईल), जन्म-मृत्यु विभाग रू.६०.६७ लाख (४० फाईल), घनकचरा व्यवस्थापन विभाग रू.१.२३ कोटी (३३ फाईल), सामान्य प्रशासन भाग रु.६८.०० लाख (८ फाईल), बिलांची रक्कम उचलण्यात आलेली असल्याचा धक्कादायक प्रकार माहे डिसेंबर २०२१ मध्ये उघडकीस येणे, सदर बिले मंजुर करतांना मनपातील लेखा विभागातील अधिकारयांनी सुध्दा तपासणी केली नसणे, या स्टेशनरी गैरव्यवहारामध्ये दि १३ डिसेंबर २०२१ रोजी संबंधीत पुरवठादार कंपनी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर गैरप्रकार हा एकाच विभागातील असुन मनपाचे अन्य विभागांना कोटयावधी रुपयांची स्टेशनरी पुरवठा करण्यात येणे, त्यामुळे मनातील अन्य विभागातील स्टेशनरी पुरवठ्याची चौकशी होणे गरजेचे असणे, तसे राज्य शासनाने सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मध्ये मनपाला कोरोना महामारीमध्ये उपाय योजना करण्याकरीता रू.२५.०० कोटी आपात सहायता निधी देण्यात आलेला असणे, परंतु महामारीमध्ये विना निवीदा नागपूर-कोटोल रोडवरील दहेगाव मार्गावरील राधास्वामी सत्संग केंद्रामध्ये १००० बेडच्या रुग्णालयाकरीता, शहरातील विविध भागामंध्ये कंटेलमेंट झोन उभारण्यास मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येणे, यामध्ये सुध्दा मोठ्याप्रमाणात अनियमितता झालेली असल्याचे निदर्शनास येणे. नागरिकांच्या कराचे रूपाने जमा केलेल्या रक्कमेचा अश्या प्रकारे गैरव्यवहार करण्यारया अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द कार्यवाही करण्याची नागरिकांनी मागणी करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

नागपूर महानगरपालिकेमध्ये आरोग्य विभागाअंतर्गत विविध स्टेशनरी व इतर साहित्याचा पुरवठा करणाऱ्या मे.गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, मे. एस. के इंटरप्रायजेस नागपूर, मे. सुदर्शन पेपर कनव्हेंटिंग, मनोहर साकोडे ॲन्ड ब्रदर्स व स्वस्तिक ट्रेड लिक या एजन्सीसतर्फे डिसेंबर २०२१ या महिन्यात रु.६७.०८ लाख किंमतीच्या एकुण ४१ देयकांवर संबंधित वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय विभागाचे कर्मचारी यांच्या बनावट स्वाक्षरी करुन वित्त विभागास परस्पर सादर केलेल्या

नस्त्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वित्त विभागाव्दारे रु.६७.०८ लाख इतक्या किंमतीचे देयके पारीत करण्यात आली. या प्रकरणी सदर पोलीस स्टेशन नागपूर येथे दि.१३/१२/२०२१ येथे भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ अंतर्गत दिनांक १५.१२.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस यंत्रणेने संबंधित कंत्राटदारांना दि.१६.१२.२०२१ रोजी अटक केली आहे. तसेच महानगरपालिका प्रशासनाद्वारे संबंधित दोषी ५ कंत्राटदारांना व त्यांच्या अखत्यारितीतील या कामाशी संबंधीत काम करण्याऱ्या इतर ३ फर्मना काळया यादीत टाकण्यात आले आहे.

या गैरव्यवहारात समाविष्ट कंत्राटदार पुढीलप्रमाणे आहेत. श्री.मनोहर साकोडे ॲण्ड ब्रदर्स, मे.गुरुकृपा स्टेशनर्स ॲण्ड प्रिन्टरर्स या एजन्सीचे मालक प्रो.मनोहर ज.साकोडे हे आहेत. तसेच मे.स्वस्तिक ट्रेड लिंक चे मालक प्रो. अतुल मनोहर साकोडे, मे.एस.के. इंटरप्राजेसच्या मालक प्रो.सुषमा के.साकोडे, मे.सुदर्शन पेपर कनर्व्हटिंग चे मालक प्रो. कोलबा ज.साकोडे तसेच मे.गणेश साई कृपा सर्विसेस या एजन्सीचे मालक प्रो.निलेश भगत हे आहेत.

या प्रकरणाशी संबंधीत महानगरपालिकेतील ५ अधिकारी / कर्मचारी प्रथमदर्शनी दोषी आढळल्याने पोलीस यंत्रणेमार्फत त्यांना दि.१९-१२-२१ ते दि.२६ -२-२०२२ या कालावधीमध्ये अटक केली असून आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांनी मागणी केल्यानुसार मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याकरिता सक्षम प्राधिकारी आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दि. १५.०३.२०२२ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दोषारोप दाखल करण्यात आले आहे. सध्या सर्व अधिकारी व कर्मचारी न्यायालयीन कोठडीत आहेत. प्रशासनाद्वारे या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना निलंबीत करण्यात आले आहे.

प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता अतिरिक्त आयुक्त, सामान्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली. यासमितीने दि.३१.०१.२०२२ रोजी आपला अहवाल सादर केला असून यानुसार महानगरपालिकेतील वर्ग-१ दर्जाचे ७, वर्ग-२ दर्जाचे १ अधिकारी व वर्ग-३ दर्जाचे ११ असे एकूण १९ अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. याच समितीच्या अहवालानुसार आरोग्य विभाग, घनकचरा विभाग, जन्म - मृत्यु विभाग व ग्रंथालय विभाग या विभागांमध्ये २५९ नस्त्यामध्ये रु. ५,४१,००३,२२/- अनियमितता आढळून आली आहे. दोषी अधिकाऱ्यांविरुध्द महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सूरू असून याबाबत संबंधीत पोलीस यंत्रणेस दि ११/०२/२०२२ रोजीचे पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे तसेच सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या महासभेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० अन्वये सत्ता पक्षनेता यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने दिलेल्या अहवालानुसार मागील ५ वर्षांमधील अशा स्वरुपाच्या प्रकरणांमधील नस्त्यांचे अध्ययन होणेकरिता निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्यात येत आहे.

राज्य शासनाकडून राज्य आपात सहायता निधी (SDRF) मधून सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरिता रु.९ कोटी ७८ लाख तर सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरिता रु.१५कोटी ८९ लाख असे एकूण २५ कोटी ६७ लाख इतके अनुदान प्राप्त झाले आहे. यापैकी रु.२३.५६ कोटी इतका खर्च कोविड केअर, एम्बुलन्स सेवा, औषधे इत्यादी अत्यावश्यक बाबींवर करण्यात आला आहे. यापैकी उर्वरित रु.२ कोटी ११ लाख इतक्या रक्कमेमधून प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात कोव्हीड-१९ विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत रुग्णांचे विलगीकरण करण्याकरीता शहरालगत तथापि शहर सीमेबाहेरील राधास्वामी संत्सग केंद्र या धर्मदाय संस्थेची जागा जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या सहमतीने कोव्हीड केअर केंद्र स्थापीत करण्याकरिता निश्चित करण्यात आली. सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने केंद्रावर लागणारे साहित्य जसे पंलग,गादया व बेडशिट ई. आवश्यक साहित्याच्या पुरवठा करण्याच्या दृष्टीने रु. ४६,६३,४४०/- (GST सह) इतक्या कामाची विहित लघु निवीदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने प्राप्त झालेल्या तीनही निवीदाकारांना विभागून "निविदा दरावर" (At Par) पुरवठा करण्याबाबत दिनांक ०५.०५.२०२० ला कार्यादेश देण्यात आले. यानुसार साहित्याचा निविदाकाराकडून पुरवठा करण्यात आला. तथापि, कालांतराने महानगरपालिका सीमेअंर्तगत खाजगी व शासकीय दवाखाने, हॉटेल्स व ईतर सेवाभावी संस्थांद्वारे अनेक कोव्हीड केअर सेंटर उभारण्यात आली. रुग्णांनी शहर सीमेतील या केंद्राचा उपयोग करण्यास प्राधान्य दिले. पर्यायाने राधास्वामी संत्सग येथील स्थापीत केंद्राची गरज न भासल्यामुळे सदर केंद्राचा वापर करण्यात आला नाही. तथापि, राधास्वामी संत्सग केंद्रावरील कोविड केअर सेंटर करिता पुरविण्यात आलेल्या साहित्यांचा इतर शासकीय रुग्णालय, निमशासकीय रुग्णालय व महानगरपालिकेचे कोविड केअर सेंटर या ठिकाणी वापर करण्यात आला आहे.

शासन निर्देशानुसार कोव्हीड-१९ रुग्ण आढळून आल्याने घोषित करण्यात आलेल्या प्रतिबंधित क्षेत्र परिसरातील आवागमन प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत तातडीने बंद करण्याकरिता महानगरपालिकेद्वारे बॅरेकेटिंग करण्यात आले आहे. कामाची तातडीची निकड व साथ रोग विषयक गांर्भिय लक्षात घेता सदर कामे निविदा मागवुन करणे शक्य नसल्याने सदर कामे महानगरपालिकेत पंजीकृत असलेल्या व कोव्हीड -१९ च्या काळात कामे वेळेत पुर्ण करुन देऊ शकणाऱ्या कंत्राटदारांना देण्यात आली. अशाच प्रकारच्या कामामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे करण्यात आलेल्या दर निश्चिती प्रमाणे देयके अदा करण्यात आली. याकामांकरिता महानगरपालिकेकडून रु.५ कोटी ७१ लाख इतका खर्च करण्यात आला आहे.यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार आवश्यक स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे.

****

H/0002-2

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. राम सातपुते, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"डोंबिवली महापालिका हद्दीतील डोंबिवलीच्या खंबाळपाडा येथील कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनीने शेषाराम चौधरी या विकासकाने महानगरपालिकेच्या गुरचरण जागा सर्व्हे क्र. ३१ वर अनधिकृत इमारतीचे बांधकाम करून सदनिका विक्री करताना जी जाहिरात दिली त्यामध्ये सर्व्हे क्र. २९ हा दाखविण्यात येणे, परंतु सदरली जागेच्या ७/१२ उताऱ्यावरही महापालिकेचेच नाव असणे, असे असतानाही महापालिका आयुक्त, अतिक्रमणचे अतिरिक्त आयुक्त व वॉर्ड ऑफिसर यांचेसोबत आर्थिक संगनमत करून त्यावर सात मजल्याच्या पाच इमारतींचे बेकायदेशीर व अनधिकृत बांधकाम केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, विकासकाने बांधकाम पूर्ण केल्यावर व वृत्तपत्रात वन आरके, वन बीएचके, टू बीएचके अशी जाहिरात देऊन करोडो रूपयांस फ्लॅटची विक्री करून कोट्यावधी रूपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येणे, महापालिकेच्या नगरविकास विभागाची कोणतीही परवानगी न घेता शासनाने प्लॅन मंजूर केल्याचे सांगून ग्राहकांची आर्थिक लूट करण्यात येणे, महापालिकेच्या नगररचना विभागाचे बनावट दस्तऐवज बनविणे, जिल्हाधिकाऱ्यांचे एन.ए.कागदपत्रे लावून रजिस्ट्रेशन करणे, यामुळे शासनाचा बुडालेला करोडो रूपयांचा महसूल, सदर प्रकरणी विकासका विरोधात टिळक नगर पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात येणे, यावर अनधिकृत बांधकामावर कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अधिकारी कारवाई करण्यासाठी गेले असता बांधकाम व्यावसायिकाने तेथे खोटे भाडोत्री दाखवून सदर इमारत ही रहिवासी असल्याचे दाखविणे, तसेच पोलीस प्रोटेक्शन देत नसल्याचे खोटे कारण सांगून महापालिकेचे अधिकारी अनधिकृत बांधकामास देत असलेले बेकायदा संरक्षण, यास्तव ह्या प्रकरणात आर्थिक संगनमत करून बेकायदा बांधकाम वाचविणाऱ्या महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, शेषाराम चौधरी ह्या विकासकावर एम.आर.टी.पी. कायद्यानुसार गुन्हा दाखल असतानाही बांधकाम पूर्ण झाले असणे, निष्कासनाच्या कारवाईचे आदेश निघाले असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाक करून इमारत पूर्ण करण्यास दिलेली मोकळीक, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवलीच्या खंबाळपाडा येथील सर्व्हे क्र. ३१ ही जागा गुरचरणसाठी असून सर्व्हे क्र. २९ ही जागा महानगरपालिकेच्या नावावर आहे. श्री. शेषाराम चौधरी यांच्या कृष्णा कन्स्ट्रक्शन कंपनीने कांचनगाव येथील सर्व्हे क्र. २९ वर उभारलेल्या इमारतीतील सदनिका विक्रीसाठी वृत्तपत्रात जाहिरात दिली, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, तहसिलदार, कल्याण यांनी सर्व्हे क्र. ३१ वर अनधिकृत बांधकाम चालू असल्याचा अहवाल कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला सादर केला आहे.

श्री. शेषाराम चौधरी, भोईरवाडी, डोंबिवली (पूर्व) यांनी केलेल्या आर.सी.सी. इमारत बांधकामाबाबत ६/फ क्षेत्र कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीबाबत बिट मुकादम तथा पर्यवेक्षक यांचा दि.१३.०५.२०१९ रोजीचा अहवाल तसेच बिट निरीक्षक तथा कनिष्ठ अभियंता व शहानिशा अधिकारी तथा उप अभियंता "फ" प्रभाग यांच्या दि.०४.०५.२०१९ रोजीच्या पाहणी अहवालास अनुसरून बांधकामधारक श्री. शेषाराम चौधरी यांना संबंधित प्रभागक्षेत्र अधिकाऱ्याने दि.११.१०.२०१९ रोजी सदर बांधकामाची अधिकृतता सिध्द करणारी कागदपत्रे सादर करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६० व २६७(१) अन्वये सुनावणीची नोटीस दिली.

RoTA/H-1 (750-3-2022)

सदर सुनावणीस बांधकामधारक उपस्थित राहिले नाही तसेच बांधकामाची अधिकृतता पडताळणी करणारी कोणतेही कागदपत्रे/दस्ताऐवज सादर केले नाही. त्यामुळे दि.२६.११.२०१९ रोजी सदर बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४७८ अन्वये अनधिकृत घोषित करून, आदेश बजावल्याच्या तारखेपासून ३० दिवसात स्वत: स्वखर्चाने निष्कासित करण्याबाबत बांधकामधारक श्री. चौधरी यांना कळविण्यात आले.

संबंधित बांधकामधारक यांनी सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित न करता सुरूच ठेवले. सबब त्यांचे विरोधात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३९७ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२ अन्वये टिळकनगर पोलीस स्टेशन, डोंबिवली (पूर्व) येथे दि.३०.०८.२०२१ रोजी FIR No.०१३५, दाखल करण्यात आला आहे.

प्रभागक्षेत्र अधिकरी "फ" प्रभाग यांनी दि.२३.०८.२०२१ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी यांना सदर अनधिकृत बांधकामांना विद्युत पुरवठा न करण्याबाबत तसेच दि.३०.११.२०२१ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा डोंबिवली विभाग यांना पाणी पुरवठा कनेक्शन न देण्याबाबत कळविले आहे.

सदर इमारतीमध्ये ११८ सदनिका असून २३ सदनिकांमध्ये रहिवास व १० गाळ्यांपैकी ४ गाळ्यामध्ये वापर असल्याने दि.०४.०३.२०२२ रोजी रहिवास मुक्त करण्याबाबत बांधकामधारक श्री. शेषाराम चौधरी तसेच संबंधित रहिवाशी यांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे "फ" प्रभागक्षेत्र अधिकारी यांनी दि.२१.०३.२०२२ रोजी पोलीस आयुक्त, परिमंडळ क्र. ३, कल्याण यांना सदर अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यासाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली आहे.

सदर भुखंडाची जागा ही गुरचरण असून सर्व्हे क्र. २९ व ३१ चा उतारा कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या नावे आहे. बांधकाम धारक यांनी फ्लॅटची विक्री करून कोट्यावधी रूपयांचा आर्थिक घोटाळा केला, अशी वस्तुस्थिती नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने त्यांचे अहवालात नमूद केले आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १४४

सर्वश्री.समिर मेघे, मोहन मते, डॉ.पंकज भोयर,सर्वश्री टेकचंद सावरकर, विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, बंटी भांगडिया, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.

"नागपूर जिल्ह्यात अल्प व अत्यल्प भुधारक गोर गरीब गरजू शेतकऱ्यांच्या उत्पनाचा स्तर वाढविण्याकरीता प्रधानमंत्री खनिज कल्याण निधीतून दुधाळू गाई व शेळी वाटप योजना राबविली असणे, सदर योजनेच्या अंतिम याद्या लाभासाठी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाला पाठविण्यात येणे, असल्यास या योजनेत तालुक्यातील दोन सर्कलला झुकत्या मापासह धनदांडग्यांची व पदाधिकारी असलेल्या लाभार्थी म्हणून नावे असल्याने गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, दुधाळू गाईच्या यादीत सर्वात जास्त राजोला जि.प. सर्कलमधील -४३, सिल्ली-१५, कुही-३, वेलतुर-२ व मांढळ न सर्कलमधील -१ असे एकूण ६४ तर शेळी वाटप मध्ये राजोला सर्कलमधील ५२ व सिल्लीमधील ६ असे एकूण ५८ लाभार्थ्यांची नावे मंजुर होणे, असल्यास मांढळ व वेलतूर सर्कलमधील गरीब शेतकऱ्यांवर अन्याय होत असणे, नागपूर जि.प. पशुसंवर्धन विभागाने दुधाळ गाई व शेळी गट वाटप अनुदान योजना जाहीर होणे, सदर मंजूर यादीत तालुक्यातील गरीब व पात्र शेतकऱ्यांना डावलण्यात येणे, तर धन दांडग्यांची, सधन व ग्रामपंचायत पदाधिकारी यांना स्थान देण्यात येणे, सदर दुधाळू गायी अनुदान योजनेच्या मंजूर यादीत रा.सिल्ली हल्ली कुही येथील प्रमिला महादेव जीभकाटे यांचे नाव असणे, सदर लाभार्थींचे पती महादेव जीभकाटे हे मांढळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती असणे, सदर लाभार्थींचे पती-पत्नीचे वार्षिक उत्पन्न लाखो रुपयांचे असताना त्यांचे नावे दुधाळू गाई वाटप यादीत येणे हे आश्चर्य होत असणे, असल्यास शासनाने दखल घेऊन या यादीची फेरनिवड करणे व शासनाने सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून तातडीने कर्यवाही करण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे निवेदन

राज्यातील प्रत्यक्ष खाणबाधीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधीत क्षेत्रातील लाभार्थ्यासांठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना राबविण्यासंदर्भात ऊद्योग ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. एमडीएफ - ०६१५ / प्र.क्र. ३४/ उद्योग - ९, दिनांक १ संप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने खनिज बाधीत क्षेत्राचा विकास व कल्याण करण्यासाठी विविध प्रकल्प कार्यक्रम राबविण्याचे निर्देशीत केले आहे.

शासनाच्या उक्त योजनेनुसार नागपूर जिल्ह्यातील खनिज बाधीत क्षेत्रातील लाभार्थ्यासाठी कौशल्य विकास या घटकाखाली कोवीड-१९ या महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रात रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत १३ तालुक्यातील ओबीसी व सर्वसाधारण लाभार्थ्यांना ९० टक्के अनुदानावर २ गाय/म्हैस यांचे १३०० गट तसेच १०+१ शेळी यांचे १३०० गट, असे एकूण २६०० पशुधन गट, वाटप करण्याची योजना राबविण्यास जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांनी दिनांक २५.०८.२०१९ रोजी मान्यता दिली.

सदर योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधून प्राप्त झालेल्या पात्र अर्जांमधून योजनेचे निकष विचारात घेऊन निवड प्रक्रीया राबवून लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. दुधाळ पशुधन गटात १३०० पैकी ११६७ व शेळी गटात १३०० पैकी १०७५ लाभार्थ्यांची निवड समितीने निवड केली आहे. उर्वरीत दुधाळ पशुधन गटातील ११३ व शेळी गटातील २२५ लाभार्थ्यांची निवड पूरक यादीव्दारे जिल्ह्यातील लोकसंख्या व योजनेतील विहीत केलेल्या प्राधान्य क्रमानुसार करण्यात येणार आहे.

मौजे राजोला, मौजे सिल्ली, मौजे कुही, मौजे वेलतूर व मौजे मांढळ ही सर्व गावे कुही तालुक्यामधील आहेत. सदर योजना तालुक्यामधील लोकसंख्या विचारात घेऊन राबविण्यात येत असून कुही या तालुक्यासाठी गाय/ म्हैस गटासाठी ६४ व शेळी गटासाठी ५८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

***

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. रोहित पवार, विधान सभा सदस्य यांनी विधान सभा नियम क्र.१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षेवधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे जून २०२१ ते माहे ऑक्टोबर २०२१ दरम्यान राज्यात आलेल्या अतिवृष्टी, महापूर यासारख्या आपत्तीमध्ये राज्यशासनाने आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत देताना एनडीआरएफ/एसएडीआरएफ निकषांपेक्षा अधिकची मदत दिलेली असणे, राज्यात नैसर्गिक आपत्तीची संख्या वाढलेली असणे, नैसर्गिक आपत्तीच्या परिणामाने शेतीचे, पशुधनाचे तसेच नागरी वस्त्यांमध्ये घरांचे, दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठीचे केंद्र शासनाचे एनडीआरएफ/एसएडीआरएफ निकष सात वर्ष होऊनही सुधारित केलेले नसल्याने राज्यात आपत्ती ग्रस्तांना मदत देतांना अडचणी असणे, एसएडीआरएफ अंतर्गत राज्याचा वाटा ठरवताना डीझास्टर रिस्क इंडेक्स सुधारित करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची गरज असणे, वाढत्या आपत्ती बघता आपत्ती व्यवस्थापनासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असल्याने निधीसाठी पर्याय उभारण्याची गरज असणे, बदलते हवामान आणि तापमानवाढ हे मोठे आव्हान ठरत असल्याने वातावरणीय बदलांच्या परीणामांची दाहकता कमी करण्याच्या दृष्टीने राज्याचे सुधारित धोरण आखण्याची गरज असणे, बदलते हवामान व तापमान वाढीच्या समस्यांचा व सामना करण्यासाठी युवकांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असणे, वातावरणीय बदल संबंधित अभ्यासासाठी तसेच संशोधनासाठी राज्य शासनाकडून वित्तीय सहाय्य करण्याची गरज असणे. शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (मदत व पुर्नवसन) यांचे निवेदन

माहे जून २०२१ ते माहे ऑक्टोबर २०२१ दरम्यान राज्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतीपिकांच्या व इतर नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रू.३६७१.२० कोटी तसेच राज्य निधीमधून रू.१५५१.८४ कोटी अशारितीने अद्यापपर्यंत रू.५२४३.०३ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. राज्याने मागील दोन वर्षात खालील नैसर्गिक आपत्तींचा सामना केला आहे :-

१)	फेब्रुवारी ते मे, २०२०	-	गारपीट व अवेळी पाऊस
२)	निसर्ग चक्रीवादळ	-	३ जून, २०२०
३)	जून ते ऑक्टोबर, २०२०	-	अतिवृष्टी
४)	मार्च ते मे, २०२१	-	गारपीट व अवेळी पाऊस
५)	तौक्ते चक्रीवादळ	-	दि.१६ व १७ मे, २०२१
६)	जुलै, २०२१	-	अतिवृष्टी व पूर
७)	ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२१	-	अतिवृष्टी

राज्याने अनेक घटकांकरिता विशेषत: शेतीपिकांच्या नुकसानीबाबत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा जास्त दराने राज्याच्या निधीतून मदत केली आहे. ज्यात नैसर्गिक आपत्तीची संख्या वाढली असून त्यामध्ये शेतीपिकांचे, पशुधनाचे तसेच इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे घरांच्या झालेल्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देय नाही. मात्र, दुकाने तसेच छोटे उद्योगधंदे यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देय नाही. याकरिता दि.१८.०३.२०२०

रोजीच्या पत्रान्वये याचा देखील समावेश राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठीचे केंद्र शासनाचे एनडीआरएफ / एसएडीआरएफ २०१५ पासून निकष व मदतीचे दर बदलण्याबाबत केंद्र शासनास मा.मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीने दि.०२.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. तसेच दि.२३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अल्पभूधारक शेतकऱ्यांप्रमाणे जनावरांच्या मृत्यूबाबत द्यावयाच्या मदतीमध्ये शेत मंजूरांचा समावेश राज्य आपत्ती प्रतिसाद निकषामध्ये करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी जो पूर्वी केवळ मदतीसाठी होता तो १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार आता राज्य आपत्ती धोके व्यवस्थापन निधी म्हणून गणण्यात येत आहे. सदरचा निधी ७५:२५% या प्रमाणे केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध होणार आहे. सदर उपलब्ध होणारा निधी पुढील उद्दिष्टाप्रमाणे प्राप्त होणार आहे.

- प्रतिसाद - ८० % (४०% मदत, १०% क्षमता बांधणी अणि पूर्वतयारी,३०% पुर्नबांधणी)
- सौम्यिकरण - २०%

आपत्ती व्यवस्थापन प्रभागास सौम्यिकरणासाठी २०% आणि क्षमता बांधणी पूर्वतयारी १०% या प्रकारे एकूण निधीच्या ३०% प्राप्त होणारा असून राज्यास दरवर्षी जवळपास रु १३०० कोटी एवढा निधी उपलब्ध होणार आहे. आपत्तींची वारंवारता विचारात घेता सदर निधी तसेच आवश्यकता भासल्यास राज्य शासनाच्या निधीतून आपत्ती सौम्यिकरण आणि क्षमता बांधणी पूर्वतयारी अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात येईल.

सन २०१४ साली महाराष्ट्र राज्याचा हवामान बदला संबंधी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याचे अद्यावतीकरणाचे कार्य प्रगती पथावर आहे. हवामानबदलांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्याच्या हेतूने सन २०१७ मध्ये मंत्रिमंडळाने हवामान बदल धोरणाला मंजूरी दिली असून त्यामध्ये शासनाच्या विविध विभागाव्दारे प्राधान्याने उपाययोजना राबविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मुंबई महानगरासाठी हवामान बदलासंबंधितचा कृती आराखडा दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे. तीव्र हवामान बदलांना रोखण्यासाठी जागतिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या "रेस टू झिरो" या अभियानात राज्यातील ४३ अमृत शहर आणि शहरी समूहांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर आणि नाशिक या प्रमुख शहरांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी शहरांचे कार्बन २०५० पर्यंत शून्यावर आणण्याच्या दृष्टीने उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे वातावरण बदलासंबंधीचे संशोधन, ज्ञान/माहिती व्यवस्थापन व क्षमता विकसित करण्यासाठी शासनाच्या पर्यावरण व वातावरण बदल विभागात स्टेट नॉलेज मॅनेजमेंट सेंटर फॉर क्लायमेट चेंज (SKMCCC) ची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने "SKMCCC" या प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य पुरविले आहे. राज्याशी संबंधित हवामन बदलाशी संबंधित माहिती संकलित करण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक नागरीकाला "पर्यावरण साक्षर" करण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरण व वातावरण बदल विभागांतर्गत विविध कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

****

लक्षवेधी सूचना क्र. ६३०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.समाधान अतवाडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

"माहे फेब्रुवारी व त्या सुमारास सोलापूर जिल्हयातील पंढरपूर शहर येथील २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयाचे व मंगळवेढा शहर येथील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या सार्वजनिक आरोग्य या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न ऐरणीवर येणे, पंढरपूर हे शहर जिल्हयातील व राज्यातील प्रमुख शहर असणे, शहरात दरवर्षी एकूण ४ वाऱ्या होत असणे, या वाऱ्याच्या निमित्ताने लाखो भाविक शहरात दर्शनाकरता येत असणे, येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सध्या शहरात उपलब्ध असलेले उपजिल्हा रुग्णालय अपुरे पडत असणे, याकरताच दरवर्षी तात्पुरत्या स्वरूपाचे आरोग्य केंद्र उभारावे लागत असणे, या तात्पुरत्या आरोग्य केंद्रामुळे शासनावर दरवर्षी करोडो रुपयांचा बोजा पडत असणे, तसेच वाढते शहरीकरण लक्षात घेता येथील स्थानिक नागरिक व आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अद्ययावत व सुसज्ज सेवा मिळणे करीता उपाय म्हणून सदर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयात रूपांतर करण्याच्या प्रस्तावास तत्कालीन शासनाने सन २०१३-१४ साली मंजुरी देणे, परंतु प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे सदर प्रस्तावाच्या आराखड्यास पुन्हा सन २०१७ साली शासनाने मान्यता देणे, त्यानंतर तब्बल पाच वर्षे उलटून देखील अद्याप प्रशासनामार्फत अंदाजपत्रक सादर करण्यात न येणे, सततच्या पाठपुरावा केल्यानंतर स्थानिक प्रशासनाने पुन्हा सन २०२१ ला सुधारित अंदाजपत्रक आराखड्यासह मान्यते करीता शासनाकडे सादर करणे तसेच मंगळवेढा शहर देखील तालुक्याचे महत्वाचे ठिकाण असणे, सदर शहरातून NH-१६६ हा राष्ट्रीय महामार्ग जात असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रहदारी वाढून अपघाताचे प्रमाण वाढल्याने तातडीच्या उपचाराभावी जीवितहानी होत असणे, तसेच शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना सध्या असलेले ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय आरोग्य सेवेच्या दृष्टीने अपुरे पडत असणे, याकरताच तत्कालीन राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य यांनी सन २०१८ साली शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्रशासनाला देणे, परंतु आदेश देऊन देखील प्रशासनाने अद्याप कोणतीच ठोस कारवाई न करणे, यामुळे सदरील शहरातील आरोग्य सेवेचे होत असलेले हाल शासनाचे होणारे आर्थिक नुकसान आणि प्रशासनाची होत असलेली दिरंगाई यामुळे तेथील जनतेत पसरत असलेला क्रोध व असंतोष यावर उपाय म्हणून शासनाने पंढरपूर येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व मंगळवेढा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय याचा श्रेणीवर्धनाचा प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याच्या दृष्टीने करावयाची कारवाई व उपाययोजना".

मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे निवेदन

पंढरपूर येथे उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर चे १०० खाटांवरुन २०० खाटांचे सामान्य रुग्णालय शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१३ अन्वये मंजूर झालेले आहे.

(कृ.मा.प)

पंढरपूर जि.सोलापूर येथे अस्तित्वात असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे २०० खाटांच्या सामान्य रुग्णालय श्रेणीवर्धन बांधकामाचे रुपये १४०६.५८ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक व आराखडे उपसंचालक आरोग्य सेवा पुणे व जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर यांनी आयुक्त, आरोग्य सेवा यांना पाठविले होते. तथापि सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मुद्यांची माहिती सादर करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे व जिल्हा शल्यचिकित्सक सोलापूर यांना आयुक्त आरोग्य सेवा यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.

मंगळवेढा तालुक्यात ५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. त्यानुसार ५ प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक ग्रामीण रुग्णालय व तालुक्याच्या ठिकाणी एक ग्रामीण रुग्णालय असे निकष आहेत. सदरील ग्रामीण रुग्णालयाचा बेड ॲक्युपन्सी रेट १२ % इतका असल्याने श्रेणीवर्धनाच्या निकषात बसत नाही.

****

लक्षवेधी सूचना क्र. १५६

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्रीमती यामिनी यशवंत जाधव, डॉ. बालाजी किणीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५६ पुढीलप्रमाणे आहे :-

" राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षकांनी डॉ. नितीन करमळकर समितीच्या शिफारशीनुसार व्यावसायरोध भत्ता वाढविणे, वैद्यकीय अभ्यास व पदव्युत्तर भत्ता एम्सच्या शिक्षकांनुसार देण्यात यावा, जोखीम भत्ता मंजूर करावा, अधिष्ठांताच्यासह संचालक व सहसंचालकांना विशेष देण्यात यावा, कुठिंत वेतनवाढ सुरु करावी, सेवा अतंर्गत आश्वासित प्रगती योजना सुरु करावी इत्यादी मागण्यांकरिता सुरु केलेले अध्यापन बंद आदोंलन, कोरोना काळात वैद्यकीय शिक्षकांनी पूर्ण क्षमतेने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता केलेल्या रुग्ण सेवेची दखल घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांसह शासनाने वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देऊनही मागण्यांची प्रतिपूर्ती निर्णयात्मक़ मंजूरी देऊन करण्यास शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी शिक्षकांच्या आदोंलनामुळे दि. ०५ जानेवारी पासून वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे संपुर्ण अध्यापन बंद होणे, परिणामी पदव्युत्तर विद्यार्थी, पालक वर्गात व शिक्षकांच्या मागण्या मान्य होत नसल्याने त्यांच्यात वाढता तीव्र असंतोष, शासनाने वैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे शिक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्या मान्य करण्याच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना. "

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापक तसेच सह संचालक व संचालक या पदांना ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस (AIIMS) या स्वायत्त संस्थेच्या धर्तीवर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे निकष विचारात घेवून सुधारित भत्ते व इतर लाभ लागू करणेसंदर्भात अभ्यास करुन शासनास सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याकरिता शासन आदेश दि.१८.०५.२०२१ अन्वये डॉ.नितीन करमळकर, प्रभारी कुलगुरू, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार विविध भत्ते लागू करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक २९.०९.२०२१ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. मात्र, अध्यापकीय पदांबाबत शैक्षणिक व संशोधनात्मक कामकाजाबाबत विविध संस्थांनी निश्चित केलेले निकष व अन्य निर्देशांचा अभ्यास करणे आवश्यक असल्याने संचालनालयाच्या स्तरावर दिनांक ०२.०२.२०२२ च्या आदेशान्वये डॉ.चंदनवाले, सह संचालक (वैद्यकीय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग तसेच राष्ट्रीय वैद्यक आयोग यांचे निकष विचारात घेवून, शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना सुधारित दराने भत्ते व इतर लाभ लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. प्रसंगत: महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १५.०३.२०२२ रोजी मा. मंत्री (वै.शि.) च्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील चर्चेवेळी मा. मंत्री महोदयांनी सूचित केल्यानुसार महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेने दिनांक १८.०३.२०२२ रोजी आंदोलन स्थगित करीत असल्याचे लेखी स्वरुपात कळविले आहे. त्यानुसार सर्व शासकीय महाविद्यालयात शैक्षणिक व प्रशासकीय कामे सुरळीतपणे चालू झाली आहेत.

****

शेरा H/1156 (750-3-22)

सन २०२२ चे (अर्थसंकल्प) अधिवेशन

सर्वश्री. बबनराव लोणीकर, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात विशेषत: मराठवाड्यात वारंवार पडणारा दुष्काळ व त्यामुळे होणारी तीव्र पाणी टंचाई यावर उपाय म्हणून मागील सरकारच्या काळात ३ वर्षे ४ हजार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला असणे, लातूरला तर रेल्वे वाहिनींच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात आला असणे, मराठवाड्यातील ११ मोठी धरणे बंद पाईपद्वारे एकमेकांना जोडणी करून मराठवाड्यातील दुष्काळाची समस्या कायमची दूर करण्याच्या दृष्टीने सरकाने डीपीआर तयार केला असणे, ८ पैकी औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद या ५ जिल्ह्यांच्या निविदा प्रसिध्द झाल्या असणे व परभणी, हिंगोली, नांदेड डीपीआर तयार झाला असणे, तथापि, त्यावरील काम मात्र सरकारकडून अद्यापही न होणे, प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे स्वच्छ पाणी पुरवठा उपलब्ध करण्यासाठी केंद्राकडून जलजीवन मिशन योजनेच्या माध्यमातून राज्याकरिता रुपये २४ हजार कोटी मंजुर करण्यात आले असणे, त्यापैकी रुपये १९३५.६२ कोटी निधी राज्याला प्राप्त झाला असणे, राज्याने आतापर्यंत २६०.३९ कोटी म्हणजेच १३.४५ टक्के निधी खर्च करण्यात येणे, दोन वर्षात राज्याला या कामात नियोजनबध्द प्रगती करता येणे शक्य असताना नळद्वारे स्वच्छ पाणी पुरवठा योजना शासन दफ्तरी पडून असणे, राज्यात ४० हजार गावांत १ कोटी ४२ लाख घरे असणे, प्रत्येक घरात स्वच्छ पाणी पुरवठा योजना राबविणे अपेक्षित असताना ऑनलाईन आकडेवारीप्रमाणे फक्त ३८ हजार गावांमध्ये ही योजना अंमलात आली असणे, असे असताना शासनाने मात्र राज्यातील १ कोटी घरांना ५५ लीटर दरडोई प्रमाणे नळ कनेक्शन दिल्याची धादांत खोटी व जनतेची दिशाभूल करणारी नोंद शासन दफ्तरी उपलब्ध असणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मोठ्या प्रमाणात ऑनलाईन निविदा प्रसिध्द केल्या. परंतु त्या सर्व निविदा ३० टक्के ते ३५ टक्के जादा दराने असल्याचे निदर्शनास येणे, ५ हजार कोटी रुपयांच्या निविदा मंजुर करताना २० ते २५ टक्यांहून अधिक रक्कम मोजावी लागत असल्याने मंत्रालय हे भ्रष्टाचाराचे अड्डे बनल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, जल जीवन मिशन योजना राबविण्याकरिता केंद्र सरकारने काही निकष ठरवून दिले असताना ते धाब्यावर बसवून सरकार दलालांच्या माध्यमातून स्वच्छ नळपाणी पुरवठा योजनेचा खेळखंडोबा करित असल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने लक्ष घालून तात्काळ करावयाची कारवाई व उपाययोजना."

रोहा/सच-१०१५-१ (७५०-३-२२)

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

मराठवाडा विभागात पडणारे पर्जन्यमान हे महाराष्ट्रातील इतर विभागापेक्षा कमी आहे. तसेच मराठवाडा विभाग अवर्षण प्रवण क्षेत्रात येत असल्यामुळे विभागास सतत पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणी टंचाईस तोंड देण्यासाठी शासनातर्फे टँकर लावणे, तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना घेणे, विहीरी/विंधन विहीरी अधिगृहण करणे, इ. उपाययोजना घेण्यात येतात. तसेच सन २०१६ मध्ये आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यामुळे लातूर जिल्ह्यात सन २०१५-१६ या वर्षात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याने जिल्ह्यातील ३१६ गावे/वाड्यांना ३६० टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच सन २०१६-१७ या वर्षात ६, सन २०१७-१८ या वर्षात ३, २०१८-१९ या वर्षात १२१, सन २०१९-२० या वर्षात ४१ टँकर्सने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. सन २०२०-२१ या वर्षात व सन २०२१-२२ या वर्षात आज रोजी अखेर टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासलेली नाही.

सन २०१६ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे लातूर शहराचा मुख्य स्रोत असलेल्या धनेगाव प्रकल्पात (मांजरा प्रकल्प) पुरेसा पाणीसाठी न झाल्यामुळे आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यामुळे लातूर शहरास मिरज जि. सांगली येथून रेल्वेद्वारे पाणी पुरवठा करावा लागलेला आहे. लातूर शहरास एप्रिल २०१६ ते ऑगस्ट २०१६ या टंचाई कालावधीमध्ये भीषण पाणीटंचाईस सामोरे जावे लागले. त्याकरीता लातूर शहरास मिरज, जि. सांगली येथून रेल्वेद्वारे पाणी पुरवठा करावा लागलेला होता. त्याकरिता दिनांक १२.०४.२०१६ ते ०९.०८.२०१६ या कालावधीमध्ये १११ ट्रीप द्वारे २५९५ लक्ष लिटर पाणी आणण्यात आले होते.

उपरोक्त परिस्थितीवर मात करण्यासाठी खात्रीशीर व कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून मराठवाडा विभागामध्ये उपलब्ध असलेल्या ११ धरणावरुन ग्रीड पध्दतीची पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे ठरले. इस्त्रायल देशामध्ये अशा प्रकारची ग्रीड पाणी पुरवठा योजना झाली असल्याने दिनांक १८.०१.२०१८ रोजी असे काम केलेल्या इस्त्रायलच्या मे. मेकोरोट डेव्हलपमेंट एण्ड एंटरप्रायजेस कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार बृहत पाणी आराखडा तयार करण्याचा व प्राथमिक संकल्पन अहवाल तयार करण्याचा सर्वंकष करारनामा दिनांक २१.०२.२०१८ रोजी चेअरमन मे. मेकोरोट डेव्हलपमेंट एंटरप्रायजेस कंपनी, इस्त्रायल व सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र शासन यांच्यात करण्यात आला. या करानाम्यानुसार ६ विविध अहवाल व १० सविस्तर प्रकल्प अहवाल मे. मेकोरोट डेव्हलपमेंट एण्ड एंटरप्रायजेस कंपनीने सादर करावयाचे ठरले.

उपरोक्त करारनाम्याप्रमाणे मे. मेकोरोट डेव्हलपमेंट एण्ड एंटरप्रायजेस कंपनीने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांसाठी ८ प्राथमिक संकल्पन अहवाल सादर केले आहेत. त्या अनुषंगाने औरंगाबाद जिल्हा ग्रीड (२७६४ कोटी) जालना जिल्हा ग्रीड (१५२९ कोटी), बीड जिल्हा ग्रीड (४८०१ कोटी), लातूर जिल्हा ग्रीड (१७१२ कोटी) व उस्मानाबाद जिल्हा ग्रीड (१४०९ कोटी) च्या प्रस्तावास सन २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात देवून पॅकेज-१(औरंगाबाद, जालना), पॅकेज-२ (बीड) व पॅकेज-३ लातूर, उस्मानाबाद करिता HAM निविदा मागविण्यात आल्या होत्या. दिनांक २३ फेब्रुवारी, २०२० मध्ये झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मराठवाडा वॉटर ग्रीड या प्रस्तावित प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात अधिक टंचाईग्रस्त लातूर, उस्मानाबाद, बीड व औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यासह काही तालुके यांच्यासाठी जायकवाडी धरण व उजनी धरण येथून अंमलबजावणी करण्याबाबत तपासणी करून तात्काळ कार्यवाही करून अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दिल्या. तद्नंतर दिनांक २३.०६.२०२१ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पॅकेज १, २ व ३ साठी पात्रता पडताळणीसाठी (RFQ) मागविण्यात आलेल्या निविदा रद्द करण्यात आलेल्या आहेत. व औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यासाठी ग्रीडच्या प्रस्तावास जल जीवन मिशनमधून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील इतर भाग बीड, उस्मानाबाद, लातूर आणि उर्वरित पुढील टप्प्यांबाबत निधीच्या व पाण्याच्या उपलब्धतेनुसार पुन्हा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणण्यास मान्यता देण्यात आली. मराठवाडा विभागातील पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी पिण्याच्या पाण्यासाठी ग्रीड हा महत्वाकांक्षी प्रकल्प आता टप्प्याटप्प्याने विकसित करण्यात येणार आहे. प्रथम औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यासाठी जायकवाडी धरणातून ग्रीड करण्यात येईल. त्याचप्रमाणे पश्चिम वाहिनी नद्यांमधून पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याबाबत जलसंपदा विभागाने अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. उपरोक्त निर्देशानुसार औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्याच्या पाणी ग्रीड प्रकल्पास रु. ३०७.०६ कोटी रक्कमेस दिनांक ०४.०१.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, निविदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर व गंगापूर तालुक्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे.

अति दुष्काळग्रस्त भाग म्हणून जल जीवन मिशन अंतर्गत प्रथम टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण या तालुक्यांना तसेच बीड व लातूर संपूर्ण जिल्ह्यांसाठी व उस्मानाबाद

जिल्ह्यासाठी रु. ११६८२.९८ कोटी रकमेचा ग्रीडचा प्रस्ताव तयार करून केंद्र शासनास दिनाक १५.०१.२०२१ रोजी सादर केला आहे. दिनांक २२.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनामार्फत मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. सदरील मुद्यांची पुर्तता दिनांक ०९.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे. त्यानंतर दिनांक १४.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जल शक्ती मंत्रालयामार्फत काही मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहे. त्याची पुर्तता करण्याची कार्यवाही सद्य:स्थितीत चालू आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत औरंगाबाद विभागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुर असलेल्या व प्रगती पथावर असलेल्या एकुण २३ योजना पुर्ण करणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

२) या कार्यक्रमांतर्गत नविन ३८ योजना राबविण्यासाठी प्रस्तावित असून त्यांचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	जिल्हा	प्रस्तावित योजनांची संख्या	प्र. मा. प्राप्त योजना	निविदा मागविण्यात आलेल्या योजना	निविदा प्राप्त योजना	निविदा स्वीकृत झालेल्या योजना
१.	औरंगाबाद	५	४	४	३	०
२.	जालना	४	४	४	४	१
३.	परभणी	२	१	१	०	०
४.	हिंगोली	३	३	३	३	०
५.	नांदेड	५	४	४	४	२
६.	उस्मानाबाद	०	०	०	०	०
७.	बीड	०	०	०	०	०
८.	लातूर	१९	१२	१२	११	०
	एकुण	३८	२८	२८	२५	३

निविदा प्राप्त २५ योजनांपैकी कार्यादेश दिलेल्या ३ योजना वगळता उर्वरीत २२ योजनांच्या देकाराबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

निविदेतील प्रस्तावीत दरापेक्षा २१ ते २५% जास्त दर - २ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा २६ ते ३०% जास्त दर - ६ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ३१ ते ३५% जास्त दर - ७ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ३६ ते ४०% जास्त दर - ४ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ४१ ते ४५% जास्त दर - १ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ४६ ते ५०% जास्त दर - २ योजना

सद्य:स्थितीत, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे स्विकृत करण्यात आलेल्या ११ निविदांव्यतिरिक्त ५० निविदा प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्या योजनांच्या देकाराबाबतची माहिती खालीलीप्रमाणे आहे:

निविदेतील प्रस्तावीत दरापेक्षा १० ते २०% जास्त दर - ०६ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा २१ ते ३०% जास्त दर - १४ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ३१ ते ४०% जास्त दर - २४ योजना

निविदेतील प्रस्तावित दरापेक्षा ४०% पेक्षा जास्त दर - ०६ योजना

सद्य:स्थितीमध्ये, बाजारामध्ये पाईप, सिमेंट, लोखंड, इंधन इ. च्या दरात मोठ्या प्रमाणात भाववाढ झालेली दिसून आल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मार्च, २०२२ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या दरसूचीमध्ये त्या अनुषंगाने वाढ करण्यात आलेली आहे. यानुसार प्राप्त निविदांचे मुल्यांकन केले असता वेगवेगळ्या निविदांमध्ये वेगवेगळी वाढ दिसून येते. सदरील सरासरी वाढ १० ते १५% वाढ झाली आहे. मात्र, या वाढी वाटाघाटीद्वारे At Par निविदा रक्कम करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे. तसेच जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सद्य:स्थितीत स्विकृत करण्यात आलेल्या निविदांची यादी व स्वीकृत देकार खालीलप्रमाणे आहे:

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्विकृत निविदांची यादी

(रुपये कोटी)

अ.क्र.	कामाचे नाव	जिल्हा	स्विकृती दिनांक	निविदा किंमत (रू.)	स्विकृत देकार व किंमत	दरसूचीनुसार मुल्यांकित किंमत व देकाराची तुलना
१.	अंथुर्णे पाणी पुरवठा योजना	पुणे	०४.०८.२०२१	४.७८	१५.१०% जास्त रु.५.५०	५.७५ कोटी (दरसूची सन २०२१-२२) ४.३२% कमी
२.	कार्ला पाणी पुरवठा योजना	पुणे	२२.०७.२०२०	७.३९	७.०२% कमी रु.६.८७	८.१५ कोटी (दरसूची सन २०१९-२०) १५.७२% कमी
३.	न्हावरे पाणी पुरवठा योजना	पुणे	२६.०८.२०२१	१२.३६	२६.२०% जास्त रु.१५.६०	१४.४२ कोटी (दरसूची सन २०२१-२२) ८.१७% जास्त
४.	लासुर्णे पाणी पुरवठा योजना	पुणे	०४.०८.२०२१	७.४५	१५.५०% जास्त रु.८.६१	९.४४ कोटी (दरसूची सन २०२१-२२) ८.८०% कमी
५.	डोंगरगाव कुसगांव पाणी पुरवठा योजना	पुणे	०२.०६.२०२१	६.९०	९.९७% कमी रु.६.२१	८.२१ कोटी (दरसूची सन २०१९-२०) २४.३१% कमी

६.	कवलापूर पाणी पुरवठा योजना	सांगली	२१.१०.२०२१	१०.८९	३.०६% कमी रु.१०.५६	१२.३४ कोटी (दरसूची सन २०२१-२२) १४.४३% कमी
७.	बेडग पाणी पुरवठा योजना	सांगली	१३.१०.२०२१	१२.२५	६.६५% कमी रु.११.४४	१३.३२ कोटी (दरसूची सन २०२१-२२) १४.११% कमी
८.	सुभाषनगर पाणी पुरवठा योजना	सांगली	२१.१०.२०२१	१०.९४	११.१७% कमी रु.९.७१	११.६५ कोटी (दरसूची सन २०२१-२२) १७.३७% कमी
९.	कसबा-सांगाव पाणी पुरवठा योजना	कोल्हापूर	०२.०६.२०२१	९.१४	७.११% जास्त रु.९.७९	८.८७ कोटी (दरसूची सन २०२१-२२) १०.३६७% जास्त
१०.	पाळधी पाणी पुरवठा, ता. धरणगाव	जळगांव	२६.०८.२०२१	१४.९७	१७.२६% जास्त रु.१७.५५	१६.७१ कोटी (दरसूची सन २०२१-२२) ४.९९८% जास्त
११.	नवनागापूर पाणी पुरवठा योजना, ता. अहमदनगर	अहमदनगर	०४.०८.२०२१	७.१७	१७.००% कमी रु.५.९५	७.८९ कोटी (दरसूची सन २०२१-२२) २४.५१% कमी

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनांच्या निविदा प्रक्रियेबाबत:- जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ च्या कृती आराखड्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ३५६ योजनांचा समावेश आहे. या योजनांपैकी ३०२ योजनांची प्रशासकीय मान्यतेसाठी तांत्रिक छाननी उप समितीमार्फत शिफारस करण्यात आली आहे. त्यापैकी दिनांक १४.०३.२०२२ पर्यंत २३९ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यता दिलेल्या योजनांची निविदा प्रक्रिया करण्यात येत आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेले निविदा प्रस्ताव निर्णयार्थ मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त झालेल्या निविदांची पडताळणी करता, असे आढळून आले की, बहुतांश निविदा २० ते ४० टक्के जास्त दराच्या प्राप्त झालेल्या आहेत. काही निविदा कमी दराच्याही प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदांच्या बाबतीत छाननी सुरू आहे. स्विकृत ११ निविदा व्यतिरिक्त उर्वरित ५० निविदा प्रस्तावांपैकी अद्याप कोणतीही निविदा स्वीकारण्याविषयीची अंतिम कार्यवाही करण्यात आलेली नाही.

केंद्र शासनाने दिनांक २५.१२.२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या जल जीवन मिशनच्या कार्यरत मार्गदर्शक सूचनांनुसार, केंद्र शासन देशातील ग्रामीण भागातील सर्व कुटूंबाना सन २०२४ पर्यंत " हर घर नल से जल" प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास कटिबध्द आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे कमीत कमी ५५ लिटर, प्रति माणसी, प्रति दिन

गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरिता दिनांक ०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमामध्ये ग्रामीण भागासाठी लोकवर्गणीच्या माध्यमाने सार्वजनिक सहभाग यावर भर देण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये स्थानिक स्तरावर एकात्मिक मागणी आणि पुरवठा या तत्वावर पाण्याचे व्यवस्थापन करण्यात येणार आहे. यामध्ये स्थानिक स्तरावरील पाण्याच्या उद्भवाची शाश्वतता राखण्यासाठी पावसाच्या पाण्याची साठवण, घरगुती सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे, भूजल पाण्यचे पुर्नभरण करणे इत्यादींचा समावेश आहे.

राज्यातील १,४६,०८,५३२ ग्रामीण कुटूंबांपैकी दिनांक १४.०३.२०२२ पर्यंत १,०१,३९,७७१ (६९.४० टक्के) ग्रामीण कुटूंबाकडे वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध करण्याची नोंद करण्यात आली आहे. दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ रोजी महाराष्ट्रामध्ये एकूण ४८,४३,८३२ ग्रामीण कुटूंबांकडे वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध होती. दिनांक ०४.०९.२०२० रोजी महाराष्ट्रामध्ये जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. दिनांक १४ मार्च, २०२२ पर्यंत ५२,९५,९३९ एवढ्या कुटूंबांना वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे सद्य:स्थितीत एकूण १,०१,३९,७७१ कुटूंबांकडे वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध आहे. सदरच्या वाढीव नळ जोडण्या देतांना १५ व्या वित्त आयोगांतर्गतचा ग्रामपंचायतींना उपलब्ध होणारा निधी व जल जीवन मिशन अंतर्गतचा निधी वापरण्यात आला आहे. गावोगावी पाण्याच्या स्त्रोतापासून नळ जोडणीपर्यंत शाश्वत पाणी पुरवठा व्हावा यासाठी स्वतंत्र किंवा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येत आहेत. यामध्ये सौर उर्जेवर आधारीत योजना, स्व. मिनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना इ. सर्व माध्यमांचा साकल्याने विचार करण्यात येत आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणीकरीता राज्यस्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा स्तरावर पाणी व स्वच्छता मिशन कार्यान्वयन यंत्रणा आहे. ग्रामपातळीवर जल जीवन मिशन अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती यंत्रणा म्हणून ग्रामीण पाणी व स्वच्छता समिती काम करत आहे. या अंतर्गत गाव पातळीवरील आराखडे व जिल्हा पातळीवरील आराखड्याचे नियोजनबध्द काम सुरु आहे. राज्यामध्ये एकूण ४०४९५ इतकी गावे असून त्यातील एकूण ३९६२८ इतके (९८%) गावकृती आराखडे तयार करण्यात आलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दरवर्षी योजनेचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास केंद्र शासनाची मान्यता घेऊनच पुढील अंमलबजावणी करण्यात येते. यास अनुसरून मोठ्या प्रमाणावर

योजनांचे काम हाती घेण्यात आले असून आतापर्यंत अंदाजे १९००० डिपीआर तयार करण्यात आले आहेत.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या कामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. जल जीवन मिशनकरीता मागील ३ वर्षात केंद्र शासनाने रू.२४६९.१४ कोटी इतका निधी उपलब्ध केला असून समरूप राज्य हिस्साही उपलब्ध करण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात दिनांक १४.०३.२०२२ पर्यंत केंद्र हिश्यातून रू.२८०.५५ कोटी व राज्य हिश्यातून रू.३४६.४० कोटी एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.विधानसभा सदस्य, डॉ. किरण लहामटे, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

"मा. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही आदिवासी भागात राबविली जाते. परंतु स्तनदा माता गरोदर महिला भगिनी यांना अंगणवाडी केंद्रावरती येणे मुश्किल असणे, त्यामुळे प्रत्यक्षात या अमृत आहाराची जागेवर वाटप होणे अडचणीचे असणे, म्हणून हा आहार त्या वाडया- पाडयांमध्ये प्रत्यक्ष घरी नेऊन देण्यास शासन परवानगी देणार काय,देणार असल्यास, ही अंमलबजावणी कधीपासून व किती दिवसांपासून करणार."

मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

अनुसूचित क्षेत्रात स्त्रियांच्या आहारातील उष्मांक (Calories) व प्रथिनांच्या (Proteins) कमतरतेमुळे कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांबाबत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन निर्णय, आदिवासी विकास विभागदि.१८ नोव्हेंबर, २०१५ अन्वये भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत गरोदर स्त्रियांना व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्याची योजना राज्यात दि. १ डिसेंबर, २०१५ रोजी सुरु करण्यात आली.

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग दि. ०५ ऑगस्ट, २०१६ अन्वये भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रति दिन शाकाहारी मुलांना २ केळी व मांसाहारी मुलांना १ उकडलेले अंडे आठवडयातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना ६,९६२ गावातील १०५ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पातील १४,७६८ अंगणवाड्यांमध्ये सुरू आहे. या योजनेअंतर्गत दरमहा सुमारे **१,३९,५३१** गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा आहार तसेच ७ महिने ते ६ वर्षापर्यंतच्या दरमहा सुमारे **७,२८,५५१** बालकांना या योजनेमार्फत अंडी/केळी चा लाभ देण्यात येत आहे.

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग दिनांक ३१.०३.२०२० अन्वये पुढील आदेशापर्यंत कोरोना विषाणू साथीच्या परीस्थितीमध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत महिला लाभार्थी व बालकांना आहार/आहार घटक घरपोच उपलब्ध करुन देणे, ज्याठिकाणी हे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत स्थानिक आढावा घेऊन लाभार्थ्यांना एक महिन्याचा

आहाराची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट वितरीत करणे अथवा गरम ताजा आहार ज्या ठिकाणी शिजवून लाभार्थ्यांना पोहोच करणे शक्य नसल्यास अन्नघटक(गहू, तांदुळ, दाळ, खाद्यतेल, मीठ, मसाला, इ.घटक) लाभार्थ्यांना एकत्रित पॅकेट करून एक महिना पुरेल एवढा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधित जिल्ह्यातील कोरोना विषाणूच्या प्रसाराची परीस्थिती विचारात घेऊन संबंधित जिल्ह्याकडुन कार्यवाही करण्यात येत आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-

"बुलढाणा जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउददेशिय विकास बँक मर्या., बुलढाणा अवसायनात असून सदर मालमत्तेच्या बुलढाणा मुख्यालय भूखंड विक्री संदर्भात बुलढाणा येथील मालमत्ता इमारत व भूखंड ३०,००० चौ.फुट संस्थेचे अवसायक तथा तत्कालीन जिल्हा उपनिबंधक यांनी भूविकास बँकेची मालमत्ता विक्री करण्याकरिता सहकार विभागाच्या शासन निर्णय क्र. एलडीबी-१०१७/प्र.क्र.९७/७-स मंत्रालय, मुंबई दि १३.११.२०१७ नुसार कोणतीही प्रकिया राबविलेली नसणे, सदर शासन निर्णयानुसार राज्यातील उपरोक्त बँकेची (भूविकास बँकेची) मालमत्तेसंबधी निर्णय घेण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या उपसमितीची मान्यता न घेता सदर बॅकेची मालमत्ता विक्री करण्याबाबत कार्यवाही सुरू करणे, सदरहू प्रकरणासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सहकार मंत्री, यांना माहे डिसेंबर, २०२० रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देण्यात येणे, त्यावर मा. सहकार मंत्री यांची सहकार आयुक्त, यांना भूखंडाच्या मालमत्तेची विक्री केलेल्या प्रकियेस स्थगिती देऊन संबधिताविरूध्द निलंबनाची कारवाई करण्याची कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, परंतू अदयापपर्यंत या संदर्भात शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

बुलडाणा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. बुलडाणा ही बँक दि. १७.०४.२०१३ रोजी अवसायनात घेण्यात आली असून, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांची अवसायक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील भूविकास बँकाबाबत दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार भुविकास बँकांच्या मालमत्ता ई-टेंडरींगद्वारे विक्री करुन त्यामधून कर्मचाऱ्यांची देणी अदा करावयाची आहेत. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांनी सादर केलेल्या बुलडाणा जिल्हा भूविकास बँकेची बुलडाणा व खामगांव येथील मालमत्ता ई निविदा प्रक्रियाव्दारे विक्री करण्याच्या प्रस्तावास विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दि.३०/६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिली होती.

सदर मंजूरीच्या अनुषंगाने बुलडाणा भूविकास बँकेच्या वरील दोन्ही मालमत्तांच्या विक्रीसाठी दिनांक १९/९/२०१७ , ६/११/२०१७ व १६/१२/२०१७ रोजी ई निविदा नोटीसा प्रसिध्दी करण्यात आल्या असता तीन्ही वेळेस बुलडाणा येथील मालमत्तासाठी फक्त स्वस्तीक शॉप अँन्ड ओनर्स को. ऑप. सोसायटी लि. बुलडाणा यांच्यावतीने श्री. घनश्याम चोप्रा यांनी मंजूर वाजवी मुल्य रु. १५.०१ कोटी पेक्षा कमी दराने म्हणजे रु.५.५१ कोटी इतक्या रकमेची निविदा दाखल केली होती. सदर विक्री प्रस्तावास शासनाने दि. ३१.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली होती.

बुलडाणा भुविकास बँकेच्या बुलडाणा येथील मालमत्तेसंदर्भात नियमबाह्य केलेल्या विक्रीप्रक्रीयेस त्वरीत स्थगिती देऊन संबंधीतांविरुध्द चौकशी करुन निलंबनाची कारवाई करणेबाबत श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी मा. मंत्री (सहकार) यांना दि. १.१२.२०२० रोजी निवेदन सादर केले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा. मंत्री (सहकार) यांनी नियमानुसार कार्यवाही करुन अहवाल सादर करणेबाबत सहकार आयुक्तांना निर्देश दिले होते.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाने दि. १४.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय अहवाल सादर करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना सुचित केले होते. त्यानुषंगाने विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा यांना चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत निर्देशीत केले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा यांनी दि. २७.०७.२०२१ रोजी अहवाल सादर केला.

तथापी सदर अहवाल स्पष्ट व समाधानकारक नसल्याने सहकार आयुक्तांनी दि. ०१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, अमरावती यांना मुद्देनिहाय अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह फेरसादर करण्याबाबत कळविले. त्यानुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दि. ०२.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, अकोला यांची सदर प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरीता नियुक्ती केली आहे. त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान शासनाच्या दि. ३१.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर बँकेच्या मालमत्ता विक्री प्रस्तावास दिलेल्या मान्यतेविरुध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. २९७५/२०१९ व ७५१३/२०१९ दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने दि. २८.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये शासनाचे दि. ३१.०१.२०१९ रोजीचे आदेश रद्द केले आहेत. तसेच सदर मालमत्तेचे योग्य बाजारभाव मुल्यांकन करुन घेऊन विक्रीबाबत फेरनिविदा राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१८२

मा. श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८२ पुढील प्रमाणे आहे.

राज्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण वाढले असून एकट्या सोलापूर जिल्ह्यात ७०० पेक्षा अधिक बालविवाह झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये मुलींचे वय वाढीव दाखवल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, तसेच राज्यात सरकारी, निमसरकारी, खाजगी, सहकारी संस्था व कार्यालयांमध्ये महिला तक्रार निवारण समितीच स्थापन केलेल्या नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बालविवाह सारख्या गंभीर प्रश्नी शासनाची उदासीनता दिसून येणे, त्यामुळे बालविवाह रोखण्याकरिता व महिला सक्षमीकरण करण्याकरिता ठोस पाऊले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

निवेदन

(ॲड यशोमती ठाकूर, मंत्री, महिला व बाल विकास)

राज्यातील बालविवाह रोखण्याबाबत शासनाने केलेल्या उपाययोजनाः-

राज्यामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंधक नियम २००८ तयार केलेले आहेत. राज्यात एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२१ पर्यंत ९१४ बालविवाह थांबवण्यात आले असून, त्यापैकी ८१ प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये जानेवारी २०२० ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये ९० बालविवाह होत असल्याबाबत तक्रारी आल्या त्या अनुषंगाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षास ९० बालविवाह रोखण्यात यश आले आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये बालविवाह रोखण्याकरीता यूनिसेफ आणि एस.बी.सी.३ (center for social and behavior change communication) यांचे सहकार्याने जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बालविवाह निर्मुलन कृती दलाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील तालुकास्तरावरील विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी यांचा दोन दिवसीय मास्टर ट्रेनर प्रशिक्षण कार्यक्रम दि.१७ नोव्हेंबर २०२१ ते १८ नोव्हेंबर २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर या मास्टर ट्रेनरने त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या अंगणवाडी सेविका, शिक्षक, आशा वर्कर, ग्राम सेवक यांचे प्रशिक्षण घेतले. तसेच सोलापूर जिल्ह्यांतील महाविद्यालयीन युवकांनाही या कायद्याबाबत माहिती देण्यात आली.

बाल विवाह रोखण्यासाठी शासनामार्फत राज्यस्तरावरून करण्यात येत असलेले प्रयत्न

१) शासन अधिसूचना क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१६०/का-२ महिला व बाल विकास विभाग दि.३/६/२०१३ अन्वये बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ कलम १६ च्या पोट कलम (१) मधील तरतूदीनुसार राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीमधील ग्राम सेवकांची त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संबंधीत ग्रामपंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविकाना बाल विवाह प्रतिबंधक अधिका-यांस सहाय्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे.

२) शासन अधिसूचना क्र.बालवि-२०१४/प्र.क्र.६७/का-९ महिला व बाल विकास दि.१८/०८/२०१६ अन्वये नागरी भागासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बालविकास प्रकल्प अधिकारी यांना नियुक्त करण्यात आले आहे. तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिकांना संबधित बाल विवाह प्रतिबंध अधिका-याला सहाय्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले आहे.

रोटा H/1182 (650-3-22)

[illegible]

३) जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्वयंसेवी संस्था आणि चाईल्ड लाईन यांच्या माध्यमातून बाल विवाह रोखण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विविध शासकिय व निमशासकीय यंत्रणांशी समन्वय साधण्यात येत आहे.

४) महिला व बाल विकास विभाग, युनिसेफ आणि एस.बी.सी.३ या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून बाल विवाह समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मराठवाडा विभागातील औरंगाबाद, हिंगोली, जालना, नांदेड आणि उस्मानाबाद या ५ जिल्हयांसोबत दि. १७.११.२०२० पासून जिल्हा कृतीदल स्थापन करून प्रशासनासोबत सक्षम नावाच्या उपक्रमाची अमंलबजावणी करण्यात आली. सदर उपक्रम २०२१-२२ या वर्षात बीड, लातूर, परभणी, सोलापूर, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे.

५) बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ आणि बालविवाह प्रतिबंधक नियम २००८ या मध्ये ग्राम बाल संरक्षण समितीच्या भूमिकेबाबतची माहिती देण्याच्या अनुषंगाने जा.क्र./मराबासंस/ग्रा.बा.संस/प्रशिक्षण२०२०-२१/२२६ दि.२४.०२.२०२१ अन्वये राज्यातील ३५२ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील १०० ग्राम बाल संरक्षण समितीच्या सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलिस पाटील यांचे २ टप्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात ग्राम बाल संरक्षण समित्या म्हणजेच २०००० पेक्षा अधिक सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

महिला तक्रार निवारण समिती-

- केंद्र शासनाकडून कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ व नियम दि.९.१२.२०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ४ (१) मधील तरतूदीनुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी असेल अशा प्रत्येक कार्यालयात "अंतर्गत तक्रार समिती" गठीत करणेबाबत, महिला व बाल विकास विभागामार्फत शासन निर्णय क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि.१९.६.२०१४ निर्गमित करण्यात आला आहे.
- ज्या कार्यालयात १० हून कमी कर्मचारी आहेत किंवा जेथे नियुक्ती प्राधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारी आहेत, अशा कार्यालयातील लैगिंक छळाच्या तक्रारी स्थानिक तक्रार समितीकडे करण्याबाबतची तरतूद आहे. त्यानुसार सर्व जिल्हयाचे ठिकाणी स्थानिक तक्रार समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत.
- राज्यात शासकीय/ निमशासकीय कार्यालयांपैकी ७८२९ कार्यालयांमध्ये तर खाजगी, सहकारी संस्थांपैकी एकूण १९३८१ कार्यालये / आस्थापनामध्ये तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाअंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. निराश्रित/ परित्यक्ता, अत्याचारीत, संकटग्रस्त महिलांसाठी शासकीय महिला (राज्यगृह/संरक्षणगृह), स्वयंसेवी आधारगृहे स्थापन केली आहेत. तसेच संकटग्रस्त महिलांना आवश्यक उपचार व मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी वन स्टॉप क्रायसिस सेंटर ही योजना सुरू केली आहे. महिला व मुलींच्या मानवी वाहतूकीला आळा घालण्यासाठी व पिडीत महिलांची सूटका करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी उज्वला योजना सुरू करण्यात आली आहे. महिलांवर होणा-या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस स्टेशन आवारात महिला समुपदेशन केंद्र चालविली जात आहेत. भारतीय राज्य घटनेच्या अनुषंगाने स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना दि.२५ जानेवारी, १९९३ रोजी करण्यात आली आहे.

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. १६९१

श्री. सुरेश भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६९१ खालीलप्रमाणे आहे.

""चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे १०५ कोटीपेक्षा अधिक खर्चाची २० बंधाऱ्यांची कामे ११ टक्के कमिशनवर वाटल्याची धक्कादायक बाब नुकतीच निदर्शनास येणे, यामुळे कंत्राटदारांमध्ये प्रचंड खळबळ निर्माण होणे, मृद व जलसंधारण मंत्रालयाला विविध विकास कामासाठी दोन हजार कोटी रुपये देण्यात येणे, गतवर्षी जिल्ह्याला निधीचे वाटप झाल्यानंतर कामाची निविदा काढण्यात येणे, मात्र ऐनवेळी जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्याने बंधाऱ्याच्या कामासाठी औरंगाबाद येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे नोंदणीकृत कंत्राटदार असावे अशी अट घालण्यात येणे, सदर दोन्ही जिल्ह्यात निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात येऊन दि. २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी जुओ टॅगिंगची वेळ देण्यात येणे, निविदा भरण्याची अंतिम तारीख २ मार्च असतानाही या आधीच कामाचे वाटप करण्यात येणे, दोन्ही जिल्ह्याच्या १०५ कोटी रुपये खर्चाची २० कामे असणे, निविदा मूळ किंमतीच्या २१ टक्क्यांच्या वर भरण्यात येणे, १९ टक्के कमिशनवर सदरहू कामे मॅनेज करण्यात येणे, २० निविदा कामे ही प्रचलित दरसूचिनुसार नसणे, तसेच सेंट्रींग आणि मशिनरी अत्यल्प असलेल्या कंत्राटदारांना कामे देण्यात येणे, सदर कामे २५ टक्के विक्रीस काढण्यात येणे, सदर कामे वाटप करताना नोंदणी संपुष्टात आलेल्या कंत्राटदारांना बेकायदा वाटप करण्यात आल्याचा प्रकार घडणे, एस. एम. हकीम, एस. एस. शेख, शुभम इंजिनिअरिंग, जी. एस. शहा आणि एस. एम. उके या पाच कंत्राटदारांच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपलेली असतानाही त्यांना प्रत्येकी १० ते १५ कोटी रुपयांची कामे मंजुर करण्यात येणे, सदर कामे वाटपात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार व गैरव्यवहार करण्यात येणे, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना तातडीने बिलंबित करून त्यांची लाचलूचपत विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया

मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्ह्यातील ६७ बंधा-यांच्या कामाची रुपये ८९.०४ कोटी व गडचिरोली जिल्ह्यातील १५ बंधा-यांच्या कामांची रुपये १६.१९ कोटी अशी एकूण ८२ बंधा-यांच्या कामांच्या रुपये १०५.२३ कोटी इतक्या किंमतीच्या एकुण २० निविदा दि. १५ फेब्रुवारी ते ०२ मार्च, २०२२ या कालावधीमध्ये काढण्यात आल्या. त्यापैकी ३ निविदांमध्ये कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे दि. ०४ ते १४ मार्च, २०२२ पर्यंत दुस-या वेळेस प्रसिध्द करण्यात आल्या. प्रथम वेळेस पुरेसा प्रतिसाद मिळालेल्या एकुण १७ निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ उघडण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर सर्व निविदांपैकी अद्याप कोणत्याही निविदांचे आर्थिक लिफाफे उघडण्यात आलेले नाही.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास भागभांडवली अंशदान स्वरूपात रु. १५६३.०० कोटी इतका निधीची तरतुद आहे . त्यापैकी शासन निर्णय अन्वये

दि. ११.११.२०२१ रु. ४६९.०० कोटी, शासन निर्णय दि. १०.०१.२०२२ अन्वये रु. ३१२.०० कोटी व शासन निर्णय दि. २४.०२.२०२२ अन्वये रु. ६२५.०० कोटी याप्रमाणे एकूण रुपये १४०६.०० कोटी निधी महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत प्रशासकीय मान्यताप्राप्त कामांच्या निविदांमध्ये सहभागी होण्याकरिता कंत्राटदारास जलसंधारण महामंडळ अंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुबंई, खंडपीठ नागपूर व खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार महामंडळ अंतर्गत काम करण्यासाठी निविदाधारकाकडे महामंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर अट प्रारुप निविदेमध्ये समाविष्ट करुन सक्षम स्तरावरुन मंजुरी घेऊनच निविदा प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२१ मध्ये महामंडळ अंतर्गत मंजुरीप्राप्त कामांच्या निविदा प्रक्रिया शासन पत्र दि. २१ मे, २०२१ नुसार व महामंडळ पत्र दि. २३ मे, २०२१ नुसार "आहे त्या स्थितीत निविदा प्रक्रीया व कामे" स्थगित करण्यात आली होती. सदर निविदा जलसंधारण महामंडळाचे पत्र दि. २४ जानेवारी, २०२२ नुसार रद्द करण्यात आल्या होत्या. त्यानंतर महामंडळाच्या दि. ०४ फेब्रुवारी, २०२२ च्या पत्रानुसार रद्द केलेल्या निविदांबाबत पुन्हा निविदा प्रक्रीया राबवुन पुढील कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या. त्यानुसार यावर्षी सर्व २० निविदांची फेर निविदा दि. १५ फेब्रुवारी ते ०२ मार्च, २०२२ या कालावधीमध्ये प्रसिध्द करण्यात आल्या. तसेच, जलसंपदा विभाग यांचे शासन शुध्दीपत्रक दि. ०८ एप्रिल, २०२१ नुसार या निविदांसाठी दि. १७ ते २३ फेब्रुवारी २०२२ पर्यंत जिओ-टॅगिंग ची वेळ देण्यात आली होती.

वरील सर्व २० निविदांमध्ये सहभागी होण्याकरिता अंतिम दि. ०२ मार्च, २०२२ ही होती. सदर निविदांना शासन निर्णयानुसार आवश्यक सर्व स्तरावर प्रसिध्दी देण्यात येवुन ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आल्या आहेत व निविदा प्रक्रीया अद्याप सुरु आहे. सदर निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडण्याचे कार्य अद्याप प्रगतीपथावर असुन, आर्थिक लिफाफे उघडण्याचे बाकी आहे व निविदा प्रक्रीया प्रारंभिक स्तरावर आहे. तसेच, कोणत्याही निविदेसंदर्भात अद्याप कंत्राटदारांचे पात्र किंवा अपात्रतेबद्दल मुल्यमापन झालेले नाही व कोणत्याही कंत्राटदारास काम मंजुर झालेले नसुन, कामांचे वाटपही करण्यात आलेले नाही.

गतवर्षी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रीयेवरील स्थगिती उठविल्याने त्याच निविदांची फेरनिविदा यावर्षी करण्यात आलेली असल्याने कामांचे अंदाजपत्रके तसेच दरसुचीमध्ये शासनाच्या प्रचलीत धोरणानुसार कोणताही बदल करण्यात आलेला नाही .

*****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. मंगेश कुडाळकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५६२ पुढीलप्रमाणे आहे.

"वसई तालुका सहकारी औदयोगिक वसाहतीतील मे प्रोग्रेसिव सरफेस सिस्टीम प्रा. लि. वालीव या कंपनीकडून विषारी आणि घटक कचरा मोठ्या प्रमाणात खाडीला मिळणाऱ्या नाल्यात सोडण्यात येत असल्यामुळे जल आणि वायू प्रदूषणात होत असलेली वाढ, विषारी घटकांमुळे मासेमारीच्या पारंपारिक उपजीविकेच्या साधनापासून कोळी बांधवाना वंचित राहावे लागणे, मोठया संखेने मासे मरत असल्याने निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, कंपनीने विषारी आणि स्पोटक अशा रासायनिक पदार्थांचा साठा निर्धारित क्षमतेपेक्षा वाढीव स्वरुपात बाळगणे, कारखान्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्यांची पूर्तता नसणे, प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित करावयाच्या उपाययोजनांचे पालन न करणे, या सर्व प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

मे प्रोग्रेसिव सरफेस सिस्टीम प्रा. लि. वालीव, ता. वसई, जि. पालघर या उदयोगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमती पत्र देण्यात आले असुन, सदर संमतीपत्राची वैधता दि. ३१.१२.२०२२ पर्यंत आहे. दिनांक १५.०३.२०२२ रोजी सदर उदयोगाची पाहणी केली असता, सदर उदयोग इलेक्ट्रोप्लेटिंगसाठी लागणाऱ्या विविध रसायने ११.१३ मे. टन प्रतिदिन उत्पादन करित असुन या करिता कच्चा माल म्हणून पोटॅशिअम सायनाईड- ८.५ मे. टन प्रतिवर्ष व क्रोमिक ॲसिड ३३.१० मे. टन प्रतिवर्ष यांचा उत्पादनाकरिता वापर करण्यात येते. सदर उदयोगात १ ग्लास लाईन्ड रिॲक्टर व ३ एस.एस रिॲक्टर व १ छोटा बॉयलर बसविण्यात आला आहे. उत्पादन प्रक्रियेमध्ये कच्च्या मालाचे रसायनिक प्रक्रियेव्दारे उत्पादन केले जाते. उदयोगाने हवा प्रदुषण नियंत्रणासाठी ३ वॉटर स्क्रबर बसविले असून उदयोगामधुन २००० लिटर प्रतिदिन एवढे सांडपाणी निर्माण होते. सदर उदयोगाने प्राथमिक व तृतीय स्वरुपाची औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविली आहे संमती पत्रातील अटीनुसार प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर उदयोगप्रक्रियेत करणे बंधनकारक आहे. परंतु सदर उदयोग प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट उदयोगाच्या परिसराच्या बाहेर व रोडच्या विरुध्द बाजुस औदयोगिक सोसायटीच्या मालकिच्या बागेत सिंचनासाठी वापरण्यात येत असल्याचे आढळुन आले आहे. सदर उदयोगाकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमती पत्रातील अटी व शर्तीचे पालन केले नसल्यामुळे कारखान्यास दि. १६.०३.२०२२ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सदर उदयोगाच्या प्रदुषणाबाबतची कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नाही.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या अहवालानुसार प्रोग्रेसिव सरफेस सिस्टीम प्रा. लि. वालीव या संस्थेच्या जवळून छोटा नाला वाहत असून तो काही अंतरावर सोपारा खाडीला मिळतो. सदर सोपारा खाडीची रुंदी अंदाजे ३० ते ३५ मीटर असून ती नायगाव स्टेशनच्या पूर्वेला अर्धा किमी अंतरावर नायगाव खाडीला मिळते. या परिसरात जवळ नायगाव मच्छिमार सहकारी संस्था मर्या. मु. नायगाव ही सागरी क्षेत्रात कार्यरत असलेली मच्छिमार संस्था असून या संस्थेकडे प्रदुषण व मासे मरतूकी संदर्भात विचारणा केली असता संस्थेचे सचिव यांना अशी कोणतीही मासे मरतूकी झालेली नसल्याचे कळविण्यात आले आहे. सदर उदयोगापासुन पेल्हार नदी व वसई खाडी अंदाजे ७ कि.मी. अंतर असुन व सदर औदयोगिक परिसरातुन वसई-विरार सांडपाणी वाहुन नेणारी मल:निसारणवाहिणी जात असुन ती अंदाजे वसई खाडीस जाऊन मिळते. या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वसई खाडीचे नमुने NWMP अंतर्गत गोळा केले जात असून पृथ:करण अहवालावरुन खाडीच्या पाण्याची गुणवत्ता ही सरासरी मर्यादित आहे.

****